CMYK

# सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १९ मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १९० | पाने १२ | किंमत रु. ६/-


| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



प्रत्येकातील चांगले गुण पाहण्याचा आणि त्याच्याशी सत्कारपूर्वक वागण्याचा गुण, हाच सर्वश्रेष्ठ गुण आहे. प्रत्येकाच्या गुण-दोषांचे नीट विवेचन करून त्यांच्यातील चांगुलपणा वाढविण्याचा प्रयत्न करीत व त्यांच्यात असलेल्या दोषांवर प्रयत्नपूर्वक स्वत: विजय प्राप्त करून आपण आपले उत्कृष्ट जीवन निर्माण करू. लोकांतील चांगल्या गोष्टी पाहण्याचा हा गुण फार श्रेष्ठ आहे.

**- श्रीगुरुजी**

रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक

# सोलापुरात अग्नितांडव; ८ जणांचा होरपळून मृत्यू

- **एमआयडीसीतील सेंट्रल इंडस्ट्री टेक्स्टाईल या टॉवेल कारखान्याला आग**
- **मालक आणि कामगार कुटुंबातील आठ जणांचा मृतांमध्ये समावेश**
- **तब्बल १४ तासांनी आग आटोक्यात; अग्निशमक दलाचे अथक प्रयत्न**
- **गॅसस्फोटामुळे विजलेली आग पुन्हा भडकली**
- **आजी-माजी आमदारांसह अधिकाऱ्यांनी केली पाहणी**









उस्मान मन्सूरी | शिफा मन्सूरी | अनस मन्सुरी | मेहताब बागवान | आयेशा बागवान | सलमान बागवान | हिना शेख

### या ८ जणांचा झाला होरपळून मृत्यू

या कारखान्याचे मालक उस्मान मन्सूरी तसेच एक कामगार कुटुंबीय असे एकूण ८ जण या कारखान्यात काम करून तेथेच राहत होते. मेहताब बागवान, त्यांची मुलगी हिना वसीम शेख आणि मुलगा सलमान मेहताब बागवान या तीन कामगार कुटुंबातील सदस्यांचे मृतदेह सकाळी बाहेर काढण्यात आले. तर कारखान्याचे मालक उस्मान मन्सूरी यांच्या कुटुंबातील चार व कामगार कुटुंबातील एक अशा ५ जणांचा शोध सुरूच होता. मात्र दुपारी कारखान्याचे मालक उस्मान मन्सूरी, त्यांचा नातू अनस (२६ वर्ष), नात सून शिफा मन्सूरी (२४) तसेच नातवाचा मुलगा युसूफ (१) व कामगार मेहताब बागवान यांची पत्नी आयेशा बागवान अशा ५ जणांचे मृतदेह मिळाले.सर्व मृतदेह शासकीय रुग्णालयात आणण्यात आले असून नातेवाईकांची प्रचंड गर्दी झाली होती.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

अक्कलकोट रोडवरील एमआयडीसी येथील सेंट्रल इंडस्ट्री टेक्स्टाईल कारखान्याला लागलेल्या भीषण आगीत मालक आणि कामगार कुटुंबातील एकूण ८ जणांचा होरपळून मृत्यू झाला. या अग्नीतांडवात वित्तहानी मोठ्या प्रमाणात झाली. रविवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास ही दुर्घटना घडली. तब्बल १४ तासानंतर अग्निशामक दलाने केलेल्या शर्तीच्या प्रयत्नाने अखेर ही आग आटोक्यात आली. आजी-माजी आमदारांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी केली.

अक्कलकोट रोडवरील एमआयडीसी येथील सेंट्रल इंडस्ट्री टेक्स्टाईल कारखान्याला आग लागली असल्याचा कॉल महापालिका अग्निशामक दलाचे अधीक्षक राकेश साळुंखे यांना आला. दरम्यान, अक्कलकोट रोड एमआयडीसी अग्निशामक दल केंद्र जवळ असल्याने प्रथम तेथील अग्निशामक दलाची गाडी दाखल झाली. त्यानंतर आगीचे स्वरूप मोठे असल्याने सोलापूर अग्निशामक दलातील सर्व गाड्या घटनास्थळी पाचारण करण्यात आल्या. आणखी मदतीसाठी अक्कलकोट आणि पंढरपूर नगरपरिषदेच्या अग्निशामक दलाच्या गाड्या बोलविण्यात आल्या. त्याचबरोबर एनटीपीसी आणि चिंचोळी एमआयडीसी येथील अग्निशामक दलाच्या गाड्याही मागवून घेण्यात आल्या. दरम्यान, बघता बघता आगीने रौद्ररूप घेतले. भीषण आगीमुळे धुराचे लोट सर्वदूर पसरले होते. बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. सुमारे आठ ते १० अग्निशमन दलाच्या गाड्यांनी सातत्यपूर्ण आग विझवण्याचे शर्तीचे प्रयत्न युद्ध पातळीवर करण्यात येत होते. महापालिका, महापालिका अग्निशामक दल, पोलीस, महसूल प्रशासनाची पथके घटनास्थळी दाखल झाले. वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते. मोठा पोलीस बंदोबस्त तैनात होता. महापालिका अग्निशामक दलाचे अधीक्षक राकेश साळुंखे यांनी या आगी संदर्भात दिलेली अधिक माहिती अशी की, रविवारी पहाटे चार दहा च्या सुमारास आग लागल्या संदर्भात कॉल आला. ही माहिती मिळताच अक्कलकोट रोड एमआयडीसी अग्निशामक केंद्र जवळ असल्याने प्रथम तेथीलच गाडी पाठविण्यात आली. त्यानंतर आगीचे स्वरूप मोठे असल्याने सोलापूर अग्निशामक दलातील सर्व गाड्या इथे पाचरण करण्यात आल्या. आणखी मदतीसाठी अक्कलकोट आणि पंढरपूर नगरपरिषदेच्या गाड्याही मागविण्यात आल्या तसेच एनटीपीसी आणि चिंचोळी एमआयडीसी च्या गाड्याही मागून घेतल्या. सुरुवातीला तीन व्यक्तींना या आगीतून बाहेर काढण्यात आले. यामध्ये दोन पुरुष आणि एक महिलेचा समावेश होता. हे तिघेजणही बेशुद्ध अवस्थेत होते. त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. साधारणतः आठ व्यक्ती यामध्ये असल्याचे स्थानिक लोकांनी सांगितले. या कारखान्याच्या परिसरात मोकळ्या जागेत इतर सामान ठेवण्यात आले होते. यामुळे आत जाणे अडचणीचे ठरले. शेवटी शिडी लावून आत जावे लागले. ग्रील तोडून त्यातील तीन व्यक्तींना बाहेर काढण्यात यश आले. **(उर्वरीत वृत्त पान २ वर)**

महाराष्ट्रात सोलापूर येथे आग लागून झालेल्या दुर्घटेतील जिवितहानीमुळे तिव्र दु:ख झाले. आपले प्रियजन गमवलेल्या कुटुंबाप्रती माझ्या सहवेदना. जखमी झालेले लवकर बरे होवोत ही प्रार्थना. पंतप्रधान राष्ट्रीय मदतनिधीमधून प्रत्येक मृतांच्या वारसांना २ लाखांची मदत दिली जाईल. जखमींना ५० हजार दिले जातील.

**- पंतप्रधान नरेंद्र मोदी**

सोलापूरमध्ये अक्कलकोट मार्गावर एका टेक्सटाईल युनिटला लागलेल्या आगीत ८ जणांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दु:खद आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. मृतांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लाख रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात येईल.

**- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

## महत्त्वाचे

### नऊ दिवसांनी मान्सून केरळमध्ये

**पुणे** : राज्यात आगामी दोन दिवस वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. मुंबईसह ठाणे, पालघर भागात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहतील, तर काही ठिकाणी गडगडाटासह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. विदर्भ, मराठवाडा, खानदेश, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात वादळी पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. गुजरात आणि उत्तर कोकणच्या किनाऱ्यालगत अरबी समुद्रात चक्राकार वारे वाहत आहेत. याचाच परिणाम म्हणून सध्या राज्यात पावसाला पोषक वातावरण निर्माण झाले आहे. विदर्भात काही ठिकाणी पुढील चार ते पाच दिवस मेघगर्जनेसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मराठवाड्यातही पुढील पाच दिवस वादळी पावसाचा अंदाज आहे. सध्याच्या निरीक्षणांनुसार मुंबईत मान्सून लवकर येण्याची शक्यता आहे. कारण नैऋत्य मान्सून २७ मे पर्यंत केरळमध्ये दाखल होणार आहे. केरळ ओलांडल्यानंतर ते सर्वसाधारणपणे सात ते दहा दिवसांच्या कालावधीत महाराष्ट्रात प्रवेश करते.

# देशातील १७ खासदारांना संसदरत्न पुरस्कार जाहीर; महाराष्ट्रातील सात जणांचा समावेश

### सुप्रिया सुळे, स्तिता वाघ, मेधा कुलकर्णी यांचा समावेश

**नवी दिल्ली, १८ मे**

देशातील १७ खासदारांना यंदाचा 'संसदरत्न पुरस्कार २०२५' रविवारी जाहीर करण्यात आला. यंदाच्या पुरस्कारांसाठी महाराष्ट्राने बाजी मारली असून सुप्रिया सुळे, स्मिता वाघ, मेधा कुलकर्णी यांच्यासह सात खासदारांनी या यादीत स्थान पटकावले. संसदेत उल्लेखनीय, सातत्यपूर्ण व उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खासदारांना दरवर्षी 'प्राई पॉईंट फाऊंडेशन' या संस्थेर्फत हा पुरस्कार दिला जातो. संसदेत प्रश्न विचारणे, वादविवादात सहभाग, कायदेविषयक कामात योगदान आणि समित्यांधील कार्य या विविध निकषांवर



आधारित विशेष मूल्यांकनानंतर ही निवड केली जाते. या पुरस्कारांची निवड राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांच्या अध्यक्षतेखालील ज्युरी समितीने केली. प्राई पॉईंट फाऊंडेशनने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, संसदेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या १७ खासदार आणि २ संसदीय स्थायी समित्यांची संसदरत्न पुरस्कार २०२५ साठी निवड करण्यात आली. उत्कृष्ट आणि शाश्वत योगदानाबद्दल चार खासदारांना विशेष सन्मानित करण्यात येणार आहे. हे चार खासदार संसदेत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यांपैकी एक आहेत आणि त्यांच्या सध्याच्या कार्यकाळातही ते सतत सक्रिय आहेत. भाजपाचे भर्तृहरी महताब, शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे, आरएसपीचे एन. ऑफ. प्रेचंद्रन, शिवसेनेचे श्रीरंग आप्पा बारणे अशी या खासदारांची नावे आहेत. दोन संसदीय स्थायी समित्यांचा समावेश यावर्षी दोन संसदीय स्थायी समित्यांनाही संसदरत्न पुरस्काराने सन्मानित केले जाईल. भर्तृहरी महताब अध्यक्ष असलेले वित्त स्थायी समितीला हा पुरस्कार मिळाला असून या समितीने संसदेला आर्थिक धोरणांवरील अनेक प्रभावी आणि अभ्यासपूर्ण अहवाल सादर केले. याशिवाय चरणजित सिंग चन्नी अध्यक्ष असलेल्या कृषी स्थायी समितीचीही दखल घेण्यात आली.

### संसदरत्न पुरस्कार म्हणजे काय?

संसदरत्न पुरस्कार २०१० मध्ये सुरू करण्यात आले आणि हे पुरस्कार पारदर्शकता, जबाबदारी आणि लोकशाही मूल्ये मजबूत करण्यासाठी संसदेत सक्रिय राहणाऱ्या खासदारांना दिले जातात. खासदारांना प्रोत्साहन देणे आणि लोकांध्ये संसदीय कामकाज लोकप्रिय करणे हा त्याचा उद्देश आहे.

### भारत-पाक शस्त्रसंधीला अनिश्चित मुदतवाढ

**श्रीनगर** : दोन्ही देशांनी स्वीकारलेली शस्त्रसंधी अनिश्चित काळासाठी सुरू राहणार असल्याचे लष्कराच्या वतीने आज स्पष्ट करण्यात आले. १२ मे रोजी दोन्ही देशांच्या डीजीएमओ दरम्यान चर्चा झाल्यानंतर संघर्षविराम मान्य करण्यात आला होता. संघर्ष विरामाची मुदत १८ मे रोजी संपली आणि आता पुढे काय होणार, अशी चर्चा होणार सुरू असताना १२ मे रोजी केलेली युद्धबंदी यापुढेही सुरूच राहणार आहे. पण, ती कधी संपेल, हे निश्चित नाही.

### उत्तरप्रदेशात लावणार ३५ कोटी वृक्ष

**लखनऊ** : उत्तर प्रदेश सरकारकडून पर्यावरण रक्षणासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण मोहीम हाती घेण्यात आली असून, १ ते ७ जुलैदरम्यान राज्यभरात तब्बल ३५ कोटी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. शनिवारी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत या मोहिमेची सखोल तयारी व आढावा घेण्यात आला. पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारची नव्हे, तर समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. राज्यातील हरित क्षेत्र २०३० पर्यंत २० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी वृक्षारोपण हे जनचळवळीचे स्वरूप घेतले पाहिजे, असे मुख्यमंत्री म्हणाले. वृक्षारोपणासाठी लागणाऱ्या रोपांची उपलब्धता लक्षात घेता, वन व हवामान बदल विभाग तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मंत्र्यांना किमान ५० कोटी रोपे तयार ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# संघ मुख्यालयावरील हल्ल्याचा मास्टरमाईंड सैफुल्ला खालिदचा खात्मा

## सिंध प्रांतातील बदिन जिल्ह्यात अज्ञात हल्लेखोराने केले ठार

### सैफुल्लाने घडविलेले काही हल्ले



| २००१ | २००५ | २००६ |
| --- | --- | --- |
| उत्तर प्रदेशातील रामपूर येथे सीआरपीएफ कॅम्पवर हल्ला | बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत बॉम्बस्फोट | नागपूर येथील संघ मुख्यालयावर हल्ला |

**इस्लामाबाद, १८ मे**

महालातील संघ मुख्यालयावर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाईंड आणि लष्कर-ए-तोयबाचा टॉप कमांडर सैफुल्लाह खालिदला पाकिस्तानातील सिंध प्रांतात अज्ञात मारेकऱ्याने गोळ्या घालून ठार केले. बदिन जिल्ह्यातील मातिल तालुक्यात रविवारी सैफुल्लाहचा गेम करण्यात आला. सध्या तो नेपाळमधून कारवाया करीत होता. ऑपरेशन सिंदूरमध्ये अनेक दहशतवादी ठार झाल्यानंतर लष्कर-ए-तोयबाला बसलेला मोठा धक्का मानला जात आहे.

१ जून २००६ रोजी पहाटे साडेचार वाजताच्या सुमारास पांढऱ्या ॲम्बेसिडर कारमधून पोलिसांच्या वेशात आलेल्या तीन दहशतवाद्यांनी संघ मुख्यालयात घुसण्याचा प्रयत्न केला होता. पोलिसांची छावणी संघ मुख्यालयाच्या मागे असलेल्या नागपूर नाईट स्कूलमध्ये होते. दहशतवाद्यांनी बॅरिकेड धक्का देत इमारतीकडे धाव घेतली. पण, आधीच तयारीत असलेल्या पोलिसांनी एके-५६ आणि शक्तीशाली बॉम्बसह हल्ला चढविण्याच्या प्रयत्नात असलेल्या तीन दहशतवाद्यांना ठार केले होते. या घटनेने देशभरात मोठी खळबळ उडाली होती. त्यावेळी डॉ. मनमोहनसिंग देशाचे पंतप्रधान होते. सैफुल्ला खालिद याने हल्ल्याचा कट रचला होता.

तो विनोदकुमार ऊर्फ मोहम्मद सलीम, वनियाल, वाजीद आणि सलीम भाई आदी वेगवेगळी नावे धारण करीत देशात दहशतवादी कारवाया करीत होता. *(वृत्तसंस्था)*

### नेपाळ होते कारवायांचे केंद्र

सैफुल्लाने नेपाळी युवती नगमा बानोसोबत विवाह केला होता. त्यामुळे नेपाळमध्ये राहून तो भारतातील दहशतवादी कारवायांवर लक्ष ठेवत होता. युवकांना दहशतवादाकडे वळविण्याबरोबरच लष्कर-ए-तैयबा आणि जमात-उल-दावासाठी निधी गोळा करण्याची मोठी जबाबदारी त्याच्यावर होती.



### दहशतवाद्यांची कार अद्याप पोलिस ठाण्याच्या आवारात उभी

दहशतवाद्यांनी वापरलेली कार अद्यापही कोतवाली पोलिस ठाण्याच्या आवारात उभी आहे. या कारला असंख्य छिद्रे असून ती कार कुणाच्या मालकीची आहे, याबाबत अद्यापही पोलिसांना माहिती मिळाली नाही. या खटल्याचा निकाल अद्याप लागला नाही. त्यामुळे जप्त असलेली कार कोतवाली पोलिस ठाण्याच्या मुद्देमाल विभागाच्यावतीने जप्तीत ठेवण्यात आली आहे, अशी माहिती कोतवाली पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक भरत कऱ्हाडे यांनी दिली.

### काश्मिरातील मोहिमेची जबाबदारी

नागपूर, कानपूर आणि बंगळूरू येथील तीन हल्ले वगळता अन्य हल्ल्यांमध्ये त्याचा सक्रिय सहभाग नव्हता. पण, काश्मीर खोऱ्यात पोलिस आणि सुरक्षा दलांवरील हल्ल्याची योजना आखण्याची जबाबदारी खालिदवर होती. तो १९९० पासून दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी होता.

### मुंबई पोलिसांकडून मिळाली होती टीप

नागपूरात दहशतवादी घुसल्याची गुप्त माहिती मुंबई पोलिसांकडून मिळाल्याने संघ मुख्यालय परिसरात प्रचंड पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मुख्यालयाच्या इमारतीवरही सशस्त्र पोलिस तैनात होते. तर मुख्यालयाजवळ दहा पोलिस सज्ज होते. दहशतवादी धडकताच दोन्ही बाजूंनी जवळपास १०० राऊंड फैरी झडल्या. एस.पी.एस यादव हे त्यावेळी शहराचे पोलिस आयुक्त होते.

# तर मुंबईत शिवसेना स्वबळावर लढणार

## भारतीय जनता पक्षाला अप्रत्यक्ष इशारा

**ठाणे, १८ मे**

आमच्यासोबत कुणाला युती करायची नसेल तर काही हरकत नाही. मुंबई महानगरपालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याची आमची तयारी आहे, असे वक्तव्य ठाण्याचे शिवसेना खासदार नरेश म्हस्के यांनी दिला आहे.



नवी मुंबई हा भारतीय जनता पक्षाचा गड मानला जात असला तरी येथे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचाही चांगला प्रभाव आहे. २०२२ पासून महाराष्ट्रातील अनेक ठिकाणच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. येत्या काही दिवसांमध्ये निवडणूक बिगुल वाजण्याची शक्यता असल्याने प्रत्येक पक्ष आपआपली शक्ती आजमावून पाहत आहे. शनिवारी ठाणे येथे शिवसेनेचा मेळावा झाला. यावेळी खासदार नरेश म्हस्के यांनी भारतीय जनता पक्षाला अप्रत्यक्षपणे इशारा देत युती करायची नसेल तर स्वतंत्र लढू, असे स्पष्ट केले.

महायुती म्हणून लढण्याची आमची तयारी आहेच. पण, कुणी जर स्वतंत्रपणे लढण्याची भाषा करीत असेल तर त्याला आमची हरकत नाही. असे असेल तर आमचे नक्षरसेवकही तयारीत आहेत. तुमच्यापेक्षा काही कमी नाहीत, असे म्हस्के म्हणाले. निवडणुकांच्या काळात एकमेकांवर तोंडसूख घेण्याचे महायुतीतील नेत्यांनी टाळायला हवे, असे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते.

गेल्या चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. मात्र, ६ नोव्हेंबरला सर्वोच्च न्यायालयाने चार आठवड्यात निवडणुकीची अधिसूचना काढण्याचा आदेश दिला आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीचे राज्याचे लक्ष लागून आहे. गेल्या निवडणुकीत एकत्रित शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या जागांमध्ये फारच कमी अंतर होते. यावेळी स्वबळावर सत्ता मिळविण्याचे भारतीय जनता पक्षाचे प्रयत्न राहणार आहेत. येथे भारतीय जनता पक्ष, शिवसेना, उबाठा आणि मनसे यांच्यात सामना रंगण्याची चिन्हे आहेत. *(वृत्तसंस्था)*

### पुणे येथे मुख्यमंत्र्यानी केले होते वक्तव्य

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जेथे जागावाटपावर सहमती झाली नाही तेथे स्वतंत्रपणे लढण्याचा विचार केला जाऊ शकते, असे वक्तव्य पुणे येथे केले होते. याचाच आधार घेत म्हस्के यांनीही याला उत्तर देताना भूमिका स्पष्ट केली. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसला सामावून घेण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे फडणवीस म्हणाले होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# दहशतवाद आणि व्यापार एकत्र नाही

## गृहमंत्री अमित शाह यांचा अहमदाबादहून पाकिस्तानला इशारा

**अहमदाबाद, १८ मे**



भारतीय सैन्याने पाकिस्तानात १०० किमी आत घुसून अतिरेक्यांना ठार मारले. इतकेच नव्हे, तर त्यांची १५ लष्करी प्रतिष्ठाने देखील उद्ध्वस्त करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच असे घडले. दहशतवाद आणि व्यापार एकत्र होणार नाही असा इशारा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पाकिस्तानला दिला.

शाह यांनी रविवारी गुजरातमधील अहमदाबाद येथे सशस्त्र दलांच्या सन्मानार्थ तिरंगा यात्रेचे नेतृत्व केले. यावेळी अमित शाह प्रचंड गर्दीत राष्ट्रध्वज घेऊन मिरवणुकीच्या समोरून चालताना दिसले. तिरंगा यात्रेनंतर त्यांनी अहमदाबाद महापालिकेच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. उपस्थितांना संबोधित करताना शाह म्हणाले, दहशतवाद आणि व्यवसाय एकत्र चालू शकत नाही अशी सरकारची भूमिका आहे. संपूर्ण जग भारतीय सैन्याच्या क्षमतेचे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दृढनिश्चयाचे कौतुक करत आहे.

भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानात हल्ला करून १०० दहशतवाद्यांचा खात्मा केला. दहशतवादी संघटनांचे मुख्यालय उद्ध्वस्त करण्यात आले. लष्करी तळ उद्ध्वस्त केल्याने पाकिस्तानी हवाई दलाची प्रतिहल्ला करण्याची क्षमता कमी झाली. व्याप्त काश्मिर आणि दहशतवादावरच यापुढे पाकिस्तानसोबत चर्चा होईल असे आम्ही त्यांना बजावले आहे. (वृत्तसंस्था)

### महिलांच्या सन्मानार्थ दिले ऑपरेशन सिंदूर नाव

शाह म्हणाले, पंतप्रधान मोदींनी देशातील महिलांच्या सन्मानार्थ लष्करी कारवाईला ऑपरेशन सिंदूर असे नाव दिले. मोदी सत्तेवर येण्यापूर्वी देशात सातत्याने अतिरेकी हल्ले व्हायचे. पण आता तसे होत नाही. यापूर्वी दहशतवादी पाकिस्तानातून येत असत, आपल्या सैनिक आणि लोकांवर हल्ले करायचे आणि सीमापार पळून जाण्यात यशस्वी व्हायचे. कारवाई होत नसल्याने पाकिस्तानचे फावले आणि त्यांनी भारताविरोधात दहशतवाद्यांना पाठिंबा देणे सुरूच ठेवले.

### प्रत्येक हल्ल्याला कठोर प्रत्युत्तर

मोदी सत्तेत आल्यानंतर भारतात तीन मोठे दहशतवादी हल्ले झाले. त्यात उरी, पुलवामा आणि गेल्या महिन्यातील पहलगाम हल्ल्याचा समावेश होता. मात्र आमच्या सरकारने भारतीय लष्कराला कारवाईसाठी सूट दिली, त्यामुळे अतिरेक्यांचे कारस्थान सातत्याने उधळण्यात यश आले. आज मी अभिमानाने सांगू शकतो, की आम्ही जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तोयबाचे मुख्यालय उद्ध्वस्त करून पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला.

# उपग्रह ईएसओ-०९ चे प्रक्षेपण अयशस्वी

## तिसऱ्या टप्प्यात तांत्रिक बिघाड झाल्याचे उघड



ईएसओ-०९ चे प्रक्षेपण झाल्यानंतर काही वेळाने त्याची दिशा भरकटली.

**श्री हरिकोटा, १८ मे**

इस्रो त्याचे १०१ वे उपग्रह ईएसओ-०९ प्रक्षेपित करण्यात अयशस्वी ठरले. प्रक्षेपणाच्या तिसऱ्या टप्प्यात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे हे अभियान पूर्ण होऊ शकले नाही. पूर्ण विश्लेषणानंतर गोष्टी सविस्तरपणे लक्षात येतील. रविवारी सकाळी ५:५९ वाजता इस्रोच्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून पीएसएलवी-सी-६१ रॉकेटद्वारे ईएसओ-०९ प्रक्षेपित करण्यात आले, असे इस्रोचे प्रमुख व्ही. नारायणन यांनी सांगितले.



उपग्रह प्रक्षेपणाचा पहिला आणि दुसरा टप्पा सामान्य होता परंतु तिसरा टप्पा पूर्ण होऊ शकला नाही. काही तांत्रिक त्रुटींमुळे हे घडले. आता या माहितीचे विश्लेषण करू आणि नंतर मिशन पुन्हा सुरू करू, असे नारायण यांनी सांगितले. वास्तविक, या मोहिमेअंतर्गत, ईएसओ-०९ पृथ्वी निरीक्षण उपग्रह-०९ पृथ्वीच्या सूर्य समकालिक कक्षेत ठेवले जाणार होते. विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना अचूक आणि नियमित माहिती मिळावी यासाठी रिमोट सेन्सिंग डेटा प्रदान करणे हा त्याचा उद्देश होता.

दिवसा आणि रात्री आणि सर्व हवामान परिस्थितीत पृथ्वीच्या पृष्ठभागाचे उच्च-रिझोल्यूशन प्रतिमा प्रदान करण्यासाठी हे डिझाइन केले होते. प्रगत रडार इमेजिंग तंत्रज्ञानामुळे ढग, धुके किंवा अंधार यासारख्या प्रतिकूल परिस्थितीतही अचूक आणि उच्च-गुणवत्तेच्या प्रतिमा कॅप्चर करता येतात. देशाच्या संरक्षण उपक्रमांसाठी महत्त्वाची माहिती प्रदान करण्याच्या उद्देशाने ईएसओ-०९ ची रचना करण्यात आली होती. यामुळे सीमांवर देखरेख, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे आणि धोरणात्मक क्षेत्रांचे मॅपिंग करण्यात मदत झाली असती. त्याची उच्च-रिझोल्यूशन इमेजिंग क्षमता सैन्याला महत्वाची माहिती प्रदान करण्यात उपयुक्त ठरले असते. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### राष्ट्रपती, पंतप्रधानांनी दिल्या उपराष्ट्रपतींना वाढदिवसाच्या शुभेच्छा

**नवी दिल्ली** : राष्ट्रपती द्रौपदी मूर्मु, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.



राज्यसभेची उत्पादकता वाढवण्यासाठी त्यांनी प्रशंसनीय प्रयत्न केले आहेत, असे पंतप्रधान यावेळी म्हणाले. आपले उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा. एक आघाडीचे वकील म्हणून व वर्षानुवर्षे केलेल्या कामातून त्यांना आमच्या संविधानाचे प्रचंड ज्ञान लाभले आहे, असे मोदींनी एक्सवर म्हटले. राज्यसभेची उत्पादकता वाढवण्यासाठी त्यांनी प्रशंसनीय प्रयत्न केले आहेत. समाजसेवेची त्यांची आवडही अफाट आहे. त्यांना दीर्घ आणि निरोगी आयुष्य लाभो, असे पंतप्रधानांनी म्हटले.

### पंतप्रधान मोदींनी दिल्या देवेगौडांना वाढदिवसाच्या शुभेच्छा

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी माजी पंतप्रधान आणि जनता दलाचे अध्यक्ष एचडी देवेगौडा यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. जून १९९६ ते एप्रिल १९९७ दरम्यान पंतप्रधानपद भूषवणारे देवेगौडा रविवारी ९२ वर्षांचे झाले. आपले माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा. राजकारण आणि सार्वजनिक सेवेबद्दलच्या आवडीसाठी ते सदा आदरणीय आहेत, असे एका पोस्टमध्ये पंतप्रधान मोदी म्हणाले. अनेक मुद्यांवरील त्यांचे ज्ञान आणि अंतर्दृष्टी ही मोठी शक्ती आहे. त्यांना दीर्घ आणि निरोगी आयुष्य लाभो, असे ते म्हणाले.

### पोलिसांशी झालेल्या चकमकीत गोतस्कराचा मृत्यू

**लखनौ** : उत्तर प्रदेशातील जौनपूर जिल्ह्यात पोलिसांशी झालेल्या चकमकीत एका गाय तस्कराचा मृत्यू झाला आणि दोघे जखमी झाले, असे अधिकाऱ्यांनी रविवारी सांगितले. शनिवार आणि रविवारी रात्री खुज्जी वळणावर तपासणीदरम्यान एका पोलिस हेड कॉन्स्टेबलला त्यांच्या पिक-अप व्हॅनने धडक देऊन तीन गाय तस्कर आणि त्यांचे सहकारी पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना ही चकमक झाली. यात गो तस्कराचा मृत्यू झाला.

### बेपत्ता सीआरपीएफ जवानाचा आढळला मृतदेह

**भुवनेश्वर** : १६ मे पासून बेपत्ता असलेला सीआरपीएफ जवान रविवारी ओडिशाच्या बोलांगीर जिल्ह्यात झाडाला लटकलेला आढळला, असे पोलिसांनी सांगितले. मृताचे नाव गणेशराम भोई आहे. तो जिल्ह्यातील लारंभा पोलिस स्टेशन हद्दीतील घासियान गावातील रहिवासी होता. भोईच्या कुटुंबीयांच्या मते, सीआरपीएफ जवान सुटीवर त्याच्या गावी आला होता आणि शुक्रवारी तो बेपत्ता झाला. काही गावकऱ्यांनी भोईला एका निर्जन ठिकाणी झाडाला लटकलेला पाहिले आणि स्थानिक पोलिस स्टेशनला माहिती दिली. पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि मृत्यूची चौकशी सुरू केली. तसेच फॉरेन्सिक पथक देखील तेथे पाठवण्यात आले. सीआरपीएफ जवानाच्या मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

### भारतविरोधी मजकूर पोस्ट करणाऱ्या दोघांना अटक

**शिलाँग** : मेघालयातील उत्तर गारो हिल्स जिल्ह्यात समाजमाध्यमांवर भारतविरोधी मजकूर पोस्ट केल्याच्या आरोपाखाली दोघांना अटक करण्यात आली, असे पोलिसांनी रविवारी सांगितले. दोघांना बजेंगडोबा पोलिस स्टेशन हद्दीतील वेगवेगळ्या गावांमधील त्यांच्या घरातून ताब्यात घेण्यात आले. त्यांनी फेसबुकवर एक व्हिडीओ पोस्ट केला. यामध्ये ते गारो भाषेत ओरडताना, भारताविरुद्ध घोषणाबाजी करताना आणि पाकिस्तानला पाठिंबा देताना दिसत होते. जिल्हा प्रशासनाने १५ मे रोजी दोघांविरुद्ध दाखल केलेल्या एफआयआरच्या आधारे, त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.



शेतकरी आणि बगळे यांचे अगदी जवळचे नाते आहे. शेतात नांगरणी सुरू असो वा डवरणी, खाद्य मिळण्याच्या आशेने हे पक्षी मागोमाग येत असतात.

# सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी शिर्डी येथे घेतले साईदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**शिर्डी, दि. १८ मे-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी आज शिर्डी येथे साईबाबांचे दर्शन घेतले.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी रविवार दि. १८ मे रोजी शिर्डी येथे श्री साईबाबा यांचे दर्शन तसेच साईबाबा समाधी मंदिरात श्रींचे पाद्यपुजन केले. शिर्डी विमानतळ येथून नाशिकला जाण्यापूर्वी ते साई मंदिरात आले होते. होती. मंदिर परिसरात आगमन होताच मुख्यकार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर ( खड) भिमराज दराडे, यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी त्यांनी द्वारकामाई, समाधी मंदिर व गुरुस्थान येथेही दर्शन घेतले. साई मंदिरात संस्थान अधिकाऱ्यांनी श्री साई मूर्ती , श्री साई चरित्र उदी प्रसाद आणि शाल श्रीफळ देऊन सरसंघचालकांचा सत्कार केला.

यावेळी सरसंघचालक भागवत यांनी आपल्या अभिप्रायात,१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर भारताच्या नवोत्थानाचा पाया या नात्याने भारतभर समाजाचे प्रबोधन, अध्यात्म तत्व आणि व्यवहार या मूलभूत घटकाचे ज्या ईश्वरीय योजनेने झाले त्याचा एक भाग म्हणजे शिर्डीचे साईबाबा होत. देह त्यागानंतरही त्यांची तपस्या अनेकांना पथ दर्शक ठरते ही प्रचिती आहे. अशा श्री बाबांचा समाधी मंदिराचा नित्य कार्य विकास व त्याचे नित्य उत्तम व्यवस्थापन करणाऱ्या सर्व कार्यकर्ता मंडळींचे कृतज्ञतापूर्वक धन्यवाद.' अशा भावना व्यक्त केल्या.

यावेळी सराला बेटाचे महंत परमपूज्य श्री रामगिरीजी महाराज यांनी सरसंघचालक यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळीउत्तर नगर जिल्हा संघचालक किशोर निर्मळ उपस्थित होते.

# पाकिस्तानच्या हातचे खेळणे होणे थांबवा

### राहुल गांधीवर भाजपाची टीका

**नवी दिल्ली, १८ मे**

सोशल मीडियावर फेक न्यूज प्रसारीत करून पाकिस्तानच्या हातचे खेळणे होणे थांबवा, अशी टीका भारतीय जनता पक्षाने केली आहे. अशाच चुकीच्या बातम्यांचा आधार घेत पाकिस्तान भारताविरोधात अपप्रचार करतो, असे भाजपचे प्रवक्ते प्रदिप भंडारी यांनी म्हटले आहे.

परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी ऑपरेशन सिंदूरबाबत पाकिस्तानला पूर्वकल्पना दिल्याचा व्हिडिओ राहुल गांधी यांनी एसवर प्रसारित केला होता. पीआयबीच्या सत्यशोधन पथकाने या व्हिडिओची पडताळणी केली असता तो चुकीचा असल्याचे उघड झाले. यावर ऑपरेशन सिंदूरमुळे काँग्रेस दुःखी झाली आहे काय, असा प्रश्न भंडारी यांनी विचारला आहे. रहुल गांधी हे वारंवार पाकिस्तानची भाषा बोलत असल्याचे भाजपचे नेते अजय अलोक यांनी म्हटले आहे.

**पाकिस्तानला माहिती देणे गुन्हा : राहुल गांधी**

नवी दिल्लीः समाज माध्यम प्लॅटफॉर्म एक्सवर राहुल गांधी यांनी एक पोस्ट केली, ज्यामध्ये त्यांनी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांना लक्ष्य केले आहे. पोस्टमध्ये राहुल म्हणाले, आपल्या हल्ल्याच्या सुरुवातीला पाकिस्तानला माहिती देणे हा गुन्हा होता. परराष्ट्र मंत्र्यांनी हे जाहीरपणे कबूल केले आहे की भारत सरकारने हे केले. याची कोणी परवानगी दिली? परिणामी आपल्या हवाई दलाने किती विमाने गमावली? याबरोबर राहुल यांनी जयशंकर यांचा माध्यमांशी संवाद साधतानाचा व्हिडीओ देखील पोस्ट केला आहे.

दरम्यान परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात माहिती दिली आहे की, परराष्ट्र मंत्र्यांनी म्हटले होते की आम्ही सुरुवातीलाच पाकिस्तानला इशारा दिला होता, जो की स्पष्टपणे ऑपरेशन सिंदूर सुरू झाल्यानंतरचा सुरुवातीचा टप्पा आहे. हे ऑपरेशन सुरू होण्यापूर्वीचे असल्याचे दाखवले जात आहे. वास्तविकता पूर्णपणे चुकीच्या पद्धतीने दाखवली जात असल्याचे दिसून येत आहे. (वृत्तसंस्था)

# 'वामपंथी दीमको के विरुद्ध वैचारिक युद्ध' पुस्तकाचे प्रकाशन

**नवी दिल्ली, १८ मे**

नवीन महाराष्ट्र सदन येथे 'वामपंथी दीमको के विरुद्ध वैचारिक युद्ध' या पुस्तकाचा प्रकाशन कार्यक्रम पार पडला. डाव्या विचारसरणीच्या हानिकारक आणि विनाशकारी प्रभावाविरुद्ध एक शक्तिशाली वैचारिक युद्ध घोषित करण्यात आले. या विचारसरणीची तुलना भारतीय संस्कृती आणि समाजाला खाऊन टाकणाऱ्या वाळवीशी केली जाते. या कार्यक्रमात अभिजित जोग यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. यात डाव्या विचारसरणीच्या उत्क्रांती आणि आधुनिक स्वरूपाचे विश्लेषण केले आहे.




या कार्यक्रमाला राज्यसभा सदस्य आणि भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते डॉ. सुधांशू त्रिवेदी यांच्यासह सुरूची प्रकाशनचे अध्यक्ष राजीव तुली, पांचजन्यचे संपादक हितेश शंकर आणि माय होम इंडियाचे संस्थापक सुनील देवधर आणि अनेक प्रमुख वक्ते उपस्थित होते. डाव्या विचारसरणीचे लोक अनेकदा दावा करतात की सत्ता कोणाचीही असो, व्यवस्था त्यांच्या नियंत्रणा खाली आहे, असे सुरूची प्रकाशनाचे अध्यक्ष राजीव तुली म्हणाले. विचारसरणी जिथे पसरली आहे तिथे तिने यजमान देशाला वाळवीसारखे खाऊन टाकले आहे, असे पांचजन्यचे संपादक हितेश शंकर म्हणाले. त्यांच्या प्रमुख भाषणात डाव्या विचारसरणीच्या ऐतिहासिक आणि समकालीन प्रभावाचे विश्लेषण केले. उदारमतवाद आणि प्रगतीवादाच्या वेषात अनेकदा सादर केलेल्या या विचारसरणीने विविध समाजांचे मोठे नुकसान केले आहे आणि आता भारताच्या सांस्कृतिक पायासाठी गंभीर धोका निर्माण केला आहे, असा युक्तिवाद त्रिवेदी यांनी केला.

मराठीत आधीच सर्वाधिक विक्री होणारी ही पुस्तके आता सुरुची पब्लिकेशन्सद्वारे हिंदी आणि इंग्रजीमध्ये प्रकाशित केली जातात. प्रकाशकांनी ही पुस्तके विस्तृत प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेवर भर दिला. (तभा वृत्तसेवा)

# सोलापुरात अग्नितांडव; ८ जणांचा...

पान १ वरून...

आत जाण्यात अडचणी येत होत्या. पत्रे तापलेले होते. त्यामध्ये अग्निशामक दलाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे हात भाजले. बीए सेटचा वापर करून आत जावे लागले. कारखान्यात सूत असल्याने फोमचा वापरही करण्यात आला. रेस्क्यू व्हॅनही होती, असे यावेळी अधीक्षक राकेश साळुंखे यांनी सांगितले.

**चीफ फायर ऑफिसर व कर्मचारी अंशतः भाजले**

या कारखान्याला लागलेल्या आग भीषण होती. युद्ध पातळीवर अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी आग विझवण्याचा शर्तीने प्रयत्न केला. आगीमुळे कारखान्यातील पत्रे ही तापले होते. उष्णता मोठ्या प्रमाणात होती. यामध्ये सोलापूर महापालिकेचे चीफ फायर ऑफिसर (अधीक्षक) राकेश साळुंखे व एक फायर कर्मचारी आगीवर नियंत्रण मिळवताना अंशतः भाजले. त्यांच्या हातांना जखमा झाले आहेत. आग आटोक्यात आणण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणानी प्रयत्न केले असल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी दिली.

**सर्वच विभागाने चिंतन करण्याची गरज : आ. सुभाष देशमुख**

दरम्यान, आगीच्या घटनास्थळी दक्षिण सोलापूरचे आ. सुभाष देशमुख यांनी भेट दिली. एमआयडीसी परिसरात सातत्याने अशा दुर्घटना घडत आहेत. ही गंभीर बाब आहे. येथील रस्ते चांगले नाहीत. लाईटची दुरावस्था आहे. सर्वच प्रशासकीय विभागाने चिंतन करण्याची गरज आहे. अशा दुर्घटना घडू नये यासाठी काळजी घेण्याची आवश्यकता आहे. शासनानेही याकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. त्याचबरोबर कारखानदारांनीही दक्षता घेतली पाहिजे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, नगर विकास आणि ऊर्जा विभागाने अशा दुर्घटना का घडतात याची चौकशी करण्याची गरज आहे. कामगार व कारखानदार असुरक्षित आहेत, अशी प्रतिक्रिया आ. सुभाष देशमुख यांनी दिली.

**याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करणार : माजी आ. आडम**

माकपचे माजी आ. नरसय्या आडम यांनीही



घटनास्थळी भेट दिली. सेंट्रल इंडस्ट्री या कारखान्याला भीषण आग लागली. या ठिकाणी टॉवेल उत्पादन होते. वेळेवर अग्निशामक दलाची गाडी आली नसल्याचा आरोप लोकांनी केला आहे. यामुळे या प्रकरणी चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याचे माजी आ. आडम यांनी सांगितले.

**महापालिकेकडे ऑक्सीजनसह अत्याधुनिक यंत्रणा नाही : बाबा मिस्त्री**

घटनास्थळी परिस्थिती पाहता सोलापूर महापालिका अग्निशामक दलाकडे अत्याधुनिक यंत्रणा नाही. ऑक्सिजनसह इतर सक्षम यंत्रणा गरजेची आहे. त्यामुळे हवे तेथे तत्काळ या दलाला पोहोचता आले नाही, असा आरोप माजी नगरसेवक बाबा मिस्त्री यांनी सांगितले.

**बचाव कार्यात कर्मचाऱ्यांसह अग्निशामक दलाचे प्रमुख राकेश साळुंखे आघाडीवर**

एकीकडे अग्निशामक दलाच्या गाड्यांनी पाणी फवारणी करून आग आटोक्यात आणण्याचे शर्तीचे प्रयत्न करत होते तर दुसरीकडे बचाव कार्यात कर्मचाऱ्यांसह अग्निशामक दलाचे प्रमुख राकेश साळुंखे हे थेट आघाडीवर होते. यामध्ये साळुंखे आणि एका कर्मचाऱ्याचा हात भाजला. तशाही परिस्थितीत ते कर्तव्य बजावत होते. सोलापूर शासकीय रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले.

**आणि कुलिंग ऑपरेशन करण्यात आले**

दरम्यान सायंकाळी सहाच्या सुमारास येथील आग नियंत्रणात आणण्यात अग्निशामक दलाला यश आले. दरम्यान अचानक पुन्हा आग भडकली. या कारखान्यातील केमिकलचा डबा पेटल्याने ही आग पुन्हा भडकली असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर या ठिकाणी अग्निशामक दलाकडून कुलिंग ऑपरेशन करण्यात आले.

**महापालिका अग्निशामक दलासह १० गाड्यांचा वापर**

कारखान्याला लागलेली आग विझवण्यासाठी सोलापूर महापालिका अग्निशामक दलाच्या ६ गाड्या, पंढरपूर नगरपरिषदेची एक, अक्कलकोट नगर परिषदेची एक, एनटीपीसी कंपनीची एक, चिंचोळी एमआयडीसीची एक अशा एकूण १० गाड्यांचा वापर करण्यात आला. त्याचबरोबर महापालिकेकडून टँकरनेही पाणी पुरवठा करण्यात आला, असे अग्निशामक दलाचे प्रमुख राकेश साळुंखे यांनी सांगितले.

**या अधिकाऱ्यांनी दिली भेट**

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील आगीच्या घटनास्थळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

# उजनीतील गाळ काढा, १४ टीएमसी पाणी वाढेल

## खा. मोहिते-पाटील : पर्यटन केंद्र मार्गी लावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

उजनीत गाळ व वाळू काढल्यास १४ टीएमसी पाणी वाढेल, अशी सूचना आमदार नारायण पाटील यांनी मांडली. उजनी धरण परिसरात पर्यटन केंद्र दोन विभागामुळे रखडले आहे. त्यावर तोडगा काढा, अशी मागणी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केली. त्यावर बुधवारी जलसंपदा मंत्र्यांसोबत बैठक लावण्यात आली आहे, तेथे प्रश्न मांडू असे पालकमंत्री गोरे यांनी बैठकीत सांगितले.

नियोजन भवन येथील सभागृहात जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत झाली. प्रास्तावित केलेला निधी वेळेत करू खर्च करू शकणार नाहीत त्याची सर्वस्वी जबाबदारी त्या यंत्रणा प्रमुखाची असेल असे पालकमंत्री म्हणाले.

आमदार आवताडे यांनी मंगळवेढा तालुक्यासाठी म्हैसाळ योजनेचा प्रश्न मांडला. तर डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी मान नदीत पाणी सोडण्याची मागणी केली. जिल्हा वार्षिक योजनेचे सन २०२५ -२६ मध्ये ८५७.८४ कोटी निधीच्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच पुढील वर्षासाठी अनुसूचित जाती उपयोजना १४७ कोटी, आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना ५.४४ कोटी असे एकूण ९३५.४४ कोटींचा निधी मंजूर केला आहे. सदरचा निधी शासकीय अधिकाऱ्यांनी वेळेत खर्च करावा, तसे नाही झाल्यास अधिकाऱ्यांवर कारवाई करू, , असे पालकमंत्री म्हणाले. वार्षिक योजनेतून जलसंधारणासाठी ५९.५० तर कृषीसाठी ५१ कोटी रुपयांची तरतूद ( रक्कम कोटीत) सोलापुरातील नियोजन भवनात झालेल्या नियोजन समितीच्या बैठकीत आमदार समाधान आवताडे यांनी विविध प्रश्न धसास लावले. .सर्वसाधारण योजना - ७८३ .अनुसूचित जाती उपायोजना - १४७ .आदिवासी क्षेत्राबाहेरील उपायोजना - ५.४४ कृषी व संलग्नसेवा - ५१.२६ ग्रामीण क्षेत्राच्या विकासाच्या योजना - ६४ जलसंधारण विभागाच्या योजना - ५९.५० ऊर्जा विकास - ६७ शिक्षण विभाग -४२ महिला व बाल विकास - २१.०८ आरोग्य सेवांचे बळकटीकरण - ५०.१५ नगर विकास -१३० रस्ते व परिवहन - ७३.५० पर्यटन, तिर्थक्षेत्र,गड किल्ले, संरक्षित स्मारके संवर्धन व विकास -४९.९३ पोलिस व तुरुंग व्यवस्थेचे बळकटीकरण -२३.०८ दिव्यांगांकरीता १ टक्के राखीव - ७


**बालाजी ज्वेलर्स,**
**खामला, नागपूर**
**सराफा**
सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) ९३,६०० रु.
चांदी (प्रतिकिलो) ९६,३०० रु.
मो. 9373107772

**तापमान**

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३६.८ | २३.४ |
| अमरावती | ३८.४ | २१.५ |
| भंडारा | ३६.६ | २७.० |
| बुलडाणा | ३५.४ | २४.२ |
| चंद्रपूर | ४१.० | २६.४ |
| गडचिरोली | ३९.२ | २४.६ |
| गोंदिया | ३७.६ | २०.५ |
| नागपूर | ४०.८ | २८.० |
| वर्धा | ३९.५ | २६.८ |
| वाशीम | ३८.० | -.- |
| यवतमाळ | ३९.० | २५.० |

# इस्रायलचा गाझावर प्रहार, ७५ नागरिकांचा मृत्यू

## ओलिसांच्या सुटकेसाठी हमासवर वाढविला दबाव



◆ **देइर अल बलाह, १८ मे**

दहशतवादी संघटना हमासच्या ताब्यात असलेल्या नागरिकांच्या सुटकेसाठी इस्रायलने गाझा पट्टीत सलग सहाव्या दिवशी शनिवारी रात्री जोरदार हल्ले केले. यात ७५ नागरिकांचा मृत्यू झाला, तर शंभरपेक्षा अधिक जण जखमी आहे.

गाझाच्या आरोग्य विभागाने रविवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, देइर अल-बलाहसह अनेक भागात शनिवारी रात्री इस्रायलच्या लष्कराने हवाई हल्ले केले, यात ७५ जणांचा मृत्यू झाला. या हल्ल्यात शंभरपेक्षा अधिक जण जखमी असून त्यांच्यावर खान युनूस येथील नासेर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हल्ल्यासंदर्भात इस्रायली सैन्याकडून कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. बजाव पथकाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, मुवासी परिसरातील विस्थापित कुटुंबांच्या घरांवर आणि तंबूंवर रात्रीच्या वेळी अनेक हवाई हल्ले करण्यात आले. नागरिक झोपेत असताना हे हल्ले झाले. मृतांमध्ये जबालिया निर्वासित छावणीत राहणाऱ्या एकाच कुटुंबातील नऊ सदस्यांचा समावेश आहे. हल्ल्यानंतर जखमींना रुग्णालयात नेले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ७५ नागरिकांच्या मृत्यूची पुष्टी केली.

**जबालिया शहरात सर्वाधिक नुकसान**

हमास संचालित सरकार अंतर्गत काम करणाऱ्या शहरी संरक्षण विभागाने म्हटले की, हवाई हल्ल्यात जबालिया शहराचे सर्वाधिक नुकसान झाले. जबालिया येथील बेरावी कुटुंबाच्या घरावर झालेल्या एका हल्ल्यात सात मुले आणि एका महिलेसह १० जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन पालक आणि त्यांची तीन मुले आणि एक वडील आणि त्याची चार मुले यांचा समावेश आहे. मध्य गाझामध्ये, देइर अल बलाह शहरातील अल अक्सा शहीद रुग्णालयाच्या म्हणण्यानुसार, दोन वेगवेगळ्या हल्ल्यांमध्ये किमान १० जणांचा मृत्यू झाला. ज्यामध्ये दोन पालक आणि त्यांच्या मुलाचा समावेश आहे. ◂(वृत्तसंस्था)

# रशियाने युक्रेनवर डागले २७३ ड्रोन

### आतापर्यंतचा सर्वात मोठा हवाई हल्ला ● जीव वाचविण्यासाठी पळापळ



◆ **कीव, १८ मे**

युद्धबंदी प्रस्तावावर झालेली चर्चा निष्फळ ठरल्यानंतर रशियाने युक्रेनची राजधानी असलेल्या कीवचा मध्य प्रदेश आणि निप्रोपेट्रोव्हस्कसह डोनेत्स्क प्रदेशांच्या पूर्वेकडील भागांत शनिवारी रात्री एकाचवेळी २७३ ड्रोन डागले. यापैकी ८८ ड्रोन हवेतच नष्ट करण्यात आले. ड्रोन हल्ल्याने युक्रेनच्या विविध शहरात भीतीचे वातावरण आहे. युक्रेनच्या लष्कराने हल्ल्यात पाच नागरिकांचे मृत्यू आणि ५० पेक्षा अधिक जण जखमी असल्याची पुष्टी केली. युद्ध सुरू झाल्यापासून युक्रेनवर झालेला हा सर्वात मोठ हल्ला असल्याचे सांगण्यात येत आहे.

युक्रेनियन हवाई दलाने सांगितले की, रशियन सैन्याने निवासी भागात २७३ ड्रोन एकाचवेळी डागले, यापैकी ८८ ड्रोन हवेतच नष्ट करण्यात आले. कीव प्रदेशात झालेल्या हल्ल्यात एका महिलेचा मृत्यू झाला आणि २५ पेक्षा लोक जखमी आहे. या हल्ल्यात अनेक निवासी इमारतींचेही नुकसान झाले.

यापूर्वी फेब्रुवारी २०२५ मध्ये रशियाने २६७ ड्रोन हल्ले केले होते, जे त्यावेळचा विक्रम होता. दोन दिवसांपूर्वी इस्तंबूलमध्ये रशिया आणि युक्रेनमधील शांतता चर्चा तीन वर्षांनी अयशस्वी झाली.

दोन्ही बाजूंनी केवळ कैद्यांची देवाणघेवाण करण्यावर सहमती दर्शविली, परंतु युद्धबंदीवर कोणताही करार होऊ शकला नाही. दरम्यान युक्रेनच्या लष्कराने कीव आणि आसपासच्या भागात नऊ तास हवाई हल्ल्याचा इशारा दिला आहे. रशियाने दबाव आणण्यासाठी युद्धाचा अवलंब केला असल्याचे युक्रेनच्या डिसइन्फॉर्मेशन सेंटरचे प्रमुख आंद्रेई कोवालेन्को यांनी सांगितले. यापूर्वी शुक्रवारी रात्रीदेखील रशियाने युक्रेनच्या सुमी प्रदेशात एका प्रवासी बसवर ड्रोन हल्ला केला होता, ज्यामध्ये नऊ नागरिकांचा मृत्यू झाला.

**रक्तरंजित खेळ थांबवा : डोनाल्ड ट्रम्प**

युक्रेनमधील हवाई हल्ल्याचा निषेध करताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, रशियाने युक्रेनमधील रक्तरंजित खेळ तातडीने थांबवला पाहिजे. मी लवकरच युद्धबंदीसाठी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी चर्चा करणार आहे. दरम्यान युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी नाटो सदस्यांशी बोलण्याची योजना आखली आहेत.

**युरोपीय देशांनी कठोर निर्बंध लावावेः झेलेन्स्की**

हल्ल्यावर संतप्त झालेले झेलेन्स्की म्हणाले की, युरोपीय देशांनी रशियावर कठोर निर्बंध लादले पाहिजे, जेणेकरून त्यांना युद्धबंदीसाठी सहमती दर्शविण्यास भाग पाडले जाईल. रशिया निवासी भागात हल्ले करून नागरिकांना लक्ष्य करीत आहे. आम्ही त्यांना लवकरच जशास तसे प्रत्युत्तर देण्यासाठी सज्ज आहे. ◂(वृत्तसंस्था)

# पाकमध्ये मूठभर नव्हे २४ कोटी दहशतवादी

### पाटण्याचे शिक्षक खान सर यांचे विधान

◆ **नवी दिल्ली, १८ मे**

पहलगाम हल्ल्याबाबत भारतीय सैन्याने सुरू केलेल्या ऑपरेशन सिंदूरवर पाटण्याचे प्रसिद्ध शिक्षक खान सर यांचे एक विधान व्हायरल होत आहे. पाकिस्तानकडून सुधारणा अपेक्षित आहे, परंतु हे शक्य नाही. मुठभर दहशतवाद्यांना मारून काहीही साध्य होणार नाही, असे यामध्ये त्यांनी म्हटले आहे. त्यांनी पाकिस्तानच्या संपूर्ण जनतेला दहशतवादी म्हटले. पाकिस्तानात २४ कोटी दहशतवादी राहतात, असे ते म्हणाले.

आपला एक गैरसमज आहे की आपण पाकिस्तानमधून दहशतवाद्यांचा खात्मा करू. जर एकही पाकिस्तानी जिवंत असेल तर तो दहशतवादी आहे. पाकिस्तानात काही चांगले लोकही राहतात या गैरसमजातून स्वतःला मुक्त करा. सरकारला पाकिस्तानचे अधिक नुकसान करायचे होते. त्यांचे सर्व विमानतळ उध्वस्त करायला पाहिजे होते. यामुळे तेथील लोकांना हे लक्षात आले असते की पाकिस्तानने निश्चितच चूक केली आहे. त्यांच्या विधानाचा व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. ◂(वृत्तसंस्था)

**कुत्रा तरी निष्ठावंत प्राणी**

यापूर्वी एका पॉडकास्ट दरम्यान पाकिस्तानच्या नकाशाची तुलना कुत्र्याशी करण्यात आली होती. कुत्रा अजूनही निष्ठावान आहे, पण पाकिस्तान नाही. राज शर्मांनी यांच्यासोबतच्या पॉडकास्ट दरम्यान त्यांनी विविध मुद्द्यांवर आपले विचार व्यक्त केले. त्यांनी भारताच्या चीन आणि पाकिस्तानशी असलेल्या संबंधांबद्दलही भाष्य केले. खान सरांनी असेही म्हटले की हा कुत्र्याचा अपमान आहे. कारण तो एक निष्ठावंत प्राणी आहे. ■

# ट्रम्प प्रशासनात दोन जिहादी झाले व्हाईट हाऊसचे सल्लागार

◆ **वॉशिंग्टन, १८ मे**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनात दोन दहशतवाद्यांच्या नियुक्तीने जगभरात खळबळ उडाली आहे. त्यांना व्हाईट हाऊसच्या ले लीडर्स ॲडव्हायझरी बोर्डावर ठेवण्यात आले आहे. त्यापैकी एक दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबाशी संबंधित आहे. जी काश्मीरसह भारतातील अनेक ठिकाणी झालेल्या दहशतवादी हल्लांसाठी जबाबदार आहे. दोन्ही जिहादींच्या नियुक्तीबाबतची माहिती व्हाईट हाऊसच्या वेबसाइटवरही प्रसिद्ध करण्यात आली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडेच ले लीडर्स ॲडव्हायझरी बोर्ड या नवीन समितीची घोषणा केली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनात दोन दहशतवाद्यांच्या नियुक्तीने ही समिती धार्मिक स्वातंत्र्य आणि श्रद्धेवर आधारित धोरणांवर सल्ला देण्याचे काम करेल. या समितीमध्ये, अशा दोन मुस्लिमांना विद्वान म्हणून समाविष्ट करण्यात आले. यापैकी एकाचे लष्कर-ए-तैयबा सारख्या दहशतवादी संघटनांशी थेट संबंध आहेत. ◂(वृत्तसंस्था)

## बांगला अभिनेत्रीला ढाक्यात अटक

**ढाका, १८ मे**

माजी पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांची भूमिका साकारणारी बांगलादेशची अभिनेत्री नुसरत



फारियाला हत्येच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. ढाका विमानतळावर येताच अटकेची कारवाई केली. मुजीबः द मेकिंग ऑफ द नेशन या बायोपिकमध्ये नुसरतने हसीना यांची भूमिका साकारली होती. आज नुसरत थायलंडला जाण्यासाठी विमानतळावर आली असता तिला अटक करण्यात आली आहे. २०२४ मध्ये बांगलादेशात झालेल्या जनआंदोलनादरम्यान हत्येचा प्रयत्न केल्याचा आरोप तिच्यावर लावण्यात आला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# पक्षफुटीमागे सत्ताधारी भाजपाचा हात : आप

### १५ नगरसेवकांनी स्थापन केला नवीन पक्ष

### मुकेश गोयल यांच्याकडे नवीन पक्षाचे नेतृत्व

◆ **नवी दिल्ली, १७ मे**

या पक्षफुटीमागे सत्ताधारी भाजपाचा हात असल्याचा आरोप आपने केला आहे. आमच्या नगरसेवकांना 'घोडेबाजार' म्हणून प्रत्येकी पाच कोटी रुपयांची ऑफर देण्यात आली आहे, असा आरोप सुद्धा आपने केला आहे. भाजपाच्या दिल्ली विभागाने हा आरोप फेटाळून लावला आहे.

विकासाला अडथळा आणणाऱ्या व भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देणाऱ्या आपच्या धोरणांना कंटाळल्याचे सोडून गेलेल्या नगरसेवकांनी स्वतःच स्पष्ट केले आहे, असे भाजपाने म्हटले आहे.

दिल्ली महानगरपालिकेत आम आदमी पार्टीला मोठा धक्का बसला आहे. रखडलेली विकासकामे व वाढत्या अंतर्गत असंतोषामुळे शनिवारी १५ नगरसेवकांनी पक्षातून राजीनामा दिला व इंद्रप्रस्थ विकास पक्ष या नवीन संघटनेची स्थापना केली.

आमच्या निवडणुकीनंतर अडीच वर्षांत कोणतेही विकासकाम झालेले नाही. पक्ष (आप) अंतर्गत संघर्ष व आरोप-प्रत्यारोपांमध्ये व्यस्त होता, असे त्यांनी वृत्तसंस्थेला सांगितले. नगरसेवकांना विकासकामांसाठी बजेट दिले जात नाही असा दावा त्यांनी केला.

वरिष्ठ नगरसेवक मुकेश गोयल हे नवीन पक्षाचे नेतृत्व करतील. नवीन संघटनेचे उद्दिष्ट सार्वजनिक कल्याण व एमसीडीच्या सुरळीत कामकाजावर



लक्ष केंद्रित करणे आहे. हे पाऊल केवळ नागरी संस्थेपुरते मर्यादित आहे व राज्यस्तरीय राजकारणासाठी नाही, असे ते म्हणाले.

**आपचा 'भ्रष्टाचार व हुकूमशाही कारभार' चव्हाट्यावर : महापौर सिंग**

या घडामोडीमुळे आम आदमी पार्टीतील 'भ्रष्टाचार आणि हुकूमशाही कारभार' चव्हाट्यावर आला आहे, अशी प्रतिक्रिया दिल्लीचे महापौर सरदार राजा इक्बाल सिंग यांनी आप नगरसेवकांच्या राजीनाम्यावर व नवीन राजकीय संघटनेच्या स्थापनेवर व्यक्त केली.

२०२२ च्या नागरी निवडणुकीत आपच्या नेतृत्वाने खोटी आश्वासने देऊन नागरिकांची दिशाभूल केली, स्वच्छतेसारख्या मूलभूत सेवा देण्यात अपयशी ठरले व स्वतःच्या नगरसेवकांना स्वतंत्र निर्णय घेण्यापासून रोखले, असा आरोप त्यांनी केला आहे.

आपच्या अंतर्गत भ्रष्टाचार, ज्यामध्ये पक्षाच्या नेत्यांसाठी पैसे गोळा करण्यासाठी नगरसेवकांवर दबाव आणणे समाविष्ट आहे, यामुळे दिल्लीतील सर्व अर्थपूर्ण विकास थांबला आहे, असा दावा सिंग यांनी केला आहे.

आपने दिल्लीतील लोकांना व महानगरपालिकेला निराश केले आहे असा पक्षातून स्पष्ट संदेश आपच्याच नगरसेवकांनी केलेल्या या बंडामुळे मिळतो, असे ते म्हणाले.

२०२२ च्या निवडणुकीपासून आपच्या नेत्यांनी महापालिका प्रशासन चालवले नाही किंवा त्यांच्याशी समन्वय साधला नाही. भाजपाचा त्याच्याशी काहीही संबंध नाही. 'आप' सोडलेल्या नगरसेवकांनी असे स्पष्ट केले आहे, असे दिल्ली भाजपाचे अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)


## चित्रपट वार्ता

### जारण चित्रपटाचा टीझर प्रदर्शित




**मुंबई** : जारण चित्रपटाच्या थरारक पोस्टर्सने प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण केली होती. आता चित्रपटाचा अंगावर शहारे आणणारा टीझर प्रदर्शित झाला आहे. 'भूतकाळातून सुटका अशक्य आहे' या वाक्यातून त्यामागचे धक्कादायक गूढ या टीझरमध्ये दिसते. हा चित्रपट ६ जूनला प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन हृषीकेश गुप्ते यांनी केले. अमोल भगत, नितीन कुलकर्णींची निर्मिती आहे. चित्रपटात अभिनेत्री अमृता सुभाष व अनिता दाते यांच्या प्रमुख भूमिका असून किशोर कदम, राजन भिसे, अवनी जोशी, सीमा देशमुख दिसणार आहे. ■

### टॉम क्रुझने व्यक्त केले हिंदीतून प्रेम



**मुंबई** : हॉलिवूडचा प्रख्यात अभिनेता टॉम क्रुझने बॉलिवूड विषयी प्रेम व्यक्त केले. एका मुलाखती दरम्यान त्यांने हिंदीत काही वाक्य बोलत आपल्या भावना व्यक्त केल्या. मै आपसे बहुत प्यार करता हूँ, आय लव्ह यू बॉलिवूड, असे तो म्हणाला. भारतातही टॉम क्रुझ खूपच लोकप्रिय आहे. मला बॉलीवूड मुव्ही खूप आवडतात. बॉलिवूड स्टाईल चित्रपट बनवायलाही आवडेल. भारताविषयी खूप प्रेम आहे. मला भारतात फिल्म बनवायला आवडेल. बॉलिवूड चित्रपटातील हिरो गाणी म्हणतो, डान्स करतो हे खूपच युनिक आहे. असेही तो म्हणाला. ■

### तन्वी द ग्रेट चित्रपटाची स्टारकास्ट जाहीर

**मुंबई** : अभिनेते अनुपम खेर त्यांच्या आगामी तन्वी द ग्रेट चित्रपटाबद्दल उत्सुक आहेत. त्याच्या चित्रपटाचा वर्ल्ड प्रीमियर कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये झाला. अनुपम खेर यांनी इंस्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये तन्वी द ग्रेट चित्रपटाची स्टारकास्ट दिसते आहे. या व्हिडीओमध्ये शुभांगी दत्त, बोमन इराणी, करण टाकर आणि पल्लवी जोशी दिसत आहेत. व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये अनुपम खेर यांनी कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये तन्वी द ग्रेट प्रदर्शनाच्या वेळी बाकी कलाकारांची आठवण आली, असे लिहिले आहे. ■



# मेक्सिकन जहाज ब्रुकलिन ब्रिजवर धडकले

### मास्ट तुटले, दोघांचा मृत्यू, दोन जखमी

◆ **न्यू यॉर्क, १८ मे**

जागतिक सदिच्छा दौऱ्यावर असलेले मेक्सिकन नौदलाचे जहाज शनिवारी रात्री न्यू यॉर्कमधील ब्रुकलिन ब्रिजवर धडकले. या जहाजाचे तीन मास्ट तुटले व दोन क्रू मेंबर्सना प्राणघातक दुखापत झाली. काही खलाशी मदतीची वाट पाहत हवेत उंच हार्नेसवरून लटकत राहिले.

१४२ वर्षे जुन्या पुलाचे मोठे नुकसान झाले नाही, परंतु अपघातानंतर जहाजातील किमान १९ जणांवर वैद्यकीय उपचार करावे लागले, असे न्यू यॉर्क शहराचे महापौर एरिक ॲडम्स म्हणाले.



मेक्सिकन उंच जहाज ब्रुकलिन ब्रिजवर धडकले, तेव्हाचा क्षण

अधिक गंभीर जखमी झालेल्या चार लोकांपैकी दोघांचा नंतर मृत्यू झाला, असे ॲडम्सने रविवारी सकाळी समाज माध्यमावर जाहीर केले.

अनेक प्रत्यक्षदर्शींनी व्हिडीओंमध्ये कैद झालेल्या दृश्यात, कुआहतेमोक नावाचे जहाज पूर्व नदीच्या ब्रुकलिन बाजूच्या पुलाकडे वेगाने जाताना दिसत आहे. त्यानंतर, त्याचे तीन मास्ट पुलाच्या मुख्य स्पॅनवर आदळले व जहाज पुढे सरकत असताना एक-एक करून तुटले. रात्री ८:२० वाजता झालेल्या टक्करीच्या वेळी स्पॅनवर प्रचंड वाहतूक असल्याचे व्हिडीओंमध्ये दिसून आले.हिरवा, पांढरा आणि लाल रंगाचा एक महाकाय मेक्सिकन ध्वज फडकवत असलेले आणि २७७ लोक प्रवास करत असलेले हे जहाज नदीकाठच्या खांबांकडे वाहून गेले. ◂(वृत्तसंस्था)

# भाजपाला सत्तेवर येण्यास रोखल्यानेच मला अटक

### पुस्तक प्रकाशनप्रसंगी संजय राऊत यांचे वक्तव्य

◆ **मुंबई, १८ मे**

२०१९ मध्ये भारतीय जनता पक्षाला सत्तेवर येण्यापासून रोखल्यानेच मला ईडीने अटक केली, असे वक्तव्य उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी केले आहे. नरकातला स्वर्ग या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते.

मी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्त्वातील महाविकास आघाडी सरकारसाठी संरक्षक भिंत म्हणून उभा होतो. त्यामुळेच मला २०२२ मध्ये मनी लॉन्डरिंग प्रकरणात अटक करण्यात आली. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार चालू द्यायचे असेल तर संजय राऊतला तुरूंगात टाकावे लागेल, यावर त्यावेळी एकमत झाले आणि मला तुरूंगात टाकले, असे राऊत म्हणाले. ईडीने अटक केल्यानंतर तुरूंगातील अनुभवावर संजय राऊत यांनी नरकातला स्वर्ग हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शनिवारी झाला. याप्रसंगी शरद पवार यांच्यासह उद्धव ठाकरे, गीतकार, पटकथालेखक जावेद अख्तर, जयंत पाटील, अनिल देशमुख, तृणमूलचे खासदार साकेत गोखले आदी उपस्थित होते. ◂(वृत्तसंस्था)

# ...तर पाकिस्तानऐवजी मी नरक निवडणार

### जावेद अख्तर यांनी कट्टरपंथींना सुनावले

◆ **मुंबई, १८ मे**

ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांना ईडीने अटक केल्यानंतर १०० हून अधिक दिवस तुरुंगात काढावे लागले. या अनुभवावर आधारित आणि त्यावेळच्या राजकीय घडामोडींचा संदर्भ देणारे 'नरकातला स्वर्ग' हे पुस्तक त्यांनी लिहिले आहे. ज्येष्ठ लेखक, कवी जावेद अख्तर यांच्या हस्ते या पुस्तकाचे रवींद्र नाट्य मंदिर येथे प्रकाशन करण्यात आले. यावेळी जावेद अख्तर म्हणाले माझ्यासमोर नरक आणि पाकिस्तान हे दोन पर्याय राहिल्यास मी नरक निवडेल.

अख्तर पुढे बोलताना म्हणाले, लोकशाहीत संसद, निवडणुका, नेते, वेगवेगळ्या विचारांचे पक्ष आणि प्रामाणिक माध्यमांची गरज आहे. त्याचबरोबर कोणत्याही पक्षाची फिकीर न करता व्यक्त होणाऱ्या नागरिकांचीही आवश्यकता असते. मी त्यातलाच एक व्यक्ती आहे. तुम्ही एकाबाजूने बोलत असाल तर दुसऱ्या बाजूच्या लोकांना नाराज करता. पण तुम्ही सर्वच बाजूंनी बोलायला लागलात, तर अनेकांची नाराजी ओढवून घेता. माझ्याबाबत तसेच होते. मला दोन्हीकडून शिव्या देणारे आहेत. मला दोन्ही बाजूचे कट्टरपंथीय शिव्या घालतात. एका बाजूचे म्हणतात, 'तू काफीर आहेस नरकात जाशील'. तर दुसऱ्या बाजूचे म्हणतात, 'जिहादी तू पाकिस्तानला निघून जा'. आता जर माझ्याकडे पाकिस्तान आणि नरक हे दोनच पर्याय असतील तर मी नरकातच जाणे पसंत करेन. ◂(वृत्तसंस्था)

**३० वर्षांत चार वेळा संरक्षण**

जावेद अख्तर कट्टरपंथीयांच्या उपद्रवाची माहिती देताना म्हणाले की, मी १९ वर्षांचा असताना मुंबईत आलो होतो. आज जो काही आहे, तो मुंबईमुळेच. हे कर्ज मी सात जन्मात उतरवू शकत नाही. मागच्या ३० वर्षांत चार वेळा मला मुंबई पोलिसांनी सुरक्षा पुरविली आहे. त्यातील तीन वेळा मुल्लांनी दिलेल्या धमक्यामुळे संरक्षण दिले गेले. ■

# पीएमएलए कायद्याचा दुरूपयोग होईल हे सांगितले होतेः शरद पवार

◆ **मुंबई, १८ मे**

संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात प्रीव्हेन्शन ऑफ मनी लॉन्डरिंग ॲक्ट कायद्यात ज्या कठोर तरतुदी करण्यात आल्या होत्या त्याचा दुरूपयोग केला जाऊ शकतो, हे मी तेव्हाच सांगितले होते.



सरकार बदलले आणि या कायद्याचा दुरूपयोग सुरू झाला, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस(शरदचंद्र पवार) चे नेते शरद पवार यांनी केले आहे.

उबाठाचे खासदार संजय राऊत यांच्या नरकातला स्वर्ग या पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी मुंबईत झाले. या कार्यक्रमात पवार बोलत होते. भविष्यातही जी जी सरकारे येतील या कायद्याचा दुरूपयोग केला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे या कायद्यात दुरूस्ती करण्याची गरज आहे. तत्कालीन केंद्रीय मंत्री पी. चिदम्बरम यांनी कायद्यातील दुरूस्तीचा प्रस्ताव वाचला. अटक करण्यात आलेल्या व्यक्तीलाच ती दोषी नाही हे सिद्ध करावे लागेल, अशी एक तरतूद कायद्यात आहे. हे कलम भयंकर असून त्याचा दुरूपयोग केला जाऊ शकतो, हे मी तत्कालीन पंतप्रधान दिवंगत मनमोहनसिंग यांना सांगितले होते. पण, तेव्हा माझे कुणीच ऐकले नाही, त्यामुळे जेव्हा राज्य किंवा देशात सरकार बदलेल तेव्हा या कायद्यात सुधारणा गरजेचे आहे, असे पवार म्हणाले. या कायद्याचा मोठ्या प्रमाणात दुरूपयोग होत आहे. युपीएच्या काळात फक्त नऊ राजकीय नेत्यांविरोधात आरोपपत्र दाखल करण्यात आले होते पण यापैकी एकालाही अटक करण्यात आली नव्हती. पण, एनडीए सरकारच्या काळात विरोधकांच्या १९ नेत्यांविरोधात कारवाई करण्यात आली. ◂(वृत्तसंस्था)

**अन् चिदम्बरमच गेले तुरुंगात**

तत्कालीन मंत्री पी. चिदम्बरम यांनी पीएमएलए कायद्यात दुरूस्ती केली. त्यांनी माझे ऐकले असते तर बरे झाले असते. कारण, याच कायद्यांतर्गत त्यांना अटक होऊन तुरूंगात दिवस काढावे लागले, असे पवार म्हणाले. ■

## अग्रलेख...

# आता मुत्सद्देगिरीने पाकिस्तानची कोंडी

पहलगाम येथील बैसरण खोऱ्यात पर्यटकांवर हल्ला करून त्यांचे जीव घेण्याचे अमानुष कृत्य करून आपण फार मोठी चूक केली हे आता पाकिस्तानच्या ध्यानात आले आहे. या सर्व घडामोडींमागे एकच व्यक्ती असल्याचे मानले जात आहे आणि ती म्हणजे पाकिस्तानचे लष्करप्रमुख आसिम मुनीर होय. हा मतप्रवाह केवळ भारतातच नव्हे तर खुद्द पाकिस्तानातही वाहतो आहे. पहलगाम घटनेच्या सहा दिवसांपूर्वी मुनीर यांनी इस्लामाबादमध्ये अनिवासी पाकिस्तानी नागरिकांना संबोधित करताना द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताचे गोडवे गायले. भाषणाला प्रामुख्याने बडे राजकीय नेते, ज्येष्ठ पत्रकार आणि लष्करातील आजी-माजी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. १६ एप्रिलला मुनीर यांनी केवळ भारताविरोधात गरळ ओकली नाही तर हिंदू धर्माला लक्ष्य केले. आपला धर्म, विचार, परंपरा आणि संस्कृती हिंदूंपेक्षा भिन्न असल्यानेच पाकिस्तानची निर्मिती झाली आहे. कलमाच्या आधारावर जगात फक्त दोनच रियासती निर्माण झाल्या आहेत आणि त्या म्हणजे मदिना आणि पाकिस्तान. त्यामुळे आपल्या पूर्वजांनी पाकिस्तान निर्मितीसाठी मोठा त्याग केला असून येणाऱ्या पिढ्यांना पाकिस्तान निर्मितीच्या कथा सांगणे आपल्या सर्वांचे परम कर्तव्य असल्याचे मुनीर तावातावाने सांगत होते. ऐकणारेही आपण काय श्रवण करीत आहोत याचे थोडेही भान न ठेवता मुनीर यांच्या प्रत्येक भारत आणि हिंदुविरोधी वक्तव्यांवर टाळ्या पिटत होते. जणू एखादा मौलवीच प्रवचन देत आहे. त्यांच्या प्रत्येक वाक्यात नुसता हिंदूविरोधी विखार आणि जळफळाट होता. चार-पाच दिवस पाकिस्तानात मुनीर जणू हीरो झाले होते. सोशल मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक्स मीडियात त्यांचे भाषण फिरत होते. आणि त्यांच्या भाषणानंतर सहाच दिवसांनी पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला चढविला. धर्म विचारून केवळ हिंदू पर्यटकांना गोळ्या घातल्या. परंतु, जनरल आसिम मुनीर आणि त्यांचे प्यादे दहशतवादी हे विसरले की त्यांनी बिळात हात घातला आहे. दिल्लीत असलेल्या शक्तिशाली सरकारला डिवचण्याची मोठी चूक मुनीर यांनी केली हे त्यांना ६ मे रोजी पहाटे लक्षात आले. यावेळीही एखादे उरी किंवा बालाकोट होईल आणि आपल्यालाही शक्ती आजमावण्याची संधी मिळेल, असे पाकिस्तानला वाटले असावे. पण, भारतीय लढाऊ विमाने १०० किलोमीटर आतमध्ये घुसून हवाईतळ नष्ट करतील, याची कल्पनाही त्या देशाने केली नसेल. गेल्या दोन अडीच दशकांपासून ज्या लष्कर-ए-तैयबाचा प्रमुख हाफिज सईद आणि जैश-ए-मोहम्मदचा म्होरक्या मौलाना मसूद अजहर यांना पाकिस्तान पोसत होते त्यांच्या बिळातच क्षेपणास्त्रे घुसविण्याची कामगिरी भारताच्या हवाई दलाने केली. मशिदीच्या आड मसूद अजहर आणि हाफिज दहशतवाद्यांचे अड्डे चालवित होते. पण हे अड्डेच नष्ट करण्यात आले. पाण्याचा लोंढा बिळात घुसावा आणि भीतीने बिळातून उंदीर सैरावैरा पळावेत, अशी दहशतवाद्यांची स्थिती झाली होती. पंजाबातील बहावलपूर हा मसूदचा अड्डा तर सीमेपासून शंभर किलोमीटर आत होता. भारतीय विमाने आणि क्षेपणास्त्रे इथपर्यंत येतील, याची कल्पनाही पाकिस्तानी लष्कराने केली नसावी. पण, सत्तेवर जर कणखर आणि पोलादी इच्छाशक्तीचे नेतृत्व असेल तर बहावलपूर असो की मुरिदके, दहशतवाद्यांना त्यांच्या घरात घुसून मारण्याची हिंमत असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखवून दिले आहे. पुलवामा येथील घटनेनंतर भारताने नियंत्रण रेषा पार करीत पाकिस्तानातील बालाकोटवर चढाई केली. त्यावेळीही ३०० च्या आसपास दहशतवादी ठार झाले होते. पण, भारताने केवळ दहा-वीस झाडे पाडली, असे सांगत भारतीय हवाई दलाची खिल्ली उडविली होती. त्यावेळी भारताकडे केवळ सॅटेलाईटच्या माध्यमातून उपलब्ध झालेले पुरावे होते. पण, पाकिस्तानला आणि भारतातील विरोधी गट इंडिया आघाडीला ठोस पुरावे हवे होते. आता पुरावे दाखविण्याची भानगडच ठेवली नाही. सर्व काही लाईव्ह होते. सहा ते दहा मे च्या पहाटेपर्यंत पश्चिमेच्या आकाशात जी दिवाळी सुरू होती ती याची देही याची डोळा पाहिल्याने आता पुरावे मागण्याची सोयच उरली नाही.

पहलगाम घटनेनंतर भारताने पाकिस्तानविरोधात लष्करी उपाययोजना तर केल्याच पण आंतरराष्ट्रीय मंचावर शेजाऱ्याला उघडे-नागडे करण्याचे धोरणही स्वीकारले. पहलगामनंतर पाकिस्तानने हवाई तळे, दोन-चार विमाने, शेकड्यांनी ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रे तर गमावलीच पण सोबत सिंधू आणि तिच्या उपनद्यांचे हिमालयातून वाहत येणारे शुद्ध, शीतल आणि गोड पाणीही गमावले. जगात अब्रू गमावली ती वेगळीच. पण, ज्या दहशतवादाच्या बळावर गेल्या तीन दशकांपासून भारताला रक्तबंबाळ करण्याचे काम पाकिस्तान करीत आहे तो पाकड्यांचा दहशतवादच जगासमोर मांडण्याचा निर्धार मोदी सरकारने केला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर अवघा भारत राजकीयदृष्ट्या एकवटला. सरकारच्या पाकिस्तानविरोधातील प्रत्येक कारवाईला पाठिंबाही दिला. एवढेच नव्हे तर आता पाकिस्तानवर थेट लष्करी कारवाई करा, असा सल्लाही काँग्रेस आणि त्यांचे सहकारी पक्ष देऊ लागले. पंतप्रधान नरेंद्र मोदी पहिल्या दिवसापासूनच प्रत्येक निर्णय आणि घडामोडींची माहिती विरोधी पक्षांना देत होते. लोकशाही प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक असलेल्या विरोधकांनाही निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेतले. त्याचाच एक भाग म्हणून जागतिक पातळीवर पाकिस्तानचा दहशतवाद चव्हाट्यावर आणण्यासाठी आणि ऑपरेशन सिंदूर किती आवश्यक होते हे जागतिक समुदायांच्या लक्षात आणून देण्यासाठी नेत्यांची सात शिष्टमंडळे विविध देशांमध्ये पाठविण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. या सातही शिष्टमंडळाचे नेतृत्व सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील खासदारांकडे देण्यात आले आहे. देशाचे सार्वभौमत्व आणि अखंडतेला जेव्हा धोका निर्माण होतो तेव्हा सर्व राजकीय पक्ष एका सुरात बोलतात आणि हेच आपल्या लोकशाही व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. यापूर्वीही असे प्रसंग आले आहेत. १९९४ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी तत्कालीन विरोधी पक्षनेते अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली जिनेव्हा येथे शिष्टमंडळ पाठविले होते. जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारूख अब्दुल्ला आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सलमान खुर्शिद यांचा शिष्टमंडळात समावेश होता. मुंबईत १९९३ मध्ये झालेल्या मुंबई साखळी बॉम्बस्फोटात पाकिस्तानच्या सहभागाचे पुरावे घेऊन वाजपेयींच्या नेतृत्वात शिष्टमंडळ गेले होते. भारताच्या या दाव्याचा विरोध म्हणून पाकिस्तानने युनोच्या मानवी हक्क आयोगात एक ठराव आणला होता ज्यात भारत जम्मू-काश्मिरात मानवी हक्कांचे उल्लंघन करीत असल्याचा आरोप केला होता. अटलबिहारी वाजपेयी यांनी युनोत जोरदार युक्तिवाद करीत भारताची बाजू अतिशय प्रभावीपणे मांडली. परिणामी पाकिस्तानने मांडलेला ठराव साफ फेटाळला गेला. आताही जवळपास अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. दहशतवादाचा पाठीराखा असलेल्या पाकिस्तानमुळे दक्षिण आशियात अशांतता निर्माण झाली आहे. शेजारी देशात आजही भारताला हवे असलेले दहशतवादी उघडपणे वावरत आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी पाकिस्तान सरकार आणि लष्कर त्यांचे संरक्षण करण्यात गुंतलेले आहे, हे उघड करण्याची जबाबदारी या सात शिष्टमंडळांवर सोपविण्यात आलेली आहे. पाकिस्तानात फोफावत असलेला दहशतवाद हा केवळ क्षेत्रीय नव्हे तर जागतिक मुद्दा आहे. पाकिस्तान लष्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहम्मद, अल-कायदा, हक्कानी नेटवर्कला पाठीशी घालणारा पाकिस्तान हा केवळ भारतातीलच नव्हे तर अमेरिका, इंग्लंड, अफगाणिस्तान आदी देशांमधील दहशतवादी कारवायांमध्येही पाकिस्तानचाच हात असल्याचे जगाला दाखविले जाणार आहे. मतमतांतरे असली तरी देशावर जेव्हा संकटाचे ढग जमू लागतात तेव्हा सर्व राजकीय पक्ष आपसातील मतभेत विसरून एकत्र येतात आणि भारतातील लोकशाही तंत्र सशक्त असल्याचा संदेशही जगाला दिला जाईल, हा इतिहास आहे व वर्तमानातही तसाच संदेश भारतीय शिष्टमंडळे देतील यात काहीच शंका नाही. पहलगाम हल्ल्यानंतर जगाला भारताची लष्करी शक्ती तर दिसून आलीच पण राजनैतिक पातळीवरही भारत तेवढ्याच सशक्तपणे मार्गक्रमण करीत असल्याचे सिद्ध होणार आहे. ▮

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# पाकिस्तान चीनचा मुखवटा!

पाकिस्तान भारतीय लष्कराचा मुकाबला करू शकत नाही. यावर 'उपाय' म्हणून त्याने दहशतवादी संघटना निर्माण केल्या आणि आता भारतीय लष्कराचा सामना करण्याची वेळ येताच त्याने चीनचा 'आश्रय' घेतला. भारत- पाकिस्तान यांच्यातील चार दिवसांच्या चकमकीची ही निष्पत्ती आहे.

**सर्वांत महत्त्वाचे दृश्य** : भारत-पाकिस्तान यांच्यात चार दिवस झालेल्या चकमकीचे सर्वांत महत्त्वाचे दृश्य कोणते असावे? चिनी आणि पाकिस्तानी सैनिक एकत्र नृत्य करीत आहेत हे ते दृश्य होते. पहलगाममध्ये आलेले दहशतवादी फक्त चार-पाच होते. पण, त्यांना प्रशिक्षण देण्यापासून, शस्त्रास्त्रे देत भारतात पाठविण्याचे काम आयएसआय म्हणजे पाकिस्तान लष्कराच्या गुप्तचर विभागाचे होते. हे दहशतवादी तर फक्त मुखवटा होते. आता पाकिस्तानही फक्त मुखवटा झाला आहे. चीनचा मुखवटा!

**५० हजार कोटी!** : पाच बिलियन डॉलर्स! म्हणजे जवळपास ५०,००० कोटी रुपये! भारत-पाकिस्तान यांच्यात चार दिवस झालेल्या चकमकीची ही किंमत असल्याचे सांगितले जाते. यात दोन्ही देशांनी केलेल्या शस्त्रास्त्रांचा वापर, त्यांची किंमत, दोन्ही देशांचे झालेले नुकसान यांचा यात समावेश आहे. पण, जेव्हा देशाच्या सुरक्षेचा प्रश्न येतो, तेव्हा कोणतीही किंमत ही कमीच मानली पाहिजे. काही आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी हा अंदाज वर्तविला आहे तर काहींच्या मते हा आकडा एक लाख कोटी रुपये एवढा असू शकतो. दोन्ही देशांनी शस्त्रविरामची घोषणा केली असली तरी दोन्ही देश युद्धाची सज्जता ठेवणार आहेत. किंबहुना ती वाढविणार आहेत. भारताने आपली युद्धसज्जता वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. यात लढाऊ विमानांची तैनाती, रणगाडे- सैन्याची तैनाती याशिवाय नौदलाची सज्जता यांचा समावेश आहे. म्हणजे शस्त्रविराम झाला असला तरी दोन्ही देशांचा लष्करी खर्च वाढणार आहे.

**चीन आता उघडपणे** : भारत-पाकिस्तान शस्त्रविराम होण्यापूर्वी चीनच्या परराष्ट्र मंत्र्यांनी केलेले विधान सर्वांत बोलके होते. 'पाकिस्तानचे सार्वभौमत्व, त्याच्या सीमांचे रक्षण, त्याचे अखंडत्व यासाठी चीन बांधील आहे' असे चीनने घोषित केले. चीन पाकिस्तानला किती आणि कसा पाठिंबा देत आहे यापेक्षा अधिक कोणता पुरावा हवा?

**विमाने-शस्त्रास्त्रे** : चीन पाकिस्तानला लढाऊ विमाने पुरवीत आहे. जेएफएफ थंडर या चिनी बनावटीच्या विमानांचे उत्पादनच मुळी पाकिस्तानात सुरू आहे. चीनने पाकिस्तानला तोफा पुरविल्या आहेत. या तोफांमध्ये वापरले जाणारे तोफगोळे चीन पुरवीत आहे. चीनने पाकिस्तानात लाखो कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. 'चायना- पाकिस्तान एकॉनॉमिक कॉरिडॉर' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पात चीनने अनेक पायाभूत प्रकल्प उभारले आहेत, तो उभारीत आहे. व्याप्त काश्मीरचा काही भाग पाकिस्तानने यापूर्वीच चीनला दिला आहे. या भागातही चीनने पायाभूत प्रकल्प उभारले आहेत.

**आता सैनिकही...** : भारत-पाकिस्तान चकमकीत घडलेली नवी घटना म्हणजे चिनी सैनिकही पाकिस्तानात दाखल झाले आहेत. या सैनिकांची संख्या किती होती हे सांगणे आज तरी शक्य नाही. पण, चीनचे सैनिक पाकिस्तानात दाखल झाले आहेत ही या चकमकीची सर्वांत मोठी घटना होती.

**सायबर हल्ला!** : चीनने संगणक हॅकिंगच्या बाबतीत अमेरिकेला केव्हाच मागे टाकले आहे. अशा या चीनने भारत-पाकिस्तानच्या ताज्या चकमकीत पाकिस्तानला आणखी एक मोलाची मदत केली. भारताने पाकिस्तानी हवाई दळाची दळणवळण यंत्रणा ठप्प करण्यात यश मिळविले असतानाच, पाकिस्तानाने भारतावर अचानक सायबर हल्ला चढविला. काही भागांत पाकिस्तानला यश मिळाले, काही ठिकाणी त्याला ते करता आले नाही. हे करण्याचे तंत्रज्ञान पाकिस्तानजवळ नाही. हे सारे चिनी तज्ज्ञांनी घडवून आणले आहे. व्याप्त काश्मीरमध्ये पाकिस्तानने आपल्या दहशतवाद्यांचे संभाषण गोपनीय ठेवण्यासाठी जी काही यंत्रणा उभारली आहे, ती चीनच्या साहाय्याने उभारली आहे असे म्हटले जात होते.

**पैशाचा ओघ** : पाकिस्तान कंगाल आहे ही वस्तुस्थिती आहे. भारत-पाकिस्तान चकमक सुरू असताना आंतरराष्ट्रीय नाणे निधीने त्याला जवळपास १० हजार कोटी रुपयांचा कर्जाचा हप्ता दिला. भारताने यास विरोध केला होता. पण, भारताचा विरोध डावलून हा निर्णय घेण्यात आला. ही अमेरिकेची कृपा होती काय असे आता विचारले जात आहे. अमेरिकेच्या संमतीशिवाय आंतराष्ट्रीय नाणे निधी असा निर्णय घेणे शक्य नव्हते. विशेष म्हणजे भारत- पाकिस्तान यांच्यात चकमक सुरू असताना ९ मे रोजी हा निर्णय घेण्यात आला. आंतरराष्ट्रीय नाणे निधीला तो कमीतकमी पुढे तरी ढलकता आला असता. पण, अगदी तातडीने हे कर्ज मंजूर करून ते पाकिस्तानला देण्यात आले. यामागे अमेरिकेचा हात असावा काय अशी एक शंका व्यक्त केली जात होती. नंतरच्या घटनाक्रमाने त्यावर जणू शिक्कामोर्तब केले आहे.

**ट्रम्प यांची भूमिका** : भारत आणि पाकिस्तानची तुलना होऊ शकत नाही. पण, राष्ट्रपती ट्रम्प यांनी भारत पाकिस्तानला जणू एकाच पारड्यात टाकले आहे. दोन्ही देशांचा त्यांनी गौरव केला आहे. पाकिस्तान हा एक दहशतवादी देश. ट्रम्प यांनी त्याचे कौतुक करावे? हा साराच घटनाक्रम अनाकलनीय असा झाला आहे.

**चित्र सुस्पष्ट** : भारत- पाकिस्तान चकमकीने एक बाब पुन्हा स्पष्ट केली आहे. त्याचा विचार भारताला करावा लागेल. भारतीय लष्कराशी आपण टक्कर घेऊ शकत नाही याची पाकिस्तानला कल्पना असल्याने त्यांनी लष्कर-ए-तयबा, हिजबुल यासारख्या दहशतवादी संघटना स्थापन केल्या. आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना या संघटनांकडे जणू 'प्रतिनियुक्ती'वर पाठविले. या संघटना भारतात दहशतवादी कारवाया घडवीत असतात. पाकिस्तानने कधीही अशा संघटनांना लगाम लावण्याचा प्रयत्न केला नाही. कारण त्या त्यांनीच स्थापन केल्या आहेत. आता भारताने पाकिस्तानवर हल्ला चढविला. मग, चीन पाकिस्तानच्या मदतीला धावला. पाकिस्तानने ज्याप्रमाणे दहशतवादी संघटना स्थापन केल्या, त्यांना प्रोत्साहन दिले. चीन- पाकिस्तान, बांगला देश, नेपाळ, भूतानला हाताशी धरून यापुढील युद्ध खेळणार आहे.

**लडाखनंतर** : भारताने काश्मीरचे कलम ३७० व लडाखचे कलम ३५ अ हटविल्यानंतर चीन-पाकिस्तान आणखी जवळ आले. त्या जवळिकीचा परिणाम या चार दिवसांच्या चकमकीत दिसला. येणाऱ्या काळात चीनने आपले नौदल कराचीजवळ आणून ठेवल्यास आश्चर्य वाटू नये. पाकिस्तानचे ग्वादर हे बंदर चीनने विकसित केले आहे. स्वाभाविकच त्याच्या सरंक्षणाची जबाबदारी त्याची राहणार आहे. येणाऱ्या काळात पाकिस्तान हा चिनी नौदलाचा एक अड्डा ठरणार हे चित्र स्पष्ट आहे. चीनने आपल्या नौदलाचा विकास करण्यासाठी फार मोठी गुंतवणूक केली आहे. जगावर वर्चस्व ठेवायचे असेल तर नौदल शक्तिशाली असले पाहिजे ही शिकवण त्याने अमेरिकेकडून घेतली आहे.

**प्रश्न अमेरिकेचा** : भारत- पाक चकमकीत चीनच्या सक्रिय सहभागाची भूमिका काहीशी धक्कादायक असली तरी अपेक्षित अशी आहे. प्रश्न आहे अमेरिकेचा. अमेरिकेने पाकिस्तानची बाजू का घ्यावी? पाकिस्तान हा दहशतवादी देश आहे. त्याने ओसामा बिन लादेनला आश्रय दिला होता. हे सारे माहीत असूनही राष्ट्रपती ट्रम्प यांनी पाकिस्तानसोबत व्यापार करण्याची घोषणा का करावी? ट्रम्प यांची कोणती मजबुरी होती? भारत-पाक यांच्यातील शस्त्रविरामाने हे सारे प्रश्न उपस्थित केले आहेत, जे सध्या तरी अनुत्तरित आहेत.

भारत-पाक सीमा सध्या शांत आहे. पण, शांतता म्हणजे काय? एका विचारवंताने म्हटले आहे, 'शांतता म्हणजे दोन युद्धांचा मध्यांतर'! ▮

## वेध

पुंडलिक आंबटकर

# विदर्भ होणार दुष्काळमुक्त!

विदर्भातील जवळपास ८० ते ८५ टक्के शेती जिरायती आहे. सरकारने मागेल त्याला विहीर ही योजना राबविल्याने सिंचन क्षेत्रात वाढ झाली आहे. आता सरकारने वैनगंगा-नळगंगा हा नदीजोड प्रकल्प हाती घेऊन विदर्भाला दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प केला आहे. राज्य सरकारने ६ ऑगस्ट २०२४ रोजी या प्रकल्पाची घोषणा केली. जवळपास ८८ हजार कोटी रुपयांच्या या प्रकल्पामुळे विदर्भासह मराठवाड्यातील काही भागांत हरितक्रांती येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१८ मध्येच या प्रकल्पाचा प्रस्ताव मांडला होता. परंतु, २०१९ मध्ये सरकार बदलले आणि हा विषय धूळ खात पडून राहिला. जवळपास ५०० किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पामुळे पावणे चार लाख हेक्टर शेती सिंचनाखाली येणार आहे. आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांचा विचार यात प्रामुख्याने करण्यात आला आहे. महाराष्ट्रात दरवर्षी जवळपास २२५.७ लाख हेक्टर क्षेत्रावर विविध पिकांची लागवड केली जाते. विदर्भात कापूस आणि सोयाबीन ही दोन मुख्य पिके घेतली जात असली तरी पूर्व विदर्भात धान हे प्रमुख पीक आहे. विदर्भात यंदा कापूस आणि सोयाबीन प्रत्येकी १४ लाख हेक्टर क्षेत्रात लागवडीचे नियोजन आहे. विदर्भात केवळ १६.४ टक्के इतकेच क्षेत्र बागायती आहे. सरकारने विदर्भातील सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी हा प्रकल्प हाती घेतल्याने पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होतील. प्रकल्प ७ वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सध्या पश्चिम विदर्भात उन्हाळी तिळ काढणीला आला आहे. काही ठिकाणी खरेदी सुरू झाली आहे. परंतु, शेतकऱ्यांचा माल बाजारात येताच भाव पडले. यामागची कारणमीमांसा शोधून शासनाने शेतकऱ्यांना न्याय देणे गरजेचे आहे. वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प विदर्भातील ६ जिल्हे आणि १५ तालुक्यांसाठी वरदान ठरणार आहे. पावसाचा लहरीपणा आणि अन्य नैसर्गिक आपत्तींमुळे पश्चिम विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या. आता हा प्रकल्प शेतकऱ्यांना नवसंजीवनी देणारा ठरू शकतो. या प्रकल्पाच्या माध्यमातून पावसाळ्यात गोसेखुर्द धरणातील अतिरिक्त पाणी कृत्रिम नदीच्या माध्यमातून वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा आदी जिल्ह्यांमध्ये नेले जाणार आहे. या योजनेचा लाभ नागपूर जिल्ह्यातील काही तालुक्यांनासुद्धा होणार आहे. या प्रकल्पामुळे शेतकरी बारमाही पिके घेऊ शकतील. राज्यात कृष्णा, भीमा, गोदावरी, तापी, वर्धा, वैनगंगा या नद्यांच्या खोऱ्यात लहान-मोठे सिंचन प्रकल्प आहेत. राज्याची कमाल सिंचन क्षमता १२६ लाख हेक्टरपर्यंत नेण्याचा सरकारचा मानस आहे. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प यादृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. हा प्रकल्प राज्याच्या इतिहासातील सर्वांत मोठा ठरणार असून, भंडारा जिल्ह्यापासून बुलढाणा जिल्ह्यापर्यंत ४२६.५४ किमी कालवे, बोगदे, बंदिस्त नाल्या, उपसा सिंचन व जलसाठे आदींचे जाळे विणून शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोहोचविले जाणार आहे. दुसरीकडे शासनाने तापी महापुनर्भरण योजनेची घोषणा केली आहे. या प्रकल्पाचा लाभ उत्तर महाराष्ट्रासह पश्चिम विदर्भातील खारपाणपट्ट्यातील शेतकऱ्यांना होणार आहे. विदर्भात आजपर्यंत हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. या आत्महत्यांमागे सिंचनाचा अनुशेष हे प्रमुख कारण आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये म्हणून शासनाने अनेकदा कर्जमाफी दिली. परंतु, ही केवळ वरवरची मलमपट्टी ठरली. राज्य सरकारने ४१ लाख शेतकऱ्यांना ३४ हजार कोटींची कर्जमाफी दिली होती. तरीही शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होऊ शकल्या नाहीत. त्यापूर्वी शरद पवार केंद्रात कृषिमंत्री असताना ७२ हजार कोटींची कर्जमाफी केली. मात्र, यात मृतांच्या टाळूवरचे लोणी संबंधितांनी खाल्ल्याचा ठपका कॅगने ठेवल्याने मोठे वादळ उठले होते. त्यानंतर ठाकरे सरकारनेही कर्जमाफीचा प्रयत्न करून पाहिला. परंतु, कर्जमाफी हा काही शेतकऱ्यांच्या समस्यांवरील उपाय ठरू शकला नाही आणि ठरू शकतही नाही. त्यामुळे महायुती सरकारने आता समस्येच्या मुळालाच हात घातला आहे. सध्याच्या राज्य सरकारमधील मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचा शेतीशी संबंध आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना न्यायाची अपेक्षा आहे. विदर्भाच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्र खूप संपन्न आहे. विदर्भात अनेक शेतकऱ्यांकडे १० ते १२ एकर शेती आहे. परंतु, तरीही त्यांचे उत्पादन आणि उत्पन्न कमी आहे. यामागे सिंचनाचा अनुशेष हे प्रमुख कारण आहे. आता या विषयाबाबत सरकारने गांभीर्य दाखविल्याने सुजलाम् सुफलाम विदर्भाची अपेक्षा करायला हरकत नाही. ▮



९८८१७१६०२७

## कानोसा

अमोल पुसदकर

# भक्तिमार्गाचे पथप्रदर्शक संत चोखामेळा

एकदा संत नामदेव महाराजांचे कीर्तन सुरू होते. कीर्तनात बराच मोठा भक्त समुदाय जमला होता. नामदेव महाराजांनी ''सुखा लागी करिसी तळमळ, तरी तू पंढरीसी जाय एक वेळ'' हा अभंग घेतलेला होता. सर्व भक्त तल्लीनतेने त्यांचे हे कीर्तन ऐकत होते. यामध्ये एक जोडपे सुद्धा इतरांपेक्षा दुरून हे सर्व कीर्तन ऐकत होते. संत नामदेवांचे विचार ऐकून त्यांनाही खूप आनंद झाला. पाहता पाहता कीर्तन संपले. सर्व भाविक नामदेव महाराजांना नमस्कार करून जाऊ लागले. परंतु हे जोडपे मात्र समोर गेले नाही. त्यावेळेस नामदेव महाराजांचे लक्ष त्यांच्यावर गेले. नामदेव महाराजांनी त्यांना आपल्या जवळ बोलावले. त्यावेळेस त्या दोघांनी दुरूनच त्यांना जमिनीला हात लावून नमस्कार केला. हे पाहून नामदेव महाराज म्हणाले, ''अरे असे दुरून नमस्कार का करता? जवळ या. कोण तुम्ही? काय नाव तुमचे?'' त्यावेळेस ती व्यक्ती म्हणाली, ''माझे नाव चोखोबा. ही माझी पत्नी सोयराबाई. तुमचे कीर्तन ऐकून आम्ही धन्य झालो. आम्ही अस्पृश्य असल्याने समाजाने आम्हाला दूर लोटलेले आहे. म्हणून आम्ही तुम्हाला दुरून नमस्कार केलेला आहे.'' हे ऐकून संत नामदेव महाराज त्यांना म्हणाले, ''जो समाज तुमचा विटाळ पाळतो त्यांना अजून धर्म समजलेला नाही. तुम्ही माझ्याजवळ या आणि नमस्कार करा.'' त्यानंतर चोखोबा आणि त्यांच्या पत्नीने त्यांना वाकून नमस्कार केला. संत नामदेवांनी सुद्धा त्यांच्या डोक्यावर हात ठेवून त्यांना आशीर्वाद दिला. त्यानंतर चोखोबा त्यांना म्हणाले की, ''महाराज, समाजाने आम्हाला दूर लोटले तरी तुमचा पांडुरंग आम्हाला जवळ करेल का?'' तर त्यावर संत नामदेव म्हणाले, ''निश्चितच करेल. त्याच्यासाठी तुम्ही आम्ही सर्व समान आहोत. यानंतर तुम्ही पांडुरंगाची भक्ती सोडू नका.'' त्यानंतर संत नामदेव हेच संत चोखामेळा यांचे गुरू झाले.

संत चोखामेळा यांचा जन्म विदर्भातील देऊळगाव राजा तालुक्यातील मेहुणपुरी या गावी सन १२७३ या वर्षी झाला होता. एका अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीमध्ये त्यांचा जन्म झाला. त्यामुळे लहानपणापासूनच त्यांना अस्पृश्यतेचे चटके बसले. आजपासून सातशे वर्षांपूर्वीचा समाज हा अनेक रूढी आणि कुरीतींमध्ये बांधला गेलेला होता. परंतु अशा समाजात जर जन्माला आलेली एखादी व्यक्ती नास्तिक झाली, तिने ईश्वराचे अस्तित्व नाकारले तर आपण तिला फारसा दोष देऊ शकत नाही. अशी हजारो उदाहरणे या समाजामध्ये आहे.

चोखा म्हणे पाहता पंढरी भू वैकुंठ, मनाचे हे कष्ट दूर झाले ॥

चोखोबांच्या जीवनाची दिशा आता ठरलेली होती. विठ्ठलाचे चरण हेच त्यांना पैलतीरावर नेणारे साधन होते. त्यांच्या जवळ लौकिक शिक्षण काहीही नव्हते. त्यामुळे वेदशास्त्र पुराण वाचणे हे तर त्यांना शक्य नव्हते. त्यामुळे ते म्हणतात-

आम्हा न कळे ज्ञान, नकळे पुराण, वेदांचे वचन आम्हा न कळे ।

पांडुरंगाचे नामस्मरण हेच आमचे वेद आणि हेच आमचे पुराण अशी त्यांची श्रद्धा होती. ज्या पंढरपूरच्या विठोबाची, पांडुरंगाची चोखोबा भक्ती करीत होते त्याच्या दर्शनासाठी सुद्धा त्यांना मंदिरात प्रवेश नव्हता. तरीसुद्धा जसे जसे चोखोबांचे वैराग्य वाढू लागले, त्यांनी मंदिराच्या बाहेर बसूनच पांडुरंगाला आळवणे सुरू केले.

उंबरठ्यासी कैसे शिवू, आम्ही जाती हिन
रूप तुझे कैसे पाहू, त्यात आम्ही लीन
पायरीशी होऊ दंग गाऊनी अभंग ॥
नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग

हळूहळू त्यांची कीर्ती संपूर्ण वारकरी संप्रदायात झाली. लोकही त्यांना आदराने मान देऊ लागले.

अनेक वर्ष आषाढी कार्तिकीस चोखोबा, सोयराबाई आणि कर्ममेळा हे पंढरपुरास येत होते. परंतु त्यांना विठ्ठलाचे दर्शन घडत नव्हते. आता चोखोबांना विठ्ठलाच्या दर्शनाची आस लागलेली होती. त्यामुळे एके दिवशी पहाटे स्नान करून ते मंदिरात प्रवेश करते झाले. पुजारी कुठेतरी गेलेला आहे हे पाहून पांडुरंगाच्या दर्शनासाठी अधीर झालेले मन त्यांना सरळ विठ्ठलाच्या गाभाऱ्यात घेऊन गेले. इतके वर्ष ज्या विठ्ठलाची भक्ती केली त्याचे दर्शन त्यांना झाले आणि भाव वेगाने ते विठ्ठलाच्या चरणावर कोसळले. त्याच वेळेला असे म्हणतात की, विठ्ठलानी त्यांना दर्शन दिले. प्रत्यक्ष विठ्ठलाने आपल्या गळ्यातील वैजयंती माळ ही चोखोबांच्या गळ्यात घातली. चोखोबा भानावर आले व जसे गाभाऱ्यातून बाहेर येऊ लागले तसे काही लोकांना ते दिसले. एक तर चोखोबा गाभाऱ्यात गेले व गळ्यात पांडुरंगाच्या मूर्तीची वैजयंती माळ आहे हे पाहून लोक संतापले. त्यांनी चोखोबांना मार दिला व वैजयंती माळ चोरी केली म्हणून कोतवालास वर्दी दिली. कोतवाल आला त्याने चोखोबांना शिक्षा केली. चोखोबांना बैलांना बांधले गेले व बैलांना आसूड मारले गेले. जेणेकरून बैल पळतील व चोखोबांना फरफटत नेतील. परंतु बैलांवर आसूडाचे मार होत होते तरीपण बैल हलले नाही.

चोखा म्हणे माझा भोळा भाव देवा, गाईन केशवा नाम तुझे ॥

चोखोबांच्या मनातील पांडुरंगाच्या दर्शनाची इच्छा आता पूर्ण झालेली होती. चोखोबांनी पंढरपुरातच एक छोटी झोपडी बांधली व तिथेच ते सोयराबाई व कर्ममेळा यांच्यासोबत राहू लागले. पुढे काही वर्षांनी चोखोबांचे शरीर थकत चालले होते. त्यांना असे वाटले की आपण मंगळवेढ्याला आपल्या गावी गेलो पाहिजे. त्यामुळे ते आपल्या परिवारासह मंगळवेढ्याला आले. त्यावेळेस मंगळवेढ्याला मुसलमानी अंमल सुरू झालेला होता. मुसलमान अंमलदाराला एक मोठी गढी बांधायची होती. त्यासाठी त्यांनी अनेक लोकांना काम करायला पकडून आणले होते. त्यामध्ये चोखोबांना सुद्धा नेले गेले. बांधकाम सुरू असताना मोठी भिंत खचली व त्यामध्ये १६-१७ जण गाडले गेले. चोखोबाचाही त्यामध्येच अंत झाला. त्यावेळेस नामदेव महाराज पंढरपूरला आले होते. प्रत्यक्ष विठ्ठलाने त्यांना दृष्टांत दिला की, माझा भक्त चोखामेळा याचा अवतार संपलेला आहे. तुम्ही मंगळवेढ्यात जाऊन त्याच्या अस्थी घेऊन या. त्याप्रमाणे नामदेव महाराज मंगळवेढ्यास गेले. परंतु गाडले गेलेल्या प्रेतांमध्ये चोखोबांचा देह कोणता हे कसे ओळखायचे हा प्रश्न त्यांना पडला होता. परंतु प्रत्येक प्रेत ज्यावेळेस ते बघू लागले त्यावेळेस एका प्रेतातून त्यांना ''विठ्ठल विठ्ठल विठ्ठल'' असा ध्वनी येत आहे असे त्यांच्या कानी आले. त्यावरून नामदेव महाराजांची खात्री पटली की हेच चोखोबा आहेत. चोखोबांच्या अस्थी पंढरपूरला आणून भीमा नदीमध्ये विसर्जित करण्यात आल्या व त्यातील काही अस्थी घेऊन चोखोबा मंदिराच्या बाहेर जिथे उभे राहून कीर्तन करायचे त्या ठिकाणी त्या ठेवून तेथेच एक समाधी बांधण्यात आली. आज तिथे एक मंदिर आहे. लाखो वारकरी पांडुरंगाचे दर्शन घेण्यापूर्वी त्यांच्या परमभक्ताचे चोखोबांचेही दर्शन घेतात. ▮

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### राजकारणात नेते सक्रिय, कार्यकर्ते निष्क्रिय

सध्याच्या राजकीय घडामोडींमध्ये एक स्पष्ट चित्र समोर येत आहे राजकीय पक्षातील नेतेमंडळी विविध स्तरांवर सक्रिय असून, कार्यकर्त्यांमध्ये मात्र निष्क्रियता जाणवत आहे. या विसंगतीमुळे पक्षाचे संघटनात्मक बळ कमजोर होत असल्याचे स्पष्ट होत आहे. नेते विविध कार्यक्रम, सभा, माध्यमांतील चर्चा, सोशल मीडिया यामार्फत जनतेमध्ये सक्रियपणे सहभागी होत आहेत. परंतु हे सगळं वरच्या पातळीपुरतं मर्यादित असल्याचं चित्र आहे. स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते गोंधळलेल्या, नाराज अवस्थेत आहेत. कार्यकर्त्यांच्या मते, त्यांना निर्णयप्रक्रियेत सामावून घेतले जात नाही. अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांना दुर्लक्षित केलं जात असून, पक्षामध्ये केवळ गटबाजी, फोटोंची स्पर्धा आणि प्रसिद्धीपुरता सक्रियपणा उरला आहे, असा सूर अनेक कार्यकर्ताकडून ऐकण्यास मिळतो. यात राजकीय निरीक्षकांचे म्हणणे आहे की, कार्यकर्त्यांशिवाय पक्षाचं मूळ उद्ध्वस्त होतं. नेतृत्व चमकायला हवं, पण ते कार्यकर्त्यांच्या बळावरच शक्य होतं. सध्या ही कडी तुटताना दिसतेय, हे सगळ्याच राजकीय पक्षासाठी गंभीर संकेत आहेत.

सामाजिक पातळीवरील अनेक संघटना, मंडळं आणि मतदारही या परिस्थितीकडे प्रश्नार्थक नजरेने पाहत आहेत. आगामी काळात ही दरी भरली गेली नाही तर राजकीय पक्षातील कार्यकर्ते आणि निवडणुकीत प्रत्यक्ष परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

●● ●●

### स्वातंत्र्यवीर सावरकरांची राष्ट्रनीती भारताच्या सुरक्षिततेची गुरुकिल्ली!

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त आजच्या स्थितीत त्यांच्या राष्ट्राभिमानी विचारांची किती आवश्यकता आहे, हे थोडक्यात पाहू. त्यांची राष्ट्रहिताची भूमिका आजही तितकीच महत्त्वाची आहे जितकी त्याकाळी होती. त्यांचा सिद्धांत स्पष्ट होता ''जे राष्ट्रहिताचे ते तेच योग्य अन्य त्याज्य!'' स्वार्थ त्यांना मान्य नव्हता; त्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू राष्ट्रसेवा हाच होती. ते फक्त विचारवंत नव्हते, तर कृतिशील राष्ट्रनायक होते.



आज देशावर सातत्याने दहशतवादी हल्ले होत आहेत. अशा वेळी हल्लेखोरांवर वर्षानुवर्षे खटले चालतात, पण शिक्षा होत नाही. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सांगितले होते ''जो राष्ट्राच्या प्रगतीत अडथळा ठरेल तो शत्रूच.'' त्यांच्या विचारांची आजच्या काळात अधिकच आवश्यकता आहे. राष्ट्रहित हेच अंतिम मूल्य मानून कृती करणे आवश्यक आहे. सत्य-अहिंसेच्या अतिरेकाऐवजी 'शठास प्रतिशाठ्यम्' ही भूमिका आवश्यक आहे. पहलगामनंतरचा एअर स्ट्राईक याचे उत्तम उदाहरण आहे. त्यांच्या विचारांचा स्वीकार करणे म्हणजे राष्ट्राची सुरक्षा अधिक प्रबळ करणे होय. एकूणच, स्वातंत्रवीर सावरकरांच्या विचारसरणीचा अवलंब करणे आणि त्यांनी दाखवलेल्या सनातन राष्ट्रनिर्मितीचा मार्ग स्वीकारणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

●● ●●

### रेल्वे पोलिसांची कार्यतत्परता

जी.आर.पी. नागपूर रेल्वे स्टेशन यांच्या कर्तव्यतत्परतेचा सुखद अनुभव नुकताच आला. माझे काही नातेवाईक १६ मे रोजी अहमदाबादहून १२९४९ कविगुरू एक्स्प्रेसने अकोल्याकरिता निघाले. १७ मे रोजी सकाळी अकोल्याला उतरले. मला साधारण १०.४५ वाजता त्यांचा फोन आला व म्हणाले की, त्यांची कपडे असलेली ब्राऊन रंगाची एअर बॅग रेल्वे डब्यातच विसरले. तरी नागपूरला मिळाली तर पाहा. त्या सुमारास गाडी खापरीहून निघाली होती व मला घरून निघून स्टेशनवर गाडी गाठता येऊ शकत नव्हती. म्हणून मी लगेच जी.आर.पी. नागपूर रेल्वे स्टेशनला फोन केला व सविस्तर माहिती दिली. साधारण ११.०० वाजता गाडी नागपूर स्टेशनवर आली व मला १० मिनिटांत जी. आर. पी. नागपूर यांचा फोन आला की बॅग सापडली व त्यांच्या कार्यालयात ओळख पटवून घेऊन जावी. ज्या मुलाची बॅग राहिली होती त्याचे वडील ती बॅग जी. आर. पी. नागपूर ठाण्यातून घेऊन गेले. मी जी. आर. पी. नागपूर यांचे आभार मानले. त्यांच्या कार्यतत्परतेचा असा सुखद अनुभव आला. ▮

**मिलिंद कृ. गोखले**/नागपूर

●● ●●

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अ‍ॅप क्रमांकावर पाठवावा.

## महत्वाचे...



### राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत सौरभ कोळेकर याचे यश

**सोलापूर, दि.१८ मे-**

मिलिटरी मेडिकल कॉलेज पुणे येथे ९'१०व ११मे रोजी झालेल्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत सोलापूरचा सुपुत्र सौरभ महावीर कोळेकर उल्लेखनीय कामगिरी करुन एकुण पाच पदके पटकावली त्या मध्ये तीन सुवर्ण तर बटरफ्लाय स्टोक्स मध्ये १ रौप्य व १ कांस्य पदक मिळवले. शालेय शिक्षण सोलापूर मध्ये झाले असून सध्या तो कोल्हापूर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज येथे शिकत आहे. सोलापूर होमिओपॅथिक संघटना कार्यालयात संस्थापक अध्यक्ष डॉ. सुनील वरळे, ॲड. शक्ती कोळेकर, अनिरुद्ध वरळे यांनी अभिनंदन केले.

### सोलापूरचे सात खेळाडू ग्रेस गुणांच्या लाभापासून वंचित

**सोलापूर, दि. १८ मे-**

दहावी व बारावी परीक्षेच्या निकालात येथील काही खेळाडू विद्यार्थ्यांना ग्रेस गुणांचा लाभ झालेला नाही. त्यामुळे मोठा पेच निर्माण झाला आहे. सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी सात विद्यार्थ्यांची शिफारस करुन त्यांना गुण देण्यात यावे, अशी शिफारस केली आहे. प्रेक्षा गोविंद मंत्री (किकबॉक्सिंग), सोहम सागर मर्दा (तलवारबाजी), शहानूर ताजुद्दीन शेख (शुटिंग), तनिष्का काकासाहेब गुंड (वुशू), स्वरुप सुरेश चव्हाण (शुटिंग) व यथार्थ आप्पासाहेब पाटील (सॉफ्टबॉल)अशा दहावीच्या सहा खेळाडू विद्यार्थ्यांना आणि समर्थ प्रभुराज घोडके (बुद्धिबळ) या बारावीच्या खेळाडू विद्यार्थ्याच्या परीक्षेच्या निकालात ग्रेस गुणांचा फायदा मिळालेला नाही. या सर्वांना ग्रेस गुण देण्यात यावे अशी शिफारस करणारे पत्र महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (पुणे) विभागीय सचिवांना पत्राद्वारे केली आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून २०२४-२५ मध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या खेळाडूंना वाढीव गुणाबाबतचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा कार्यालयाकडे ऑनलाईन प्राप्त झालेले होते. सोलापूर जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून प्राप्त प्रस्तावाची ऑनलाईन छाननी करून बोर्डाच्या डेस्क ०३कडे शिफारस करून पाठवण्यात आले होते. परंतु, पाठवलेल्या प्रस्तावातून काही खेळाडूंना गुण न मिळाल्यामुळे बोर्डाकडे चौकशी केली असता ऑनलाईन प्रस्ताव त्यांच्याकडे दिसत नाही, असे सांगण्यात आले. त्यामुळे गुण न मिळालेल्या या खेळाडूंची माहिती त्यांना ग्रेस गुण देण्यात यावेत, अशी शिफारस जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार

### फतवे देणारे उलेमा बोर्ड आता राजकारणाच्या आखाड्यात!

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १८ मे -**

**नेतृत्वाची फळी निर्माण करण्याचा बोर्डाचा ठराव**

निवडणुकांसह विविध घटना वेळी फतवे काढून देशातील अल्पसंख्यांक समाजावर मोठया प्रमाणात धार्मिक पगडा ठेवणाऱ्या अखिल भारतीय उलेमा बोर्डने आता स्वतः राजकारणाच्या आखाड्यात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. मुस्लिम समाजाने केवळ व्होट बँक बनून न राहता स्वतःची नेतृत्वाचे फळी निर्माण करावयाची, असा ठराव संस्थेच्या मुंबईत झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

राज्यात होणाऱ्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भूमिका ठरवण्यासाठी राजकीय पॅनेलची स्थापना करण्यात आली आहे.सांताक्रूझ येथील आझाद स्कूलमध्ये ' तळागाळातील नेतृत्व' या विषयावर बैठक झाली. त्यामध्ये आता राजकारणात मुस्लिमांचा वापर आणि शोषण कोणत्याही किंमतीत सहन केले जाणार नाही. आता राष्ट्राचे नेतृत्व राष्ट्रच करेल. असा इशारा सर्व राजकीय पक्षांना देण्यात आला देशातील सुशिक्षित वर्गात नेतृत्वाची जाणीव जागृत करणे आणि स्थानिक पातळीवर स्वयंपूर्ण राजकीय भूमिकेचा पाया रचणे या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी उलेमा बोर्डचे अध्यक्ष अल्लामा बानी नईम हसनी यांनी सांगितले की, आपल्याला केवळ व्होट बँक बनून राहायचे नाही. राजकारण तळागाळात आणावे लागेल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत, प्रतिभावान, प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष लोक निवडून द्यावे लागतील, जे समाजाच्या सर्व घटकांचे प्रतिनिधित्व करतील, . यावेळी त्यांनी महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मंडळाचे राजकीय पॅनेल तयार करण्यात आले आहे, ज्याचे प्रमुख कर्मचारी सुश्री शबाना खान असतील, तर मुंबई प्रभारीची जबाबदारी युसुफ जमाल यांच्याकडे देण्यात आली आहे. मेळाव्याचे अध्यक्ष मुफ्ती मुहम्मद हशमतुल्लाह कासमी यांनी केले, ज्यामध्ये त्यांनी तळागाळातील नेतृत्वाचे महत्त्व अधोरेखित केले. मेळाव्याचे अध्यक्ष मुफ्ती मुहम्मद हशमतुल्लाह कासमी म्हणाले,' राजकारणात मुस्लिमांचा वापर आणि शोषण थांबले पाहिजे, यासाठी आपल्याला प्रयत्न करावायचे असून त्यासाठी ग्रासरूट लीडरशिप प्रोग्राम राबविला जाईल, त्यामध्ये जागरूकतेबाबत आवाहन, नेतृत्व आता राष्ट्राच्या हातात असेल'

Classifieds

**पाहिजेत**

**हॉस्पिटलसाठी सिस्टर, लेडी रिसेप्शनीस्ट व आया पाहिजे. सारडा हॉस्पिटल, सम्राट चौक, सोलापूर**
**फोन : 9503062999**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# देशाला विश्वगुरू करण्यासाठी कटिबध्द व्हा : गोविंद शेंडे

## विहिंप मुंबई क्षेत्र परिषद शिक्षा वर्ग समारोहप्रसंगी प्रशिक्षित कार्यकर्त्यांना आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १८ मे-**

'स्वा.सावरकर यांचे सागरा प्राण तळमळला' या देशभक्तीपर गीताने आपण भारावून जातो, देशभक्तीची उर्मी येते. पण या गीताने आपण देशासाठी, धर्मासाठी किती सक्रिय होतो, किती वेळ देतो, हिंदू समाज जागरणाचे कार्य किती गतीने करतो याकडे लक्ष वेधून कटिबद्ध होण्याचे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे मुंबई क्षेत्र मंत्री गोविंद शेंडे यांनी केले.






मुंबई जवळील भाईंदर केशव सृष्टी येथे विश्व हिंदू परिषद क्षेत्रीय शिक्षा वर्गाचा समारोह संपन्न झाला. महाराष्ट्र व गोवा राज्यभरातील सहभागी शिक्षार्थी कार्यकर्त्यांना आवाहन करताना शेंडे यांनी देशाला विश्वगुरू करण्यासाठी कटिबध्द व्हा, असे सांगितले. या समारोह सोहळ्याप्रसंगी प्रमुख पाहुण्या केशवसृष्टी येथील राम रत्ना विद्या मंदिरच्या प्राचार्या कविता सिंग, शिक्षा वर्गाचे वर्ग प्रमुख ॲड. सतीश गोरडे, पालक संजय मुद्राळे, बौद्धिक प्रमुख राजीव जहागीरदार व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी वर्गाचा अहवाल मान्यवरांचे हस्ते प्रकाशित करण्यात आला. प्रारंभी भारतमाता, राम,सीता, लक्ष्मण, हनुमान यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते पार पडले. क्षेत्र मंत्री श्री. शेंडे यांनी सांगितले की, मंथनातून अनेक चांगले विचार समजतात, प्रबोधन होते. परिषद वर्ग देखील असाच दृष्टिकोन समोर ठेवून विश्व हिंदू परिषदेने, कार्यकर्ता आपल्या कार्यक्षेत्रात सजगपणे सक्रिय होऊन अधिक गतीने काम करण्यासाठी सुरू केला. अशोकजी सिंघल यांनी २००८ मध्ये सर्वप्रथम ही संकल्पना प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी यांच्यासमोर मांडली. सात दिवस या बैठकीत विचार मंथन झाले. देशभरातून १५०० पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. त्यानंतर नियमितपणे दरवर्षी संपूर्ण देशभरात अशा प्रकारचे परिषद शिक्षा वर्ग होतात. याशिवाय बजरंग दल, दुर्गा वाहिनी आणि मातृशक्ती या अन्य आयामाचे शिक्षा वर्ग प्रांत स्तरावर होतात. यातून संघटनेचा विस्तृत परिचय होतो, कार्याची दिशा मिळते, आंदोलने, बैठका, कार्यक्रमाच्या माध्यमातून समाज जागरणाचे, समरसतेचे कार्य होते. १९६४ मध्ये विहिंप स्थापनेप्रसंगी शंकराचार्य, धर्माचार्यांनी 'हिंदवः सोदराः सर्वे' चा संदेश दिला. धर्मांतरण होणार नाही, असा निश्चय केला. तेव्हापासून विहिंपचे विश्वव्यापी कार्य अखंडपणे सुरू आहे. आपला देश विश्वव्यापी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सजगपणे कार्य केले पाहिजे. आपले अनेक छोटे मोठे व्यवसाय इस्लाम धर्मीयांच्या हातात जात आहेत. हिंदूंची लोकसंख्या घटत आहे. समाजात व्यसनाधिनता वाढत आहे. समलैंगिक जीवनशैली वाढत आहे. ही बाब गंभीर असून यावर मात करण्यासाठी आपण सर्व कार्यकर्ते हिंदू समाज समरस, संघटित आणि सशक्त करण्यासाठी पुरेसा वेळ दिला पाहिजे. सागरा प्राण तळमळला हे गीत केवळ ऐकून, गाऊन चालणार नाही, कृतीत आणण्याची आवश्यकता आहे, असे आवाहन क्षेत्र मंत्री श्री. शेंडे यांनी केले.प्रमुख पाहुण्या प्राचार्या कविता सिंग म्हणाल्या, महिला सशक्तीकरणाच्या कामात विहिंपचे बंधू आणि भगिनी एकत्रित झटतात, समाजात परिवर्तन निश्चित आहे. गाँव गाँव, बच्चा बच्चा ध्येयपथाकडे जातील आणि संपूर्ण जग विश्व हिंदू परिषदमय करतील असा विश्वास आहे.

वर्ग प्रमुख ॲड.सतीशजी गोरडे यांनी ४ मे ते १४ मे पर्यंत पार पडलेल्या क्षेत्र परिषद शिक्षा वर्गाची माहिती सांगितली. गोमंतक-कोकण, पश्चिम महाराष्ट्र, देवगिरी आणि विदर्भ या चार प्रांतातून १७२ शिक्षार्थी सहभागी झाले होते. पहाटे साडेचारपासून रात्री साडेदहापर्यंत होणारे विविध शारीरिक, बौध्दिक कार्यक्रम, सत्संग, कृतीसत्र, योगासन प्राणायाम अशा विविध सत्रांची माहिती ॲड.गोरडे यांनी दिली. शिक्षार्थींच्या लेखी परिषदेत सर्वाधिक गुणांनी उत्तीर्ण चार शिक्षार्थींचा गौरव करण्यात आला. समारोप सोहळ्याचे सूत्र संचालन बौध्दिक प्रमुख राजीव जहागिरदार यांनी केले. पसायदान आणि विजय महामंत्राने परिषद शिक्षा वर्गाचा समारोप झाला. परिषद शिक्षा वर्ग यशस्वीतेसाठी क्षेत्र सहमंत्री रामचंद्र रामुका, कोकण प्रांत मंत्री मोहन सालेकर, संघटनमंत्री अनिरुध्द पंडित, मुख्य शिक्षक गजानन राणे, सहबौध्दिक प्रमुख माधव बर्वे, पुरुषोत्तम काळे, वर्ग व्यवस्था प्रमुख महेश मिस्त्री, परशुराम दुबे यांचे मार्गदर्शन लाभले.

# भाजपच्या ८१ जिल्हाध्यक्षांची बनावट यादी व्हायरल

## सायबर पोलिसाकडे तक्रार करणार : रवींद्र चव्हाण

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १८ मे -**

केवळ भारतातीलच नव्हे तर जगातला सर्वात मोठा पक्ष असलेल्या व महाराष्ट्राचं अनेक राज्यात व केंद्रात सत्तेवर असलेल्या राज्यातील ८१ जिल्हाध्यक्ष यांची बनावट यादी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहे. त्यामुळे पक्षाचे नेते व पदाधिकाऱ्यांमध्ये काहीसा गोंधळ उडाला आहे. याबाबत सायबर क्राईमकडे तक्रार दाखल करण्याचा निर्णय प्रदेश भाजपाने घेतला आहे

दरम्यान, सोशल मीडियावर भाजप जिल्हाध्यक्ष २०२५ या नावाने फिरणारी ८१ जिल्हाध्यक्षांची यादी बनावट असून, तिचा पक्षाशी कोणताही संबंध नाही. अशी माहिती भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी अधिकृत निवेदनाद्वारे दिली आहे. विधानसभा निवडणुकीत प्रचंड यश मिळवल्यानंतर महाराष्ट्र भाजपाने पक्ष बांधणीची मोहीम जोरात राबवली आहे. मोठया प्रमाणात सदस्यांची नोंदणी करण्यात आली असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जास्तीत जास्त यश मिळवण्याच्या दृष्टीने व्यूहरचना केली जात आहे. त्यासाठी करण्यात येत असून कार्यकर्त्यांना संधी देण्याचे पक्षश्रेष्ठींचे धोरण आहे. राज्यातील ५८ जिल्हाध्यक्षांची यादी जाहीर केले असून अद्याप ८१ जिल्हाध्यक्षांची निवड बाकी आहे. त्याचे काम सुरू असून त्याबाबत कार्यकर्त्यांमध्ये कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता लागली असतानाच अज्ञातांकडून शनिवारपासून ८१ जिल्हाध्यक्ष नियुक्तीची सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आली आहे. त्यामध्ये अनेक संशयास्पद व्यक्तीची नावे आहेत. त्यामुळे पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आणि पक्षाच्या प्रमुख नेत्याकडे त्याबाबत विचारणा करण्यात आली असता ही यादी बनावट असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकाराबाबत कार्याध्यक्ष चव्हाण यांनी म्हटले आहे की, आतापर्यंत भाजपच्या फक्त ५८ जिल्हाध्यक्षांची नियुक्ती अधिकृतरित्या जाहीर करण्यात आली आहे. उर्वरित जिल्हांची निवड प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे बनावट यादीवर विश्वास ठेवू नये, सदरील बनावट यादीत अनेक चुकीची नावं असून, ती हेतुपुरस्सरपणे पसरवण्यात येत असल्याची शक्यता पक्षानं व्यक्त केली आहे. उर्वरित जिल्ह्यांची निवड प्रक्रिया सुरू असून, ती लवकरच पूर्ण होईल, असेही चव्हाण यांनी सांगितलं आहे.या प्रकारामुळे पक्षाची बदनामी होण्याची शक्यता असून, बनावट माहिती प्रसारित करणाऱ्यांविरोधात सायबर क्राईम अंतर्गत पोलीस तक्रार दाखल करण्यात येणार आहे.पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि प्रसारमाध्यमांनी फक्त अधिकृत माध्यमांद्वारे जाहीर होणाऱ्या माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहनही चव्हाणांनी केले आहे.

# नियोजन भवन येथील पालकमंत्र्यांच्या दालनाचे उद्घाटन

**सोलापूर, दि. १८ मे-**

नियोजन भवन येथे जिल्ह्यातील नागरिकांच्या तक्रारी व समस्यांचे निवारण करण्यासाठी पालकमंत्री कार्यालय निर्माण करण्यात आलेले आहे. याच ठिकाणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासाठी सुसज्ज दालन तयार करण्यात आलेले असून या दालनाचे उद्‌घाटन आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते झाले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार उपस्थित होते.





# नव्या पिढीने भाषा आणि संस्कृतीचे दूत होण्याची गरज

## कुलगुरू महानवर : म.सा.प. आणि चंडक ट्रस्टतर्फे डॉ. बोल्ली स्मृती साहित्य पुरस्काराचे थाटात वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

वाचनाच्या सवयीचा अभाव आणि संस्कृतीकडे होणारे दुर्लक्ष ही बाब गंभीर आहे. भाषा आणि संस्कृती टिकवण्यासाठी आपण त्यांचे दूत बनवण्याची गरज आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी केले. महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा सोलापूर आणि शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली स्मृती साहित्य पुरस्कार २०२५ रविवारी कवी व साहित्यिक डॉ. दासू वैद्य (छत्रपती संभाजीनगर) यांना कुलगुरू डॉ. महानवर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात हा समारंभ झाला. याप्रसंगी व्यासपीठावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, महाराष्ट्र साहित्य परिषद सोलापूर शाखेच्या अध्यक्षा डॉ. श्रुती वडगबाळकर, शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक ट्रस्टचे विश्वस्त किशोर चंडक, विश्वस्त डॉ. गिरीश चंडक, मसापचे उपाध्यक्ष दत्ता सुरवसे, प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर उपस्थित होते. याप्रसंगी कवी व साहित्यिक डॉ. दासू वैद्य यांना स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ, रोख रक्कम ११ हजार रुपये आणि मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. पुरस्काराचे यंदाचे ५ वे वर्ष होते.

कुलगुरू डॉ. महानवर, डॉ. दासू वैद्य, डॉ. श्रुती वडगबाळकर यांनी मनोगत व्यक्त केले.प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर यांनी मानपत्राचे वाचन केले. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांचा मानपत्र शब्दांकनाबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. अर्जुन व्हटकर यांनी परिचय करून दिला. शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक ट्रस्टचे विश्वस्त किशोर चंडक यांनी प्रास्ताविक केले. ममता बोल्ली यांनी सूत्रसंचालन तर वंदना कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी मसापच्या कार्यवाह वंदना कुलकर्णी, कोषाध्यक्ष बदीउजमा बिराजदार, पद्माकर कुलकर्णी, डॉ. अर्जुन व्हटकर, शोभा बोल्ली, फैय्याज शेख, डॉ. शिवाजी शिंदे आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या परिश्रमाच्या काळात समाजाने पाठीशी राहावे

**अदीबा अनम यांचे प्रतिपादन**

## 'मराका' गुणगौरव सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १८ मे-**

स्पर्धा परीक्षा असो किंवा कोणत्याही क्षेत्रात एखाद्याने यश मिळवल्यानंतर सर्व समाजाकडून त्यांच्यावर सत्काराचा वर्षाव होतो. मात्र त्यांना खरी गरज त्यांच्या परिश्रम व संघर्षाच्या काळात असते, अशा काळात समाजाने त्यांच्या पाठीशी राहण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत क्रमांक मिळविलेल्या यवतमाळच्या कन्या अदिबा अनम यानी केले.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक अधिकारी कर्मचारी असोसिएशन (मराका) तर्फे ईद मिलन व गुणगौरव समारंभात ती बोलत होती. आदिबा हसन अशपाक अहमद ही महाराष्ट्रातील मुस्लिम समाजातील पहिली आयएएस महिला ठरली आहे. तिच्यासह युपीएस्सी मध्ये ५९४ क्रमांक मिळविला सय्यद मोहम्मद आरिफ मोमीन आणि एमपीएससी व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्याचा सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जे जे. हॉस्पिटलच्या औषध निर्माण शास्त्र विभागाचे माजी प्रमुख,गुणश्री डॉ.सादिक पटेल होते तर अध्यक्षस्थानी लेखा व कोषा विभागाचे माजी संचालक एजाज नकवी होते. भायखळ्यातील खिलाफत हाऊसच्या सभागृहात झालेल्या यां सोहळ्याचे आयोजन असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष व जीएसटी विभागाचे सहआयुक्त हाजी जतकर व संघटनेच्या अन्य पदाधिकाऱ्यांनी अत्यंत नेटक्या पद्धतीने केले होते. आपल्या यशाची चित्तरकथा सांगून आदिबा हसन म्हणाली,' प्रतिकूल परिस्थितीत मोठ्या चिकाटीने स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समाजातील जाणकार मंडळीने नेहमी पुढाकार घेतला पाहिजे. योग्य अनेक अडचणींना सामोरे जात असतात त्यांना जात धर्म न पाहता आवश्यक सोयी, सुविधा उपलब्ध करून द्याव्यात त्यामुळे यशाचे प्रमाण नक्कीच वाढेल.' डॉ. सादिक पाटील म्हणाले की, आपल्या समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षण हाच एकमेव मार्ग आहे. त्यामुळे त्याचा ध्यास धरला पाहिजे अशा गुणवंत युवक -युवतीमुळे देशाचे भविष्य निश्चित होत असते.'संस्थापक हाजी जतकर यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेऊन समाजातील, अधिकारी, कर्मचारी व गुणवंत विद्यार्थाच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे सांगितले.

### पत्रकार जमीर काझी यांचा सन्मान

गेल्या अडीच दशकापासून मराठी पत्रकारितेत कार्यरत असलेल्या जमीर काझी यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. पत्रकारितेतील त्यांच्या योगदानाबद्दल डॉ. सादिक पटेल यांच्या हस्ते त्यांना मानचिन्ह, शाल, श्रीफळ देण्यात आले. जमीर काझी मूळचे कोल्हापूरचे असून गेल्या अठरा वर्षापासून मुंबईत कार्यरत आहेत. उत्कृष्ट पत्रकारितेबाबत त्यांना महाराष्ट्र शासनासह विविध सामाजिक संस्था, संघटनांकडून गौरविण्यात आले आहे.

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### जास्मिन पाओलिनीला इटालियन ओपनचे जेतेपद

**रोम :** घरच्या आवडत्या जास्मिन पाओलिनीने इंटरनॅझिओनाली बीएनएल डीइटालियामध्ये इतिहास घडवला. चार



दशकांत पहिल्यांदाच इटालियन इंटरनॅशनलला महिला एकेरीत इटालियन विजेता मिळाला. कॅम्पो सेंट्रल येथे झालेल्या अंतिम सामन्यात सहाव्या मानांकित पाओलिनीने अमेरिकेच्या चौथ्या मानांकित कोको गॉफचा ६-४, ६-२ असा पराभव करून ऐतिहासिक विजेतेपद पटकावले. ४० वर्षांपूर्वी १९८५ मध्ये राफेला रेगीनंतर आपल्या देशातील सर्वात मोठ्या स्पर्धेत विजय मिळवणारी पाओलिन ही पहिली महिला आहे. तसेच, टोरांटो येथे झालेल्या या स्पर्धेत रेगीने विजेतेपद जिंकले, म्हणजेच खुल्या काळात (१९६८ पासून) पाओलिनीने तिच्या राष्ट्रीय राजधानी रोममध्ये इंटरनॅझिओनाली बीएनएल डीइटालिया जेतेपद जिंकणारी पहिली महिला होती. पहिल्या सेटमध्ये ४-१ ने पिछाडीवर पडल्यानंतर, दोन सेट पॉइंट वाचवून, रोम फायनलमध्ये पोहोचणारी ती ओपन एरामधील तिसरी इटालियन महिला ठरली. तिने १ तास ३९ मिनिटांत पेटन स्टर्न्सचा ७-५, ६-१ असा पराभव केला. दुहेरीच्या अंतिम फेरीत ती व सारा एरानी त्यांचे दुहेरीचे विजेतेपद राखण्याचा प्रयत्न करतील.

### फिट इंडिया संडे सायकल रॅलीत ऑलिम्पियन, ग्रॅण्डमास्टर

**नवी दिल्ली :** रविवारी येथे आयोजित फिट इंडिया संडेज ऑन सायकल रॅलीमध्ये ऑलिम्पिकपटू, बुद्धिबळ ग्रॅण्डमास्टर्स व अभिनेते सहभागी झाले. फिटनेस आयकॉनसह सेलिब्रिटी सायटकल रॅलीत सहभागी होऊन देशभरात तंदुरुस्तीबद्दल जागृती केली. आरोग्य, समुदाय आणि स्वच्छ हवेसाठी एकत्रित प्रयत्न करण्यासाठी सीबीआयसी-जीएसटी केंद्रांवर हजारो लोक एकत्र आले होते. तंदुरुस्ती ही आज सायकलिंगसारखी एक दिवसाची गोष्ट नसावी, तर एकूण आरोग्यासाठी दररोज सराव केला पाहिजे. तरच फरक पडतो, असे अभिनेता सुनील शेट्टी मुंबईतील जीएसटी आयुक्तालयात आयोजित सायकल रॅलीत म्हणाला. तिरुवनंतपुरम येथे तीन प्रसिद्ध ऑलिम्पिकपटू व आंतरराष्ट्रीय खेळाडू - जिस्ना मॅथ्यू (रिओ २०१६, ४४०० मीटर), एम.पी. जबीर (टोकियो २०२०, ४०० मीटर अडथळे) आणि अनु राघवन (आशियाई खेळ आणि अजिंक्यपद पदक विजेती) यांनी हिरवा झेंडा दाखवला.

### सामन्यापूर्वी खेळाडूंनी सशस्त्र दलांना वाहिली श्रद्धांजली

**जयपूर :** रविवारी येथील सवाई मानसिंग स्टेडियमवर आयपीएल २०२५ च्या सामन्यापूर्वी राजस्थान रॉयल्स आणि पंजाब किंग्ज या दोन्ही खेळाडूंनी भारतीय सशस्त्र दलांना श्रद्धांजली वाहण्यासाठी रांगेत उभे राहून भारतीय राष्ट्रगीत वाजवले. पाकिस्तानसोबतच्या सीमेपलीकडील तणावामुळे एक आठवड्याच्या विश्रांतीनंतर शनिवारी आयपीएल २०२५ पुन्हा सुरू झाल्यानंतर आरआर-पीबीकेएस सामना हा पहिलाच सामना आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यातील शनिवारीचा सामना बंगळुरूमध्ये नाणेफेक न होता पावसामुळे रद्द झाला, ज्यामुळे आयपीएल पुन्हा सुरू होण्याचा उत्साह मावळला. शत्रूपासून देशवासीयांचे रक्षण करण्यासाठी त्यांच्या निर्दोष शौर्याचे प्रदर्शन करणाऱ्या भारतीय सशस्त्र दलांना श्रद्धांजली वाहण्यासाठी, खेळाडूंनी सामना सुरू होण्यापूर्वी त्यांच्या मौल्यवान योगदानाचा सन्मान करण्यासाठी एकत्रितपणे राष्ट्रगीत गायले. भारतीय राष्ट्रगीत वाजले तेव्हा स्टेडियमच्या स्क्रीनवर ''सशस्त्र दलांचे आभार'' असा संदेश प्रदर्शित होत होता.

### रद्द झालेल्या सामन्याच्या तिकिटांचे पैसे परत करणार

**बंगळुरू :** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने शनिवारी सततच्या पावसामुळे बंगळुरूमधील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्स विरुद्धच्या सामन्यासाठी तिकिटांचे पैसे क्रिकेट रसिकांना परत करणार असल्याचे जाहीर केले. हा सामना एकही चेंडू न टाकता रद्द करण्यात आला होता. १७ मे २०२५ रोजी आरसीबी आणि केकेआर यांच्यातील सामना वाईट हवामानामुळे रद्द करण्यात आला होता, त्यामुळे सर्व वैध तिकीटधारक पूर्ण परतफेड करण्यास पात्र आहेत, असे फ्रॅन्चायझीने एका निवेदनात म्हटले आहे. डिजिटल तिकीट धारकांना तिकिटे बुक करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या त्यांच्या मूळ खात्यात १० कामकाजाच्या दिवसांत परतफेड दिली जाईल. जर तुम्हाला ३१ मे पर्यंत परतफेड मिळाली नाही, तर प्रकरण वाढविण्यासाठी कृपया बुकिंग तपशीलांसह ईमेल कळवू शकता. फिजिकल तिकीट धारकांना परतफेड मिळविण्यासाठी त्यांचे मूळ तिकीट संबंधित अधिकृत स्त्रोताकडे परतफेड करणे आवश्यक आहे

## नेहल, हरप्रीतमुळे पंजाब प्लेऑफच्या समीप

**जयपूर, १८ मे**

येथे शेवटच्या चेंडूपर्यंत रोमांचक ठरलेल्या आयपीएल सामन्यात नेहल वढेरा व हरप्रीत ब्रारच्या प्रभावी खेळाच्या जोरावर पंजाब किंग्जने राजस्थान रॉयल्सवर अवघ्या १० धावांनी रोमांचक विजय नोंदविला. या विजयाबरोबर पंजाब किंग्ज प्ले-ऑफच्या समीप पोहोचला आहे. १२ सामन्यातील आठव्या विजयाबरोबरच पंजाबने १७ गुणांसह गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावरून दुसऱ्या स्थानावर झेप मारली. प्ले-ऑफच्या शर्यतीतून आधीच बाहेर झालेल्या राजस्थानला दिलासादायक विजयसुद्धा मिळवता आला नाही.



सामनावीर हरप्रीत ब्रारचे २२ धावांत ३ बळी



नेहल वढेरा धावा ७०, चेंडू ३७, चौकार ५, षट्कार ५

यशस्वी जयस्वाल व वैभव सूर्यवंशीच्या खेळीमुळे राजस्थान रॉयल्सने पाठलाग करताना दमदार सुरुवात केली, पण अखेर त्यांना १० धावांनी पराभव पत्करावा लागला. नेहल वढेरा आणि हरप्रीत ब्रारने पंजाब किंग्जला प्लेऑफच्या जवळ नेले.

नेहल वढेरा व शशांक सिंगच्या दमदार फलंदाजीच्या आधारावर पंजाब किंग्जने २० षटकांत ५ बाद २१९ धावा उभारल्या आणि राजस्थानसमोर विजयासाठी २२० धावांचे लक्ष्य ठेवले, परंतु धावांचा पाठलाग करताना राजस्थानला २० षटकांत ७ बाद २०९ धावांपर्यंतच मजल मारता आली.

पंजाब किंग्जकडून नेहल वढेराने ३७ चेंडंत प्रत्येकी ५ चौकार व षट्कारांसह ७० धावांचे, तर शशांक सिंगने ३० चेंडुंत ५ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने नाबाद ५९ धावांची खेळी केली. कर्णधार श्रेयस अय्यरने ३० धावांची, तर अझमतुल्लाह ओमरझाईने नाबाद २१ धावांची भर घातली.

धावांचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सच्या २३ वर्षीय आणि १४ वर्षीय खेळाडूंनी टी-२० फलंदाजीला नवीन उंचीवर नेले. यशस्वी जयस्वाल व वैभव सूर्यवंशीने ७६ धावांची सलामी भागीदारी केली, यात त्यांनी केवळ चौकारांच्या मदतीने ७४ धावा काढल्या. चांगली सुरुवात करूनही राजस्थान रॉयल्सचे दुर्दैव त्यांना दहा धावांनी पराभव पत्करावा लागला. सलामीवीर यशस्वी जयस्वालने २५ चेंडूंत ९ चौकार व एका षट्कारसह ५० धावांची, तर वैभवने अवघ्या १५ चेंडूत प्रत्येकी ४ चौकार व षट्कारांसह ४० धावांची खेळी केली. (वृत्तसंस्था)

## लखनौच्या आशा अजूनही शिल्लक

**लखनौ, १८ मे**

इंडियन प्रीमियर लीग हंगामात सोमवारी येथे लखनौ सुपर जायण्ट्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. लखनौ या लढतीत आयपीएल प्ले-ऑफच्या शर्यतीत जीवंत राहण्यासाठी शेवटचा प्रयत्न करणार आहे, तर ऋषभ पंत आपल्या कामगिरीत सुधारणा करण्याचा प्रयत्न करणार आहे.

गत वर्षी अंतिम फेरी गाठणाऱ्या सनरायझर्स हैदराबाद आधीच प्ले-ऑफ शर्यतीतून बाहेर झाला आहे व ते आत्मसन्मानासाठी खेळणार आहे, तर लखनौ सुपर जायण्ट्सला तीन जोरदार विजयांसह १६ गुण मिळवता आले तर त्यांना अंतिम चारमध्ये प्रवेश करण्याची संधी आहे. लखनौचा नेट रन-रेट -०.४६९ आहे, परंतु शेवटच्या तीन प्रतिस्पर्धी संघांवर पूर्णपणे वर्चस्व गाजविल्याशिवाय त्यांना पर्याय नाही.

नितीश कुमार रेड्डी व ईशान किशनसारखे खेळाडू इंग्लंड दौऱ्यासाठी रवाना होण्यापूर्वी सनरायझर्स हैदराबादसाठी काही धावा काढायला हरकत नाही.

तथापि, लखनौ सुपर जायण्ट्सचा कर्णधार पंत याचा वैयक्तिक फॉर्म आयपीएल लिलावात त्याच्या विक्रमी २७ कोटी रुपयांच्या बोलीनंतर घसरला आहे. त्याने ११ सामन्यांत १०० पेक्षा कमी स्ट्राईक-



ऋषभ पंत



पॅट कमिन्स

रेट व १२.८० च्या सरासरीने १२८ धावा काढल्या. पंतचे नाव कसोटी उपकर्णधारपदासाठी चर्चेत आहे आणि आयपीएल हा एक वेगळा फॉरमॅट असला तरी, काही प्रभावी डाव खेळणे आणि संघाला विजयाकडे नेणे हे कोणत्याही मोठ्या घोषणेपूर्वी नेहमीच चांगले असते.

लखनौला त्यांचा मुख्य फलंदाज निकोलस पूरन (४१० धावा) पुन्हा एकदा आक्रमक खेळ करण्यास उत्सुक असेल, कारण पहिल्या पाच-सहा सामन्यांमध्ये चांगली सुरुवात केल्यानंतर त्याच्या धावांचा वेग मंदावला होता. न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज विल्यम ओ रौर्क हा जखमी मयंक यादवच्या जागी स्वागतार्ह खेळाडू आहे. दक्षिण आफ्रिकेच्या एडन मार्कराम (३४८) व मिशेल मार्श (३७८) या शीर्ष तीन खेळाडूंवर पुन्हा एकदा अवलंबून असेल. मधल्या फळीने अपेक्षेनुसार कामगिरी केली नाही, ही लखनौची समस्या आहे. आयुष बडोनी (३२६) वगळता. डेव्हिड मिलरनेही (१६० धावा)ी शेवटच्या षटकांमध्ये चांगली

| आजचा सामना |
| --- |
| **सनरायझर्स हैदरबाद** |
| **वि. लखनौ सुपर जायण्ट्स** |
| **स्थळ :** एकाना क्रिकेट स्टेडियम, लखनौ |
| **वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून |
| **थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर |

कामगिरी केली नाही.

लखनौची गोलंदाजी सुद्धा वाईट राहिली आहे व हंगामातील एकमेव शोध दिग्वेश राठी (८.०९ ईआर मध्ये १२ बळी) हा त्यांचा उत्कृष्ट कामगिरी करणारा खेळाडू आहे.

लखनौच्या संघात स्थिर कामगिरी करणारा रवी बिश्नोई हा संघ खूपच निराशाजनक स्थितीत आहे, त्याने प्रति षटक १० पेक्षा जास्त धावा काढल्या आहेत.

महान वेगवान गोलंदाज आवेश खान (१०.१० मध्ये १० बळी) हा प्रत्येक हंगामाप्रमाणे सातत्यपूर्ण कामगिरी करत नाही तर गेल्या चार सामन्यांमध्ये प्रति षटक १२.२५ च्या वेगाने धावा काढल्याने कसोटी तज्ज्ञ आकाश दीपला वगळावे लागले.

हैदराबाद संघात, पंजाबसाठी नियमितपणे लाल चेंडू खेळणारा अभिषेक शर्मा (३११ धावा) इंग्लंड दौऱ्यासाठी भारत अ संघात दुर्लक्षित करण्यात आल्याने तो नाराज असेल. अभिषेक एक ताकदवान खेळाडू आहे. (वृत्तसंस्था)

## शेरबिनीला विक्रमी आठवे जेतेपद

### जागतिक स्क्वॅश स्पर्धा ● असलने पटकावला पहिला मुकुट

**शिकागो, १८ मे**

येथे झालेल्या जागतिक स्क्वॅश स्पर्धेत इजिप्तच्या नूर एल शेरबिनी आणि मुस्तफा असलने अनुक्रमे महिला आणि पुरुष गटाचे विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेत सलग १० व्यांदा अंतिम फेरीत खेळताना २९ वर्षीय एल. शेरबिनीने आपल्या देशाची आणि जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकाची हानिया एल. हम्मामीचा ३-१ (११-५, ११-९, ४-११, ११-७) पराभव करून आपले विक्रमी आठवे विजेतेपद पटकावले. जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकाची एल. शेरबिनीने निकोल डेव्हिडच्या आठ जागतिक अजिंक्यपद विजेतेपदांच्या सर्वकालीन विक्रमाशी बरोबरी केली.

सर्वजण निकोलच्या विक्रमाबद्दल बोलत होते, मात्र मी कधीच विचार केला नव्हता की मी ते जिंकेन. हे अविश्वसनीय आहे. या यशाचे शब्दांत वर्णन करू शकत नाही, परंतु माझा हंगाम खरोखरच कठीण गेला आहे. मी हे विजेतेपद जिंकल्याचा मला आनंद आहे, असे एल. शेरबिनीने विजयानंतर सांगितले.

पुरुषांच्या अंतिम सामन्यात जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या मुस्तफा असलने जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या आणि त्याच्याच देशाच्या अली फरागचा ३-० (११-७, ११-८, ११-३) पराभव करून आपले पहिले विजेतेपद पटकावले.

२४ वर्षीय असलकडे आता पीएसए वर्ल्ड चॅम्पियनशिप आणि ब्रिटिश ओपन जेतेपदे तसेच जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाचे स्थान




मुस्तफा असल व नूर एल. शेरबिनी

आहे.


जर तो अंतिम सामन्यात ३३ वर्षीय खेळाडूकडून पराभूत झाला असता तर त्याने चार वेळाविश्वविजेत्या फरागला गमावले असते. (वृत्तसंस्था)

## शास्त्रींनी रोहितला सलामीवीर करण्याचा निर्णय घेतला

**दुबई, १८ मे**

२०१९ मध्ये जेव्हा तत्कालीन प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी रोहित शर्माला मधल्या फळीत कंटाळवाणा होताना पाहिले, तेव्हा त्यांनी त्याला वरच्या फळीत ढकलले. शास्त्रीचा हा निर्णय एक मास्टर स्ट्रोक ठरला आणि पारंपारिक स्वरूपात हिटमॅनच्या कारकिर्दीला पुन्हा आकार दिला.

शास्त्री २०१७ मध्ये भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक झाले आणि २०२१ मध्ये राहुल द्रविडकडे सूत्रे सोपवली आणि त्यांच्या चार वर्षांच्या घटनापूर्ण कार्यकाळात रोहित भारताने निर्माण केलेल्या सर्वात घातक कसोटी





सलामीवीरांपैकी एक झाला.

चौथ्या, पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करताना रोहितला कंटाळा यायचा. मग मी विचार करू लागलो की, तो एकदिवसीय क्रिकेटमध्ये इतका यशस्वी का आहे? त्याला लवकर खेळायला आवडते, असे शास्त्री आयसीसी रिव्ह्यूमध्ये म्हणाले.

जर तो मैदानात लवकर जाऊन ते करू शकत असेल, तर त्याच्याकडे जलद गोलंदाजांना खेळण्यासाठी पुरेसा वेळ आहे. जर तो ते स्वीकारू लागला तर कसोटी क्रिकेट त्याच्यासाठी मधुचंद्र ठरू शकते असा विचार मी केला, असे शास्त्रींनी सांगितले.

रोहितने अलीकडेच कसोटी क्रिकेट कारकिर्दीतून निवृत्ती घेतली आहे. त्याने ६७ सामन्यांच्या शानदार कारकिर्दीत १२ शतके व १८ अर्धशतकांसह ४,३०१ धावा केल्या.

२०१९ च्या विश्वचषकात रोहितला कसोटी सलामीवीर म्हणून वापरण्याचा विचार केला होता, जेव्हा त्याने पाच शतके झळकावली आणि ८१ च्या सरासरीने ६४८ धावा करून स्पर्धेत आघाडीचा धावपटू म्हणून पुढे आला, असे त्यांनी सांगितले.

रोहितला सलामीवीर म्हणून पुढे नेण्याच्या कल्पनेवर तत्कालीन कर्णधार विराट कोहलीशी चर्चा केली. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत त्याने दोन शतके ठोकली, रोहितला त्वरित यश मिळाले. रोहितने आपल्या तंत्र व हाताच्या हालचालींसाठी बराच वेळ दिला आणि त्यामुळे त्याला एक यशस्वी सलामीवीर होण्यास मदत झाली, असे शास्त्री यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

## इंग्लंडने डेटा विश्लेषकांना काढले

**लंडन, १८ मे**

इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट मंडळाने (ईसीबी) भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेच्या काही आठवड्यांपूर्वी आपले डेटा विश्लेषक फ्रेडी वाइल्ड आणि नॅथन लीमन यांना काढून टाकले आहे. मुख्य प्रशिक्षक ब्रेंडन मॅक्युलम संघ भावना व अंतर्ज्ञानावर अधिक भर देऊ इच्छित असल्यामुळे ईसीबीने हा निर्णय घेतला.

इंग्लंडच्या नवीन जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेची सुरुवात २० जूनपासून हेडिंग्ले येथे सुरू होणाऱ्या एका नवीन स्वरूपाच्या भारतीय संघाविरुद्ध पाच सामन्यांच्या मालिकेने होते.

इंग्लंडचे दोन वरिष्ठ क्रिकेट विश्लेषक, नॅथन लीमन आणि फ्रेडी वाइल्ड हे संघ सोडत आहेत. त्यामुले राष्ट्रीय संघ पुढे जाणाऱ्या डेटावर कमी भर देईल, असे द डेली टेलिग्राफने वृत्त दिले आहे.

या महिन्याच्या अखेरीस वेस्ट इंडीजविरुद्ध होणाऱ्या इंग्लंडच्या व्हाईट-बॉल मालिकेत दोघेही सहभागी होणार नाहीत, त्यामुळे हॅरी ब्रुक मर्यादित षटकांच्या दोन्ही स्वरूपांमध्ये कर्णधार म्हणून कारकिर्दीला सुरुवात करणार आहे, असे अहवालात म्हटले आहे.

खेळाडू नेहमीच विश्लेषकांचा सल्ला घेण्यास मोकळे असतात, परंतु व्यवस्थापन खेळाडूंनी त्यांच्या अंतःप्रेरणेवर अवलंबून राहावे यावर भर देते. फ्रॅन्चायझी संघ आता इंग्लंडपेक्षा डेटाचा वापर जास्त प्रमाणात करतात, असा आयपीएल आणि राष्ट्रीय संघात काम केलेल्या अंतर्गत खेळाडूंचा विश्वास आहे. (वृत्तसंस्था)

## मनिका, मानव एकेरीत विजयी

### हरमीत-यशस्विनी जोडी पहिल्या फेरीतच बाहेर

**दोहा, १८ मे**

कतारमधील दोहा येथे सुरू असलेल्या जागतिक टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत रविवारी भारतीय खेळाडू मनिका बत्रा व मानव ठक्करने आपल्या एकेरी मोहिमेची विजयी सुरुवात केली तर अंकुर भट्टाचार्य पहिल्या फेरीतच पराभूत झाले.

मनिकाने तिच्या पहिल्या फेरीतील सामन्यात नायजेरियाच्या फातिमा बेलोविरुद्ध २३ मिनिटांत ४-० (११-५, ११-६, ११-८, ११-२) असा विजय मिळवला. २२ व्या मानांकित भारतीय खेळाडूला ६४ व्या फेरीत सिंगापूरच्या टॅन झाओ युन किंवा कोरियाच्या पार्क गह्येओन यांच्याशी सामना करावा लागेल. पुरुष एकेरीत, मानवने न्यूझीलंडच्या टिमोथी चोईचा ४-१ (११-३, ११-८, ६-११, ११-७, १४-१२) असा पराभव केला तर अंकुरला हाँगकाँगच्या लाम सिउ हाँगकडून १-४ (११-४, ७-११, ९-११, १०-१२, ८-११) असा पराभव पत्करावा लागला. दुसरीकडे, भारताच्या मिश्र दुहेरी मोहिमेची सुरुवात कडू-गोड झाली. नवव्या मानांकित मानुष शाह व दिया चितळे या जोडीने सरळ गेममध्ये विजय मिळवून सुरुवात केली, तर १४ व्या मानांकित हरमीत देसाई आणि यशस्विनी घोरपडे या जोडीला २-० च्या आघाडीचा फायदा उठवता आला नाही आणि पहिल्या फेरीतच स्पर्धेतून बाहेर होताना तीन मॅच पॉइंटही वाया घालवले.गेल्या महिन्यात ट्युनिसमध्ये त्यांचे पहिले कंटेंडर जेतेपद जिंकणाऱ्या मानुष आणि दिया यांना अल्जेरियन जोडी मेहदी बोलोसा आणि मलिसा नसरी यांना १६ मिनिटांत ३-० (११-२, ११-७, ११-६) ने हरवण्यात कोणतीही अडचण आली नाही. (वृत्तसंस्था)

## खेलो इंडियामध्ये अनेक खेळांचा समावेश करणार

### क्रीडा मंत्री मनसुख मंडाविया यांची घोषणा

**नवी दिल्ली, १८ मे**

क्रीडा मंत्री मनसुख मंडाविया यांनी रविवारी खेलो इंडिया उपक्रमाची व्याप्ती वाढवण्याची घोषणा केली असून या वर्षापासून शालेय खेळ, मार्शल आर्ट्स, समुद्रकिनारे आणि जलक्रीडा यांचा समावेश असलेल्या अनेक खेळांचा समावेश करण्यात येणार आहे.

खेलो इंडिया वार्षिक कॅलेंडर सादर करताना मंडाविया म्हणाले की सरकार लवकरच खेलो इंडिया गेम्स आणि इतर स्पर्धांची मालिका सादर करेल, यात खेलो इंडिया ईशान्य खेळांचा समावेश आहे.

भारताची क्रीडा परिसंस्था मजबूत करणे, तळागाळातील स्पर्धांना चालना देण्यासाठी वर्षभर धोरणात्मक वेळापत्रक प्रदान करणे, प्रतिभा ओळखणे हे उद्दिष्ट आहे, असे ते म्हणाले.

खेलो इंडिया वार्षिक कॅलेंडर हे केवळ एक वेळापत्रक नाही, तर भारताला जागतिक क्रीडा महासत्ता बनवण्यासाठी भारताच्या देशांतर्गत स्पर्धा संरचना मजबूत करणारा एक धोरणात्मक आराखडा आहे, असे मांडविया म्हणाले. गत दशकात भारतीय खेळांमध्ये उल्लेखनीय परिवर्तन झाले आहे. आम्ही खेलो इंडिया उपक्रमांतर्गत नियमित राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसह एक गतिमान व समावेशक क्रीडा परिसंस्था तयार केली आहे. आम्ही लवकरच खेलो इंडिया बीच गेम्स, खेलो इंडिया स्कूल गेम्स, खेलो इंडिया वॉटर स्पोर्ट्स, खेलो इंडिया



नॉर्थ-ईस्ट गेम्स, इत्यादी सादर करणार आहोत. हे कार्यक्रम भारतातील तरुण प्रतिभेची ओळख पटविण्यासाठी, त्यांचे संगोपन करण्यासाठी व त्यांना तयार करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतील, असे त्यांनी सांगितले.

खेलो इंडिया व्यासपीठात आधीच चार संरचित राष्ट्रीय-स्तरीय खेळांचा समावेश आहे, म्हणजे खेलो इंडिया युथ गेम्स, खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स, खेलो इंडिया पॅरा गेम्स आणि खेलो इंडिया हिवाळी क्रीडा स्पर्धा. खेलो इंडिया स्कूल गेम्सवर विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे. हे गेम्स जिल्हा पातळीपासून सुरू होऊन राज्य पातळीपर्यंत जाईल आणि राष्ट्रीय-स्तरीय स्पर्धांमध्ये संपेल. खेलो इंडिया बीच गेम्सची (केआयबीजी) पहिली आवृत्ती १९ ते २५ मे दरम्यान दीव येथे होणार आहे, जी किनारी आणि समुद्रकिनाऱ्यावरील खेळांकडे राष्ट्रीय लक्ष वेधून घेईल, तसेच या प्रदेशाच्या पर्यटन क्षमतेवरही प्रकाश टाकेल. वर्षाच्या उर्वरित कॅलेंडरमध्ये खेलो इंडिया स्कूल गेम्स (ऑगस्ट ते डिसेंबर), खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स (मार्च-एप्रिल), वॉटर स्पोर्ट्स आणि ईशान्य खेळ (मे-जून), आदिवासी खेळ (छत्तीसगडमध्ये सप्टेंबर) आणि स्वदेशी आणि मार्शल आर्ट गेम्स (तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात जुलै-ऑगस्ट) यासारख्या कार्यक्रमांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

## छेत्रीने दिली महिलांच्या राष्ट्रीय शिबिराला भेट

**बंगळुरू, १८ मे**

वरिष्ठ पुरुष राष्ट्रीय फुटबॉल संघाचा कर्णधार सुनील छेत्रीने येथील महिलांच्या राष्ट्रीय फुटबॉल शिबिराला भेट दिली. यावेळी आक्रमक खेळाडू छेत्रीला सर्व संघ सदस्यांनी स्वाक्षरी केलेली भारतीय किट भेट म्हणून दिली.

पुढील महिन्यात होणाऱ्या एएफसी महिला आशियाई चषक २०२६ पात्रता फेरीसाठी महिला संघ तयारी करत असताना छेत्रीने महिला संघासाठी काही प्रोत्साहनपर शब्द सांगितले. क्रिस्पिन छेत्री यांच्या प्रशिक्षित वरिष्ठ महिला राष्ट्रीय संघ सध्या बंगळुरू येथील पदुकोण-द्रविड सेंटर फॉर स्पोर्ट्स एक्सलन्स येथे सराव करत आहे आणि २९ मे आणि ३ जून रोजी शहरात उझबेकिस्तानविरुद्ध दोन फिफा महिला आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामने देखील खेळणार आहे. शिबिरात बरेच तरुण खेळाडू आहेत व त्यांच्याबद्दल मुख्य प्रशिक्षकांकडून मला खूप चांगला प्रतिसाद मिळाला,



महिला फुटबॉलपटूंशी संवाद साधताना सुनील छेत्री

असे छेत्री म्हणाला.

प्रत्येकजण आनंदी आणि उत्साही दिसत होता. उझबेकिस्तानविरुद्ध आणि नंतर आशियाई चषक पात्रता फेरीत त्यांच्याकडे काही चांगले मैत्रीपूर्ण सामने आहेत आणि मी त्यांना शुभेच्छा देतो. मला केवळ त्यांनी आनंदी राहावे, एकत्र आरामदायी वाटावे आणि त्यांच्या प्रशिक्षणाचा आनंद घ्यावा असे वाटते, असे तो म्हणाला.


गट ब मध्ये समाविष्ट असलेला भारतीय महिला संघ २३ जून रोजी थायलंडमधील चियांग माई येथे मंगोलियाविरुद्ध एएफसी महिला आशियाई कप २०२६ पात्रता मोहिमेची सुरुवात करेल. त्यानंतर त्यांचा सामना तिमोर-लेस्टे (२९ जून), इराक (२ जुलै) आणि यजमान थायलंड (५ जुलै) यांच्याशी होईल. (वृत्तसंस्था)

महत्वाचे...



## मराठा सेवा संघाच्या शहर सहसचिवपदी विजय मुळे

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१८ मे-**
मराठा सेवा संघाच्या शहर सहसचिवपदी विजय बबन मुळे यांची निवड करण्यात आली आहे. मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष संतोष मोळवने यांनी बुधवारी विजय मुळे यांना निवडीचे पत्र दिले. यावेळी प्रा. किरण गाढवे उपस्थित होते. बार्शी नगर परिषदेतील गणेश कारकर पाटील यांची कार्याध्यक्षपदी तर माधवराव देशमुख यांची शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली. येत्या काही दिवसात बहुजन समाजातील गरजू, गरीब, होतकरु विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले जाणार असल्याचेही मुळे यांनी सांगितले. या निवडीबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.



## आष्टी सिंचन योजनेतून पोखरापूर तलावात आले पाणी

### महामार्ग रास्ता रोकोच्या इशाऱ्यानंतर उजनी कालवा विभागाची कार्यवाही

**मोहोळ, दि.१८ मे-**
आष्टी उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक दोनअंतर्गत पोखरापूर, खवणी, सारोळे या गावांना शेतीसाठी आवश्यक असलेले हक्काचे पाणी उजनी कालवा विभागाने सोडले नव्हते. शेतकऱ्यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला त्यानंतर तहसील कार्यालयात ग्रामस्थ, शेतकरी, पोलिस प्रशासन यांच्यात संयुक्त बैठकही घेण्यात आली. शेतकऱ्यांच्या आंदोलनाची तीव्रता लक्षात येताच पोखरापूर तलावात अखेर आष्टी उपसा सिंचन योजनेतून पाणी सोडले. त्यामुळे शेती पिकांना फायदा होणार आहे. पोखरापूर तलावात नियोजनाप्रमाणे पाणी सोडले जात नव्हते. जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी १७ फेब्रुवारी रोजी लेखी आदेश दिल्यानंतरही पाणी प्रश्न मार्गी लागला नव्हता. संतप्त शेतकऱ्यांनी शासनाच्या उदासीन धोरणाविरोधात आंदोलनचा इशारा दिला होता. तत्काळ प्रांताधिकारी, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता, उजनी कालवा विभाग क्रमांक ९ चे कार्यकारी अभियंता यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची निवासी नायब तहसीलदार संदेश भोसले, नायब तहसीलदार धाईंजे यांनी माहिती दिली होती. शेतकऱ्यांना आंदोलनापासून परावृत्त करण्यासाठी लेखी आश्वासन देण्यात आले होते. त्या आश्वासनानंतर अखेर पोखरापूर तलावात पाणी सोडण्यात आले.

## कोरफळे गावात धान्य मागण्याच्या कारणावरुन एका व्यक्तींवर तलवार-कु-हाडीने हल्ला, दोघे जखमी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १८ मे-**
गावात धान्य मागण्यासाठी गेलेल्या पारधी समाजातील व्यक्तीवर गावातीलच भावकीतील काही लोकांनी तुम्ही गावात धान्य मागायचे नाही म्हणून तलवार, कु-हाडी व गजाने हल्ला करुन जखमी केल्याची घटना दि. १५ मे रोजी घडली. या हल्ल्यात दोघेजण गंभीर जखमी झाले असून, बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सचिन भारत काळे (वय ४०) रा. कोरफळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांचे वडील भारत आप्रिशा काळे हे गावातील लोकांकडून राखणीच्या बदल्यात धान्य मागून घरी येत असताना त्यांना राजकुमार रामराया काळे याच्या घरासमोर शिवीगाळ करण्यात आली. यानंतर गणेश शांड्या काळे, सुरज शांड्या काळे, शाया रामराया काळे व सोनी गणेश काळे यांनी तुम्ही गावात धान्य मागणे बंद कर, असे म्हणत दमदाटी केली. संध्याकाळी ६ च्या सुमारास गावातील चौकात सचिन काळे यांच्यावर पुन्हा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात गणेश काळे याने तलवारीने, शांड्या काळे याने कु-हाडीने तर सुरज काळे याने गजाने वार करुन जखमी केले. महिलांनीही लाथाबुक्यांनी मारहाण केली. वडील भारत काळे यांनी सोडविण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्यावरही तलवारीने वार करण्यात आला. घटनेनंतर जखमींना बार्शीतील सरकारी रुग्णालयात उपचारानंतर या घटनेबाबत सचिन काळे यांनी शांडया रामराया काळे, सविता शांड्या काळे, गणेश शांड्या काळे, सुरज शांड्या काळे व सोनी गणेश काळे सर्व रा कोरफळे यांच्याविरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# अवकाळीच्या नुकसानीचे पंचनामे करून त्वरीत मदत जाहीर करा

### खासदार प्रणिती शिंदे यांची मागणी; येवती व पापरीत केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**
जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक पिकांना फटका बसला असून आर्थिक नुकसानही झाले आहे. त्यामुळे त्वरीत पंचनामे करून शासनाने मदत जाहीर करावी अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी केली आहे.

खासदार प्रणिती शिंदे यांनी मोहोळ तालुका गावभेट दौऱ्यानिमित्त येणकी, मिरी, अरबळी या गावांना भेट देऊन नागरिकांच्या गाठी भेटी घेत संवाद साधला. ग्रामस्थांचे निवेदन स्वीकारून समस्या लवकरात लवकर सोडविणार असल्याचे सांगितले. तसेच अवकाळी पाऊसामुळे सोलापूर जिल्ह्यातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. खासदार प्रणिती शिंदे यांनी मोहोळ तालुक्यातील येवती, पापरी या गावातील नुकसान झालेल्या शेतीची पाहणी केली व संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. शेतकऱ्यांशी संवाद साधत शासनाकडून मदत मिळवून देण्याचे प्रयत्न करणार असल्याचे सांगत



त्यांना धीर दिला. तसेच खासदार प्रणिती शिंदे यांच्या खासदार निधीतून येणकी मिरी वडापूर रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे या कामासाठी १५ लाख ८८ हजार ६८९ रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यातून होणाऱ्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात खासदार शिंदे यांच्या करण्यात आले. यावेळी मोहोळ तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी, जिल्हा काँग्रसचे उपाध्यक्ष राजेश अप्पा पवार, संदीप पाटील, अनुसूचित जाती विभाग जिल्हा अध्यक्ष अँड मयूर खरात, सरपंच नौशाद पाटील, जिल्हा युवक काँग्रेस सरचिटणीस आरिफ पठाण, उपसरपंच दत्तात्रय राऊत, आकाश खरात, रफिक पाटील, विनायक चोरगे, नितीन शिंदे, आबासाहेब जगदाळे, अप्पासाहेब पाटील, सीताराम जाधव, बिरप्पा काळे, उत्तम तडसरे, शबाना पाटील, राहुल पाटील, कुंडलिक तोडकर, दीपक जाधव, शुभम बाबर, नारायण गुंड, श्रीपती खरात, हणमंतू सरवदे, अप्पा पाटील, कुबेर गायकवाड, पुजारी सर, कोठे मॅडम, काशिद सर यांच्यासह पदाधिकारी, ग्रामस्थ, महिला भगिनी, युवा सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समाजाला अधर्माच्या प्रतिकारासाठी तयार करा

### प.पू. स्वामी गोविंद देवगिरीजी महाराज

### 'सनातन राष्ट्र शंखनाद' महोत्सवात प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**फोंडा (गोवा), दि.१८ मे-**
भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला माझे स्मरण कर पण युद्ध कर असे सांगितले होते. समाजाला अधर्माचा प्रतिकार करण्यासाठी तयार करण्याची आवश्यकता आहे. सनातन धर्माच्या प्रसाराचे कार्य ही साधना, ईश्वराची उपासना आहे. स्वर्णिम काळ दूर नाही, असे मार्गदर्शन श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंद देवगिरीजी यांनी केले. या वेळी देशविदेशातील २० हजारांहून अधिक हिंदू उपस्थित होते.

सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवातील 'सनातन राष्ट्र संकल्प' सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर सनातनचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले, उत्तर प्रदेश विधानसभेचे अध्यक्ष सतीश महाना, 'सनातन बोर्ड'चे प्रणेते पू. देवकीनंदन ठाकूर, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष महंत पू. रवींद्र पुरी महाराज, आचार्य महामंडलेश्वर अनंत श्री विभूषित श्री श्री १००८ स्वामी बालकानंद गिरीजी महाराज, हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे, सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता अश्विनी उपाध्याय, अयोध्या येथील सिद्धपीठ हनुमान गढी मंदिराचे महंत राजूदासजी महाराज, इंडोनेशिया येथील धर्मस्थापनम् फाऊंडेशनचे पू. धर्मयशजी महाराज, स्वामी आनंद स्वरूप आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री. दर्शक हाथी हे उपस्थित होते. या वेळी मान्यवरांमध्ये सनातन संस्थेच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्शक्ति अंजली गाडगीळ यांचीही वंदनीय उपस्थिती होती. प.पू. गोविंददेवगिरीजी महाराज पुढे म्हणाले, ''सनातन संस्थेचे संपूर्ण कार्य आध्यात्मिकतेच्या पायावर उभे आहे. भारत राष्ट्राला एक समजून काम करत आहेत. भगवद्गीता युद्धाच्या भूमीवर सांगितलेला ग्रंथ आहे. सनातन संस्थेनेही या ग्रंथाप्रमाणेच अध्यात्मापासून युद्धापर्यंत जागृती केली आहे. मी या महोत्सवामध्ये युद्धकलांचे प्रदर्शन पाहिले. मला वाटते की देशातील सर्व संतांनी त्यांच्या शिष्यांना हे शिकवले पाहिजे.'' यावेळी उत्तरप्रदेश विधानसभा अध्यक्ष सतीश महाना, अधिवक्ता अश्विनी उपाध्याय, चारुदत्त पिंगळे, महंत राजूदासजी महाराज, स्वामी बालकानंद गिरीजी महाराज, सुरेश चव्हाणके, स्वामी आनंद स्वरूप, पू. धर्मयशजी महाराज यांचेही भाषण झाले.

## केसांचे उष्णता व आर्द्रतेपासून संरक्षण करा : डॉ.वोरा

**सोलापूर** -उन्हाळा आला असताना उष्णता व आर्द्रतेमुळे केसांचे नुकसान होण्याची शक्यता असते.केस कोरडे होणे आणि केस तुटणे असा सतत संघर्ष करावा लागू शकतो, ज्यामुळे केस कम जोर व निस्तेज दिसतात.मेरिको येथील प्रमुख आरअँडडी ऑफिसर आणि हेअर केअरमधील प्रतिष्ठित तज्ञ डॉ.शिल्पा वोरा केसांचे दोन प्रमुख घटक अॅलो व्हेरा व कोकानटचा वापर करत उष्णता व आर्द्रतेच्या प्रतिकूल परिणामांपासून संरक्षण करण्याबाबत त्यांचे मत सांगत आहेत.डॉ.वोरा म्हणाल्या,केस कोमल, हायड्रेटेड/पोषक राहण्याच्या खात्रीसाठी पॅराशूट अॅडवान्स्ड अॅलो व्हेरा एनरिच कोकोनट बेस्ड हेअर ऑइल हेअर केअर रूटिनमधील परिपूर्ण भर आहे.

# सेवा फाउंडेशनतर्फे भाजपा शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर यांचा सत्कार

### संस्थापक अध्यक्ष प्रकाश(भाऊ)राठोड यांचे आयेजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मे-**
भारतीय जनता पार्टीच्या शहर अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल रोहिणी तडवळकर यांचा जुळे सोलापुरातील इंचगिरी मठासमोर कुबेर कॉम्प्लेक्स येथील सेवा फाऊंडेशनच्या वतीने संस्थापक अध्यक्ष व निवृत्त सहाय्यक आयुक्त प्रकाश भाऊ राठोड व ममता राठोड यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, बुके देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रभाग २६ च्या



नगरसेविका राजश्री चव्हाण, नगरसेविका संगीता जाधव, भाजपा महिला आघाडी चिटणीस संपदा जोशी, भाजपचे सामाजिक ज्येष्ठ कार्यकर्ते अनिल चव्हाण, नेहरू राठोड, उमेश चव्हाण, राजेश चव्हाण, आकाश चव्हाण, तुकाराम राठोड, सागर राठोड, सुरज राठोड, समाजसेविका ममता राठोड, सुमित राठोड, रिंकू राठोड, पूजा राठोड यांची उपस्थिती होती. श्री. राठोड यांनी नव्याने सुरू केलेल्या कार्यालयास सौ. तडवळकर यांनी भेट दिली. येथे नागरिकांसाठी महत्त्वाचे असलेले शासनाचे आधार कार्ड, मतदान कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड, मतदान कार्ड, आयुष्यमान कार्ड, ईश्रम कार्ड, असे अनेक शासकीय योजनेचे कागदपत्रे नागरिकांना मोफत निस्वार्थीपणे देण्यासाठी कार्यालय सुरू केल्याचे श्री. राठेड यांनी सांगितले. आतापर्यंत शेकडो लोकांनी लाभ घेतलेला आहे व सर्वसामान्य नागरिकांच्या भविष्यात सोलापूर महानगरपालिकेतील काही अडीअडचणी असतील तर ते प्राधान्याने सोडवण्यासाठी सदर कार्यालय सुरू करण्यात आलेले असून अल्पावधीतच सदर कार्यालयात जुळे सोलापुरातील नागरिकांनी प्रतिसाद दिला असून अनेक लाभ करून घेत आहेत व आपल्या समस्या दूर करून घेत असल्याचे श्री. राठोड यांनी सांगितले. शहर अध्यक्षा तडवळकर यांनी श्री. राठोड यांनी केलेले कार्य कौतुकास्पद असून व त्यांच्या प्रशासकीय कामाचा प्रचंड अनुभव याच्या जोरावर नागरिकांची कामे जलद गतीने होतील तसेच भविष्यात त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले तसेच जनतेसाठी निस्वार्थीपणे मोफत सेवा फाऊंडेशनच्या वतीने महत्त्वाची कामे करीत असल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. तसेच प्रकाश भाऊ राठोड यांची महत्त्वाची मागणी असलेली प्रताप नगर येथे नव्याने स्मशानभूमीसाठी सर्वतोपरी प्राधान्याने मदत करण्याचे ठोस आश्वासन दिले.

# सुधारित वितरण व्यवस्थेची आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, १८ मे-**
लोकसभा सदस्य धाराशिव मतदारसंघ आणि जिल्हा विद्युत समितीचे अध्यक्ष ओम प्रकाश राजेनिंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन भवन येथे केंद्र शासनाच्या सुधारित वितरण व्यवस्थेची व इतर योजनांची आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये सोलापूर जिल्ह्यातील विविध योजनांचा आढावा घेण्यात आला, ज्यामध्ये आरडीएसएस-फीडर सेपरेशन, लॉस रिडक्शन, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी, पीएम सूर्यमित्र - हर घर मुफ्त बिजली योजना, पीएम कुसुम योजना आणि मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचा समावेश होता. तालुका निहाय सर्व योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली.

बैठकीस खासदार धैर्यशील मोहिते पाटील, खासदार प्रणिती शिंदे, आमदार अभिजित पाटील, आमदार नारायण पाटील,




### बैठकीतील मुख्य मुद्दे असे होते

- स्मार्ट मीटर: समिती अध्यक्ष ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी महावितरणच्या सेवेबाबत ग्राहकांना स्मार्ट मीटरची उपयोगिता विचारली. सिंगल फेजिंग फीडर:गावठाणमध्ये रूपांतर करण्याबाबत महावितरण कंपनीने पाठपुरावा करण्याची सूचना. विद्युत वितरण हानी कमी:प्रस्तावित कामांचा आढावा घेतला. सौर कृषी पंप योजना: शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळवून देण्यासाठी महावितरण अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची सूचना.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अधीक्षक अभियंता महावितरण सुनील माने, तसेच महावितरण कंपनीत कार्यरत कार्यकारी अभियंते, महाउर्जा अधिकारी व कंत्राटदार उपस्थित होते. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नवीन उपकेंद्र उभारणीसाठी जागेच्या अडचणींवर चर्चा करण्यासाठी तत्काळ बैठक घेण्याचे निर्देश दिले. त्यांनी महावितरण कंपनीने अंतर्गत उपसमिती गठीत करून अहवाल मुख्य समितीच्या बैठकीत ठेवण्याची सूचना दिली. या बैठकीचा उद्देश विद्युत वितरण प्रणाली सुधारण्याचा आणि शेतकऱ्यांना लागणाऱ्या योजनांचा लाभ अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचवणे आहे.

## वीजेचा शॉक लागून ३५ वर्षीय महिलेचा मृत्यू

**मंगळवेढा दि.१८ मे-**
तारेवर कपडे वाळत घालत असताना इलेक्ट्रीक शॉक लागून उमा लक्ष्मण गोडसे (वय ३५,रा. सिध्देवाडी) या विवाहितेचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून या घटनेची



मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे. यातील खबर देणारे समाधान गोडसे (रा.सिध्देवाडी) हे सातारा जिल्ह्यात शिक्षक असून त्यांचा भाऊ लक्ष्मण सोपान गोडसे यांची पत्नी उमा गोडसे दि.१६ मे रोजी सकाळी ८.५५ वाजता घरा शेजारी झाडाला बांधलेल्या तारेवर कपडे वाळत घालत असताना इलेक्ट्रीक शॉक लागून मृत्यू झाला.

मयत हिस मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात उपचाराकरिता घेवून आले मात्र येथील डॉक्टरांनी उपचारापुर्वीच ती मयत झाल्याचे सांगितले असल्याचे दिलेल्या खबर मध्ये म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## न्यायाधीशांच्या पाथरी येथील घरी चोरी, २० तोळे सोने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१८ मे-**
बार्शी तालुक्यातील पाथरी गावात धाडसी चोरीची घटना घडली असून चक्क न्यायाधीश महोदयांच्या घरीच चोरट्याने डल्ला घातला आहे. मध्यरात्री १.३० वाजताच्या सुमारास चोरट्यांनी घराच्या किचनच्या दरवाजाचं कुलूप तोडून घरातील ज्वारीच्या कोट्यातून २० तोळे सोने आणि ५ हजार रुपयांची रोकड लंपास केली आहे. याप्रकरणी अज्ञातविरुद्ध बार्शी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. न्यायाधीश हे देवदर्शनासाठी कोल्हापूरला गेले असता ही घटना घडली.

पाथरी येथील दिनेश गायकवाड हे सध्या वाशिम तालुक्यातील रिसोड येथे न्यायदंडाधिकारी असून सुट्टीनिमित्ताने ते गावी आले होते. त्यातच, धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने ते कोल्हापूरला दर्शनासाठी गेले.

याबाबत, त्यांच्या आई पद्मिनी मुकुंद गायकवाड यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यानुसार, अज्ञात चोरट्याने घरातील सोन्याचे दागिने अंदाजे किंमत १२ लाख २३ हजार रुपये आणि ५ हजार रोकड लंपास केल्याचे नमूद केले आहे. दाखल फिर्यादीनुसार, आमचे घरी धार्मिक कार्यक्रम असल्याने मुलगा, सुन व नातवंडे घरी पाथरी येथे आले होते. तसेच मुलगी रेश्मा तिच्या मुलांसह कार्यक्रमासाठी आली असून ती सध्या आमचेकडेच राहण्यास आहे. पार्मिक कार्यक्रम झाल्यानंतर दि. १५ मे रोजी रोजी मुलगा, सुन व नातवंडे असे देवदर्शनासाठी कोल्हापूर येथे गेले आहेत. काल दि. १६ मे रोजी रात्री १० वा. मी व मुलगी रेश्मा, नातवंडे असे जेवण वगैरे करुन घराचे हॉलमध्ये झोपलो होतो. हॉल व किचन-बेडरुममध्ये रिकामा असल्याने किचनला बाहेरुन कुलूप लावून नेहमी झोपतो. काल रोजी देखील आम्ही जेवण झाल्यानंतर किचनला बाहेरुन कुलूप लावून झोपलो होतो. आजरोजी सकाळी ६ वा. चे सुमारास मी झोपेतून उठून हॉलचा दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला असता बाहेरुन कडी लावल्याचे दिसून आले. त्यामुळे मी खिडकीतून बाहेर पाहिले असता किचन रुमचे कुलूप लावलेले नव्हते व दरवाजा उपडा दिसला. त्यामुळे मी माझी जाऊ-कमल केशव गायकवाड यांना फोन करुन हॉलची बाहेरुन लावलेली कड़ी काढण्यास सांगितली. त्यांनी येवून कडी उपडली असता आम्ही बाहेर येवून पाहिले असता किचन रुमचे कुलूप लावलेले दिसून आले नाही. दरवाजा उघडा असल्याने आम्ही किचन व बेडरुममध्ये जाऊन पाहिले असता बेडरुममधील फर्निचर कपाटातील कपडे व इतर साहित्य बाहेर काढून विस्कटून टाकलेले दिसून आले. तसेच कोट्याचे टोपणे कातून धान्य विस्कटलेले होते. पर्स उचकटलेली होती. त्यामध्ये मी ठेवलेले पाच हजार रुपये व गळ्यातील गण्याची पोत दिसून आली नाही. यावरुन घरात चोरी झाली असल्याचे खात्री झाल्याने मी मुलगा व सुन यांना फोन करुन सदरचा प्रकार सांगितला असता सुन हिने सांगितले की, 'मी रिसोड येथून येताना माझे व मुलांचे दागिने व दिनेश यांच्या अंगठ्या घेवून गावी आले होते. मी देवदर्शनाला येताना सदरचे दागिने एका डब्यात भरुन तो डब्बा ज्वारीच्या कोटीमध्ये ठेवला होता. ती आहे का बघा', असे सांगितले. त्यानंतर आम्ही दोन्ही कोट्याची तपासणी केली असता दागिन्याचा डब्बा दिसून आला नाही. सदरचे दागिने चोरीस गेले असल्याची खात्री झाल्याने मी सुनेला माहिती दिली, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

# कवितेच्या प्रांगणातील शब्द म्हणजे सर्वस्पर्शी अनुभव

### ज्येष्ठ साहित्यिक सुरेखा शहा

### संगीता एखंडे यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**
'कवितेच्या प्रांगणात' या काव्यसंग्रहामधील कविता वाचताना रसिक स्वतःला हरवतो. कारण कवितेतील प्रत्येक शब्द हा सर्वस्पर्शी आहे. जणू आपल्या सर्वांच्या जीवनातील अनुभव कवयित्रीने मांडला आहे, अशा शब्दात ज्येष्ठ साहित्यिक सुरेखा शहा यांनी काव्यसंग्रहावर भाष्य केले.




हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात कवयित्री संगीता एखंडे लिखित 'कवितेच्या प्रांगणात' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक सुरेखा शहा या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर होत्या.

यावेळी सोलापूर आकाशवाणीचे निवेदक अभिराम सराफ, कवयित्री संगीता एखंडे, ज्येष्ठ अभिनेत्री वनमाला किणीकर, महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, ज्येष्ठ कवी मारुती कटकधोंड यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ज्येष्ठ कवी मारुती कटकधोंड, डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन अभिराम सराफ यांनी केले. तर प्रतीक एखंडे यांनी आभार मानले. यावेळी डॉ सुहास पुजारी सरिता कोठाडिया, डॉ. शिवाजीराव देशमुख, गिरीश दुनाखे, राजेंद्र भोसले, ज्येष्ठ विधिज्ञ धनंजय माने, वंदना कुलकर्णी, प्रशांत एखंडे, भाग्यश्री एखंडे उपस्थित होते.

### म्हणून आज चांगली कविता जिवंत - पद्माकर कुलकर्णी

आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अस्सल कविता लिहिणारे काही चांगले कवी आपल्यात आहेत. एखाद्या चांगल्या मालाला उठावच नसावा आणि तो दुर्लक्षित राहावा तसे हे कवी आज संवेदनशील वाचकांच्या अभावी दुर्लक्षित राहिले आहेत का ? असा प्रश्न या निमित्ताने पडतो आहे. नशिबाने काही थोडे संवेदनशील वाचक इथे तिथे विखुरले आहेत म्हणून चांगली कविता आज जिवंत असल्याचे पद्माकर कुलकर्णी यांनी सांगितले.

## ॥ उसंतवाणी ॥

१५१४

सरन्यायाधीश। भूषण गवई।
आठवली आई। आधी त्यांना॥१॥

शिष्टाचार सारा। राहिला बाजूला।
स्पर्श चरणाला। केला त्यांनी॥२॥



थक्क दरबार। थक्क सारे ज्येष्ठ।
मातृप्रेम श्रेष्ठ। जगतात॥३॥

सर्वोच्च आहे हे। जगी न्यायालय।
जाणा 'मायालय'। आईचे ते॥४॥

त्याच पदराची। जगाला सावली।
प्रेमळ माऊली। सगळ्यांची॥५॥

मोदींनीही केले। मातेस वंदन।
सद्भाव चंदन। दरवळे॥६॥

कांत म्हणे जाणा। कृतीचे महत्व।
मातृप्रेम सत्व। निखळ ते॥७॥

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
१८ मे २०२५







# अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले महाप्रवेशद्वाराचे उत्साहात लोकार्पण

## अन्नछत्र मंडळाचे कार्य अक्कलकोटचे वैभव वाढविणारे; माजी गृहराज्यमंत्री म्हेत्रे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ मे-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाकडून जुन्या राजवाड्यासमोर भव्य स्वागत कमान झाली ही ऐत्यासिक घटना आहे. या स्वागत कमानीमुळे अक्कलकोट तीर्थक्षेत्राचा ऐतिहासिक वारसा याची आठवण होते . श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात लाखो भाविक महाप्रसाद घेतात हे स्वामीच्या दिव्य शक्तीमुळेच शक्य आहे. अक्कलकोटचे नांव अन्नछत्र मंडळामुळे देशभरात नव्हे तर सर्व जगात पोहचले ही गौरवाची बाब आहे अक्कलकोटच्या सौंदर्यात व वैभवात भर घालण्याचे मोठे कार्य संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले व मंडळाकडून केले जात आहे ही अंत्यत गौरवाची बाब असल्याचे प्रतिपादन माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी केले.




अक्कलकोट येथे अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले महाप्रवेशद्वाराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी माजी मंत्री म्हेत्रे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते. राजे फत्तेसिंह चौक नवरात्र व गणेशोत्सव मंडळ, हिरकरणी महिला बहु उद्देशिय संस्था, अमोलराजे भोसले मित्र मंडळ, अन्नछत्र मंडळ यांच्या वतीने अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले व मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली व मार्गदर्शनाखाली अक्कलकोट नरेश विजयसिंहराजे भोसले भव्य महा प्रवेशद्वार स्वागत कमानीचा लोकार्पण कार्यक्रम करण्यात आला. म. नि. प्र. बसवलिंग महास्वामीजी, वे शा सं अण्णु महाराज, धनंजय महाराज, व्यंकु महाराज, हिरकणी बहु सामाजिक संस्था संस्थापिका अलकाताई भोसले, सचिवा अर्पिताराजे भोसले, शहाजी पवार, चेतन नरोटे, मल्लीकार्जुन पाटील, अशपाक बळोरगी, मिलन कल्याणशेट्टी, महेश हिंडोळे, अविनाश मडिखांबे, उत्तम गायकवाड, सचिव शाम मोरे, उपाध्यक्ष अभय खोबरे, बसलिंग खेडगी, लाला राठोड, ॲड. हबीब, ओंकारेश्वर उटगे, ॲड.बाग, वटवृक्ष देवस्थान चेअरमन महेश इंगळे यांचे चिरंजीव प्रथमेश इंगळे, यरावंत धोंगडे, सुनिल बंडगर, दिलीप सिध्दे, ए. एम. घाटगे, सुरेश सुर्यवंशी, पोलिस निरिक्षक महेश स्वामी, बाळा शिंदे, मुख्याधिकारी डाके, शिवशरण जोजन आदि मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. दिलीप सिध्दे, महेश हिंडोळे, अशपाक बळोरगी, बाबा निंबाळकर आदिंनी अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोजले यांनी अक्कलकोटच्या सोंदर्यात व वैभवात भर पडेल असे केलेल्या कार्याबद्दल गौरवोदगार काढले. मराठा मंदिर पदाधिकारी योगेश पवार, विलासराव देशमुख यांच्या वतीने मुख्याध्यापक शरद जंगाले यांनी जन्मेजयराजे भोसले, अलकाताई भोसले यांचा पुष्पगुच्छ, शाल देऊन यथोचित गौरव केला. याप्रसंगी सोपान गोन्डाळ, सुधाकर गोन्डाळ, अभिनंदन गांधी, रामेश्वर पाटील, रवि कदम, राजाभाऊ नवले, अप्पु पुजारी, बाळासाहेब कुलकर्णी देसाई बबलादकर, मैनु कोरबु, सरफराज शेख, श्रीकांत झिपरे, शिवशरण जोजन, राजा फत्तेसिंह नवरात्रोत्सव मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत सोनटक्के, प्रा. नितीन ग्राम, गणेश ग्राम, नरसिंग छिटसागर, शुक्राचार्य चव्हाण, वैजयंती निंबाळकर, लता कुलकर्णी बडवे, स्वामीराव वाकडे, गोटू माने, रोहन शिर्के, शंकर पवार, एस के स्वामी, प्रविण घाडगे, बाळासाहेब घाटगे, हुल्ले, मनोहर चव्हाण, महांतेश स्वामी, शिवराज स्वामी, किरण पाटील, विश्वस्त भाऊ कापसे, सौरभ मोरे, मनोज निकम, सनी सोनटक्के, निखील पाटील, अतिश पवार, योगेश कटारे, सतीश महिंद्रकर, शहाजी यादव, संजय गोंडाळ, बाळासाहेब पोळ, नामा भोसले, पिंटू हळ्ळुरे, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, सिद्धाराम कल्याणी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, कल्याण देशमुख, गोविंदराव शिंदे, विशाल घाडगे, रोहित कदम, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## महत्वाचे...



### सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात सोलापुरातील वकिलांचा सहभाग

**सोलापूर, दि. १८ मे-**

सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून गोव्यात १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत फार्मागुडी, फोंडा येथील गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे ऐतिहासिक आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात सोलापूर येथील अनेक वकिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात अनेक संत आणि मान्यवरांच्या मार्गदर्शनातून मिळालेली ऊर्जा घेऊन सोलापूर येथे संघटितपणे सनातन राष्ट्र निर्मितीच्या कार्यात आम्ही सहभागी होणार', असे अधिवक्ता मुकुंद कुलकर्णी, अधिवक्ता चंद्रशेखर बारद, अधिवक्ता रमेश पाटील, अधिवक्ता शिवाजी होटकर, अधिवक्ता सतीश गाजूल, अधिवक्ता राम देशेट्टी, तसेच अधिवक्ता अर्चना बोगम, अधिवक्ता राजलक्ष्मी म्हंता यांनी सांगितले. या महोत्सवासाठी सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले आणि सौ. कुंदा जयंत आठवले यांच्या वंदनीय उपस्थितीसह २३ देशांतील २० हजारांहून अधिक भाविक उपस्थित आहेत. महोत्सवाच्या निमित्ताने उभारण्यात आलेल्या 'सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले नगरी'च्या मुख्य प्रवेशद्वाराचे नामकरण 'भगवान परशुराम सुवर्णद्वार', नगरीतील सात मार्गांना 'सप्तर्षी'ची, तर तीन मुख्य मोठ्या सभामंडपांना 'श्रीनिवास मंडपम', 'श्रीदेवी मंडपम' आणि 'भूदेवी मंडपम' अशी नावे देण्यात आली आहेत. महोत्सवस्थळी भोजनासाठी एकूण १५ मंडप उभारण्यात आले असून त्यांची नावेही देवतांच्या नावाने देण्यात आली आहेत. भगवान श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासह गोवर्धन पर्वत उचलतांनाचे श्रीकृष्णाचे, तसेच अफजलखान वधाचे कटआऊट उभारण्यात आले आहेत. या वेळी 'आर्ट ऑफ लिव्हिंग' संस्थेच्या वतीने १ हजार वर्षांपूर्वीच्या सोरटी सोमनाथ जोतिर्लिंगाचे दर्शन सर्वांना करण्यात आले.

### ज्या घरामधील स्त्री सुखी ते कुटुंब सुखी असते : प्रणाली धस; कोरफळेतील अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**पानगाव, दि. १८ मे-**

स्त्रीला देवता मानणारी आपल्या देशाची संस्कृती असून, पूर्वीची स्त्री आणि आताची स्त्री यात फार मोठा बदल झाला असून, पूर्वीची स्त्री चार भिंतींच्या आत राहून काम करायची तर आजची स्त्री ही चार भिंतींच्या बाहेर राहून देशाचे संरक्षण करतेय.

एवढी मोठी जबाबदारी या स्त्रीवर पडली असून, ती जबाबदारी योग्य रित्या पेलण्याचे चांगले काम करतेय. अशा प्रकारे सर्व स्त्रीच्या जीवनात चंद्र-सूर्यासारखा प्रकाश दरवळला पाहिजे. समाजात वावरत असताना चूल आणि मूल याच्या पलीकडे जाऊन या समाजात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला पाहिजे, असे प्रतिपादन प्रणाली धस यांनी जागर नारी शक्तीचा या विषयावर व्याख्यानमालेत बार्शी तालुक्यातील कोरफळे येथील शुक्रवार पासून सूरू झालेल्या अखंड हरिनाम सप्ताहात पहिलें पुष्प गुंफले यावेळी केले. या वेळी धस म्हणाल्या, स्त्री शिकली सवरली म्हणून खऱ्या अर्थाने आज समाज सुधारला, म्हणून देश सुधारला. एवढी मोठी जबाबदारी आज स्त्रियांवर आहे. स्त्रियांना समाजात माणूस म्हणून समतेची वागणूक दिली पाहिजे जात, धर्म, पंथ, वंश या सगळ्यांच्या पलीकडे जाऊन सर्व स्त्रियांना माणूस म्हणून माणूसकीची आणि माणूस म्हणून समतेची वागणूक दिली पाहिजे. शिवरायांना घडवणारी, स्वामी विवेकानंद यांना घडवणारी आईची भूमिका समजून घेणे आज गरजेचे आहे. शंभर शिक्षकांपेक्षा एक चांगली आई होणे गरजेचे असते. आपण अशा आईचे संगोपन करणे गरजेचे असून, अशा आईची आजच्या काळात गरज आहे. ज्या घरातील स्त्री सुखी तर संपूर्ण कुटुंब सुखी असते,झाशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर, माँसाहेब जिजाऊ,मदर तेरेसा, सिंधूताई सपकाळ या कर्तबगार महिलांनी केलेल्या कार्याचे दाखले देत आज अशा कर्तबगार महिलांची गरज असल्याचे धस यांनी सांगितले.

# विठ्ठलाच्या हृदयात स्थान निर्माण करणारे चोखामेळा अग्रगण्य संत

### संत नामदेव महाराजांचे वंशज माधव महाराजांचे झाले काल्याचे कीर्तन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १८ मे-**

चित्ती नाही आस त्याचा पांडुरंग दास असे भक्तांचिये घरी काम न सांगता करी अनाथाचा बंधू अंगी असे हा संबंधु तुका म्हणे भावे देवा सत्ता राबवावे, या अभंगाचा सार घेत आपल्या अविट भक्तीच्या बळावर परमात्मा विठ्ठलाच्या हृदयात स्थान निर्माण करणारे संत परंपरेतील संत चोखामेळा हे अग्रगण्य संत आहेत, असे मत संत नामदेव महाराजांचे सोळावे वंशज माधव महाराज नामदास यांनी व्यक्त केले. ते मंगळवेढ्यात काल्याच्या कीर्तनात शनिवारी निरूपण करत होते.

संत चोखामेळा यांच्या स्मृतिदिनानिमित्त आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते समाधीवर महाअभिषेक करून पूजन करण्यात आले. या वेळी माजी मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, राहुल शहा, शशिकांत चव्हाण, अजित जगताप, चंद्रशेखर कोंडूभैरी, दिगंबर यादव, नागेश डोंगरे यांच्यासह अनेक भक्तगण उपस्थित होते. या वेळी आमदार समाधान आवताडे यांनी संत भूमीत अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेले संत चोखामेळा यांचे स्मारक लवकरच या वेळी सांगितले. या वेळी समाधी स्थळावरती पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी संत चोखोबा शिक्षण प्रसारक मंडळ हुन्नूरचे प्रशांत साळे यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या वेळी मंदिर समितीचे जयराज शेंबडे, पठाण शिवशरण, अरुण शिवशरण, मस्तान मुल्ला यांच्यासह वारी परिवाराचे सर्व सदस्य उपस्थित होते. या वेळी तालुक्यासह परिसरातील भाविक, भक्त उपस्थित होते. म्हणून मंगळवेढे भूमी संतांची माधव महाराज नामदास म्हणाले, संत चोखोबाचा समाधी सोहळा साजरा करणे म्हणजे संत चोखोबासारखी भक्ती आपल्या करता आली पाहिजे, हे शिकणे आहे. देवाच्या दारात न्याय मिळाला नसला तरी आपल्या कर्मरूपी भक्तीच्या बळावर चोखोबा अजरामर झाले, असे सांगून संतांच्या चरणस्पर्शानेही भूमी पावन झाली आहे. म्हणूनच मंगळवेढे भूमी संतांची ओळखली जाते.



### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १८ मे-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे यांच्या हस्ते पुष्पाहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, भालचंद्र साखरे आदी उपस्थित होते.




# डॉ. देशमुख यांचा वाढदिवस उत्साहात

### ११४ जणांचे उत्स्फूर्त रक्तदान

### शुभेच्छा देण्यासाठी मोठी गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

भारतीय जनता पक्षाचे माजी नगरसेवक, भारतीय जनता युवा मोर्चाचे शहराध्यक्ष डॉक्टर किरण देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त शहर जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉक्टर किरण देशमुख युथ फाउंडेशन च्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजनही करण्यात आले होते. या शिबिरात ११४ जणांनी उस्फुर्तपणे सहभाग नोंदवला. बसवेश्वर रक्तपेढीचे सहाय्य या रक्तदान शिबिराला लाभले.

माजी नगरसेवक डॉक्टर किरण देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त रविवारी १८ मे रोजी नवी पेठ येथील संपर्क कार्यालयात सामाजिक, राजकीय, धार्मिक, उद्योग क्षेत्रातील आणि सर्वपक्षीय नेते हजारो कार्यकर्त्यांच्या समवेत उपस्थिती लावली. यावेळी भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, माजी सभागृह नेते संजय कोळी, शिवानंद पाटील, नागेश भोगडे, नारायण बनसोडे, अविनाश पाटील, बाबुराव जमादार, राजकुमार पाटील,ज्ञानेश्वर कारभारी, संजय खडके, राजकुमार काकडे, बाजार समिती संचालक वैभव बरबडे,उद्योजक लक्ष्मीकांत चाटला, गौरीशंकर वाले, दयानंद विजापुरे शिवशंकर चोळे, जीएम ग्रुपचे बाळासाहेब वाघमारे, डिके ग्रुपचे संस्थापक दशरथ कसबे, पिंटू डावरे, मंडल अध्यक्ष देविदास बनसोडे, दत्तात्रय, प्रवीण वाले, पंकज काटकर, रवी कोटमळे, शिवानंद पुजारी, आनंद बिरू, श्रीनिवास पुरुड, बाळासाहेब आळसुंदे, शेखर फंड,शंकर शिंदे, सिद्धार्थ सालक्की ,प्रवीण कांबळे, राहुल घोडके, राजाभाऊ आलुरे, रुचिरा मासम, वीरेश उंबरजे, गणेश भोसले, महालिंगप्पा परमशेट्टी, श्रीशैल अंबारे, प्रकाश हत्ती, पिनू करपे, सुधाकर नराळ,प्रवीण दर्गोपाटील, प्रशांत फत्तेपूरकर, सुभाष पवार,सुजित चौगुले, हरिप्रसाद बंडेवार, मनोज मलकूनाईक, सुमित बिराजदार यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत

### पाणीपुरवठ्याचे सुधारित वेळापत्रक जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, १८ मे-**

वीज उपकेंद्रातील केबल जॉईंट तुटल्याने त्याचा महापालिकेच्या पाणी उपशावर परिणाम झाला. परिणामी शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने नागरिकांच्या सोयीसाठी पाणीपुरवठ्याचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे.



महावितरणच्या ३३ केव्ही मंद्रुप सबस्टेशनमध्ये केबल जॉइंट तुटले. त्यामुळे टाकळी येथील पंप हाऊस मधून पाण्याचा उपसा होऊ शकला नाही. त्यामुळे सोरेगाव येथे पाणी आले नाही. त्यामुळे शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. नागरिकांच्या सोयीकरता महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून सुधारित पाणीपुरवठ्याचे वारपत्रक जाहीर करण्यात आले आहे.



याअंतर्गत सोमवार दि. १९ मे रोजी हायलेव्हल टाकीवरून कन्ना चौक, राजेंद्र चौक, गणेश पेठ, साखर पेठ या भागात तर झोन टाकीवरुन सोमवार पेठ, शनिवार पेठ, धमका ढोली बाजा सतनाम चौक, सरस्वती चौक, गुलजार तालीम या परिसराला, नवीन भद्रावती टाकीवरुन रविवार पेठ, जोशी गल्ली, २५६ गाळे, १७५ एचपी वरून गाढव मैदान, शास्त्रीनगर, एमबीआरवरुन मार्कंडेयनगर, स्वागत नगर, वेणूगोपाल नगर, उजनी लाईनवरून दोन नंबर झोपडपट्टी, भूषण नगर, इंदिरा नगर, सलगर वस्ती, नेहरुनगर येथून एस.टी. कॉलनी, हद्दवाढ एमबीआरवरून मल्लिकार्जुन नगर, भिमनगर, संगमेश्वर नगर, अजंठा बोळ या विविध परिसरांना पाणीपुरवठा होणार आहे. मंगळवार दि.२० मे रोजी हायलेवलवरून गुरुवार पेठ, शुक्रवार पेठ, शनिवार पेठ, धाकटा राजवाडा, कोंतम चौक, झोन टाकीवरून कोंगाड कुंभार गल्ली, शास्त्री नगर, गुरुवस्ती या भागाला, १५० एचपीवरुन खालीर हाऊस, ७५ एचपीवरून मोदी, पाच कंदिल जगजीवनराम झोपडपट्टी, एमबीआरवरुन जुळे सोलापूर, भवानी पेठ येथून कस्तुरबा, हद्दवाढ एमबीआरवरून समाधान नगर, जवाहर नगर, किसान नगर, किसान संकुल, केकडेनगर या परिसराला पाणीपुरवठा होणार आहे. नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांनी केले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## द्वारकाधीश मंदिरात आजपासून भागवत कथा ज्ञानयज्ञ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

येथील दिलीप जवळगेकर परिवाराच्यावतीने सोलापूरच्या विजापूर रोडवरील द्वारकाधीश मंदिरात निरुपणकार विवेक घळसासी यांचा श्रीमद भागवत कथा ज्ञान यज्ञ सप्ताह आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती द्वारकाधीश मंदिराचे व्यवस्थापक दत्तात्रय पाठक यांनी दिली आहे.

हा ज्ञानयज्ञ सप्ताह सोमवार दिनांक १९ मे रोजी सुरू होत असून तो रविवार दिनांक २५ मे अखेर असा सलग सात दिवस चालणार आहे. द्वारकाधीश मंदिरात दररोज सायंकाळी साडेसहा ते साडेनऊ या वेळेत हा ज्ञान यज्ञ सोहळा होत आहे. या सात दिवसात विवेक घळसासी हे भागवत कथेचे निरुपण करणार आहेत.

हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून भाविक भक्तांनी, नागरिकांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन जवळगेकर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## ▶▶ महत्वाचे...

### हॅण्डल लॉक केलेली दुचाकी पळवली

**सोलापूर, दि. १८ मे-**

दत्त चौक येथे फिर्यादी उमेश नामदेव भोसले (वय-४१,मु.पोस्ट कवठे) यांची दुचाकी क्रमांक एम.एच.१३.डीजे.०१०५ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ३० मार्च रोजी सकाळी साडेनऊ ते साडे अकराच्या सुमारास घडली. याप्रकरणी उमेश भोसले यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार गौडनवरू हे करीत आहेत.

### विवाहितेस मारहाण; पतीसह पाच जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १८ मे-**

विवाहिता ही सासरी नांदत असताना सासरकडच्या मंडळींनी संगणमत करून वारंवार



लाथा बुक्क्यांनी मारहाण करत माहेरून व्यवसायासाठी पाच लाख रुपये घेऊन ये तेव्हा तुला नांदिवतो असे म्हणत शारीरिक व मानसिक त्रास दिल्याची फिर्याद इनायत तय्यब शेख (वय-२३,रा.शिवगंगा नगर,नई जिंदगी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती तय्यब,सासू बिस्मिल्ला,सासरे महबूब,नणंद आयेशा व दिर खाजू (रा.आंबेडकर नगर, नेहरूनगर पिंपरी चिंचवड,पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार पवार हे करीत आहेत.

### सात रस्ता येथे अपघात; अज्ञात वाहन चालकावर गुन्हा

**सोलापूर, दि. १८ मे-**

स्वतःच्या ताब्यातील वाहन क्रमांक एम.एच.१३.ई.२८९९ वरून फिर्यादी सुनील फुलसिंग पवार (वय-२९,रा.प्रताप नगर,विजापूर रोड) हे सात रस्ता मार्ग स्थानिक गुन्हे शाखा तालुका पोलीस स्टेशन येथे जात असताना फिर्यादी यांच्या पाठीमागील बाजूस एका अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून धडक देऊन गंभीर जखमी करून पळून गेला आहे. याप्रकरणी सुनील पवार यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहनचालकविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १८ एप्रिल रोजी घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

### मागील भांडणावरून लोखंडी पट्टीने मारहाण; चौघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १८ मे-**

मागील झालेल्या भांडणाचा राग मनात धरून फिर्यादी परमेश्वर बसप्पा दिंड्डी (वय-४५,रा.माधव नगर,साईबाबा नगर) यांच्या घरात घुसून गणेश यमूल,उमेश हंडगळी,ममता संघा आणि एक अनोळखी इसम यांनी सर्वांनी हाताने व लाथा बुक्क्यांनी तसेच सळई,बांबू व लोखंडी पट्टीने फिर्यादी व फिर्यादी यांचा मुलगा बसवराज पत्नी पद्मावती यांना मारून जखमी केले. तसेच शिवीगाळ करून दमदाटी केल्याची फिर्यादीत म्हटले आहे.याप्रकरणी परमेश्वर दिंड्डी यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, वरील संशयित आरोपींना विरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १४ मे रोजी रात्री सात वाजण्याच्या सुमारास आठ वाजण्याच्या सुमारास माधवनगर येथे घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार जमादार हे करीत आहेत.

### तू माझ्या मुलाला वेगळे का केले या कारणावरून मारहाण

**सोलापूर, दि. १८ मे-**

तू माझ्या मुलाला माझ्यापासून वेगळे का केले, मला माझी मुले दे असे म्हणून फिर्यादी करुणा विरसिंग राठोड (वय-२३,रा.नेहरूनगर



विजापूर रोड) यांना शिवीगाळ करत लाकडाने मारहाण करून दुखापत केली. तसेच फिर्यादी करुणा यांच्या वडिलांना देखील हाताने मारहाण करत दमदाटी केली असल्याचे फिर्याद करुणा राठोड यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून आकाश राजू चव्हाण (रा.नेहरूनगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना १७ मे रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास नेहरूनगर येथे घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार जाधव हे करीत आहेत.

# पालखी सोहळ्यापूर्वी ग्रामपंचायतींना मिळणार अनुदान

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांची माहिती; थकीत अनुदानही लवकरच देणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ मे-**



संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना आर्थिक दिलासा मिळाला आहे. यंदाच्या आषाढी पालखी सोहळ्यापूर्वीच पालखी मार्गावरील या ग्रामपंचायतींना अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान सोलापूर जिल्ह्यातील ७७ ग्रामपंचायतींची थकीत २५ टक्के अनुदानाची रक्कम देखील लवकरच देणार असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.मंत्री जयकुमार गोरे शनिवारी (ता.१७) पंढरपूर आणि सांगोला दौऱ्यावर आले होते. यावेळी पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. यावेळी बोलताना पालकमंत्री गोरे म्हणाले की, महाराष्ट्राचा सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक वैभव असलेला आषाढी पालखी सोहळा अगदी तोंडावर आला आहे. पालखी सोहळ्याची तयारी सुरु झाली आहे.

संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराज पालखी मुक्कामी असलेल्या ग्रामपंचायतींना वारकर्यांच्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाकडून विशेष अनुदान दिले जाते. यावर्षी पालखी मार्गावरील ग्राम पंचायतींना आर्थिक अडचणी येऊ नयेत म्हणून पालखी सोहळ्यापूर्वी एक रक्कमी अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचीही कार्यवाही सुरु झाली आहे.

### कॉरिडॉरला सहकार्य करणाऱ्यांचे आभार

पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील प्रस्तावित कॉरिडॉर सर्वेक्षणाचे काम नुकतेच पूर्ण झाले. यामध्ये ६६२ पैकी ५१० लोकांनी कॉरिडॉरला सकारात्मकता दर्शवली आहे. कॉरिडॉरला सहकार्य करणाऱ्या स्थानिक व्यापारी व नागरिकांचे मी मनापासून आभार मानतो. स्थानिकांनी कॉरिडॉर बाबत सरकार सोबत राहण्याचा निर्णय घेतल्याचे ही मंत्री गोरे यांनी यावेळी सांगितले.

### आज उन्हात आहेत ते उद्या मंडपात येणार

आमदार रोहित पवारांची मला कीव येते, रावणाला राम म्हणण्याचं काम ते करतायत. नाव राम असलं म्हणून कोणी श्री प्रभु राम होत नाही. राम नाव असून ही त्यांनी आज पर्यंत शकुनी मामाचं काम केले आहे. तरीही मी तपास यंत्रणेमध्ये हस्तक्षेप केला नाही. लवकरच आणखी काही घडामोडी घडणार आहेत. आज उन्हात आहेत ते उद्या मंडपात येणार आहेत असा इशारा ही मंत्री गोरे यांनी दिला.

### सत्तेचे शहाणपण रोहित पवारांनी शिकवू नये

आमदार रोहित पवार रामराजे नाईक निंबाळकरांची वकिली कशासाठी करतायत असा सवाल उपस्थित करत त्यांनी त्यांच बघावं, मला सत्तेचे शहाणपण शिकवू नये अशा शेलक्या शब्दात सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी टोला लगावला. पालकमंत्री जयकुमार गोरे यांची बदनामी केल्या प्रकरणी विधान परिषदेचे माजी सभापती राम राजे नाईकनिंबाळकर यांची पोलिस चौकशी सुरु झाली आहे. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी ट्विट करत जयकुमार गोरे यांच्यावर टिका केली होती. त्यावर मंत्री गोरे यांनी पत्रकारांशी बोलताना आमदार रोहित पवारांवर निशाणा साधला. मंत्री गोरे म्हणाले की, सत्तेच्या विरोधात संघर्ष करून मी उभा राहिलोय. त्यामुळे रोहित पवारांनी सत्ता आहे नाही याची धमकी आम्हाला देवू नये. तुम्ही केलेल्या षढयंत्रांना बळी पडून आम्ही खूप दुःख भोगलय. अशा संकटाच्या मालिकांच्या छाताडावर पाय देऊन इथं पर्यंत पोचलोय. त्यामुळे सत्तेच आणि संघर्षाचं शहाणपण आम्हा शिकवू नका असेही मंत्री गोरे यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांना वेळेत खते-बियाणे उपलब्ध करून द्या

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**



जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना योग्य दराने व वेळेत खते बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने दक्ष राहावे. तसेच खते बियाणे विक्रेत्यांनी शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची लिंकिंग न करता खते बियाणे उपलब्ध करून दिली पाहिजेत. लिंकिंग करणाऱ्या संबंधित विक्रेत्यावर प्रशासनाकडून तात्काळ गुन्हे दाखल करावेत, असे निर्देश ग्रामविकास, पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित टंचाई आढावा बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे बोलत होते. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, खासदार ओम राजे निंबाळकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, आमदार सुभाष देशमुख, देवेंद्र कोठे, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, राजू खरे, अभिजीत पाटील, डॉ. बाबासाहेब देशमुख, नारायण पाटील, उत्तम जानकर(ऑनलाईन), निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीचे राज्य संचालक विनायक दीक्षित, जिल्हा फर्टिलायझेशन असोसिएशनचे अध्यक्ष बालाजी चौगुले उपस्थित होते.

कृषी विभागाने बोगस बियाणे व खते शेतकऱ्यांना पुरवठा होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. त्यासाठी आवश्यक बियाणं व खतांचे परीक्षण करावे. सॅम्पल तपासणीची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवावी. अशा बोगस खाते व बियाण्यामुळे या पुढील काळात शेतकऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची खात्री करावी. खते विक्रेत्यांना शासनाकडून सर्व प्रकारचे सहकार्य मिळेल परंतु त्यांनी शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही या अनुषंगाने निविष्ठांची विक्री करावी असेही निर्देश पालकमंत्री गोरे यांनी दिले.

प्रारंभी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी खरीप हंगाम २०२५ अंतर्गत केलेल्या तयारीची माहिती बैठकीत दिली. खरीप हंगाम २०२५ साठी २ लाख ३२ हजार ३५६ मेट्रिक टन रासायनिक खतांचे अवांटन मंजूर झालेले असून मार्च २०२५ अखेर एक लाख २२ हजार ५३१ मेट्रिक टन अवांटन शिल्लक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच खरीप हंगामाच्या ५ लाख ६ हजार ९२७ हेक्टर क्षेत्रासाठी १ लाख ९४ हजार ३७० मेट्रिक टन बियाण्याची आवश्यकता असून, सार्वजनिक यंत्रणाकडे ११ हजार ५११ मेट्रिक टन, खाजगी स्तरावर ६८ हजार ३१९ मॅट्रिक टन तर शेतकऱ्यांकडे एक लाख १४ हजार ५४० मेट्रिक टन बियाणे उपलब्ध असल्याची माहितीही भोसले यांनी दिली.

### नुकसान भरपाई १५ दिवसांत द्यावी

खरीप हंगाम २०२४ अंतर्गत नुकसान भरपाई विम्याची ८१ कोटीची रक्कम ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीने पुढील पंधरा दिवसात उपलब्ध करून द्यावी. कंपनीचे शासनाकडून १४२ कोटीची रक्कम शासन स्तरावरून अदा होईलच परंतु विमा कंपनीने सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची विमा नुकसान भरपाई रक्कम अदा केली पाहिजे, असे निर्देश पालकमंत्री गोरे यांनी दिले. तसेच इन्शुरन्स कंपनीकडे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई नाकारली गेली आहे त्याचे प्रस्ताव जिल्हा प्रशासनाला पुढील आठ दिवसात उपलब्ध करून द्यावेत असेही त्यांनी निर्देशित केले.

### प्रगतशील शेतकऱ्यांचा पालकमंत्र्यांकडून सत्कार

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते कृषी विभागाअंतर्गत जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी विविध पिकांतर्गत हेक्टरी चांगले उत्पादन घेतल्याबद्दल शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पालकमंत्री महोदय व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कृषी विभागाने तयार केलेल्या क्यू आर कोडचे अनावरण यावेळी करण्यात आले. यामध्ये कृषी विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देण्यात आलेली असून या क्यूआर कोड च्या माध्यमातून जी आवश्यक योजना आहे त्या योजनेचा किंवा कोड स्कॅन केल्यानंतर त्या योजनेविषयी सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे या क्यूआर कोड चा शेतकऱ्यांना त्यांच्याशी संबंधित योग्य योजनेचा लाभ मिळणार आहे.

### मॅटर मिटवून घेऊ असे बोलताना मारहाण

**सोलापूर, दि. १८ मे-**

गल्लीत झालेले मॅटर मिटवून घेऊ असे बोलून फिर्यादी यांना लाकडाने व दगडाने मारहाण करून फिर्यादी यांचा लहान भाऊ विनोद,गणेश डोलारे,विशाल डोलारे यांना सुद्धा मारहाण केल्याची घटना १६ मे रोजी सायंकाळी साडेपाच ते सहा वाजण्याच्या दरम्यान मजरेवाडी रेल्वे ट्रॅक जवळ घडली.याप्रकरणी विकास विजय डोलारे (रा.रेणुका नगर, जुळे सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून कृष्णा ताकमोगे,अभि ताकमोगे,आनंद ताकमोगे, युवराज तापमागे, विश्वास ताकमोगे (सर्व राहणार सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोसई. पोपळभट हे करीत आहेत.

### किरकोळ कारणावरून लाकडी दांडक्याने मारहाण; सहा जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १८ मे-**




किरकोळ कारणावरून लाकडी दांडक्याने मारहाण केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १६ मे रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास देशमुख वस्ती येथे घडली.

याप्रकरणी प्रवीण गुणवंत मेटकरी (वय-३२,मुक्काम पोस्ट डोंगरगाव) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सासरा शत्रुघन देवकते,सासू साधना देवकते, मेव्हणा चैतन्य, पत्नी प्रियंका,साडू कपिल कोकरे व मेव्हणा निकिता कोकरे (सर्व. रा.सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हे वरील ठिकाणी गेले असता तेथे फिर्यादी कडून वरील संशयित आरोपी यांनी हात उसने पैसे बुडवण्याच्या उद्देशाने फिर्यादीस वरील संशयित आरोपी या सर्वांनी मिळून शिवीगाळ करत दमदाटी करून हाताने व लाकडी दांडक्याने मारहाण केली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार वाल्मिकी हे करीत आहेत.

## वीज पडल्याने तलावातील पाण्यात बुडबुडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

शनिवारी रात्री झालेल्या जोरदार पावसावेळी विजांचा कडकडाट सुरू असताना गावतलावात वीज पडल्याने पाण्याच्या झरा सुरू होऊन बुडबुडे येत असल्याच्या जोरदार चर्चा सुरू आहेत. त्यामुळे सकाळपासून गावतलाव पाहण्यासाठी नागरीकांनी गर्दी केल्याचे दिसून आले. याबद्दल नागरीकांमध्ये जोरदार चर्चा सुरू आहे.

शनिवारी रात्री मंद्रुपमध्ये अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. यावेळी मोठ्या प्रमाणात विजांचा कडकडाट सूरू होता.



त्यामुळे नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण दिसुन येत होते. याचवेळी रात्रीच्या दरम्यान गावतलावात विज पडल्याची चर्चा सुरू आहे. विज पडल्यानेच गावतलावात पाण्याच्या झरा सुरू होऊन पाणी येत असल्याबद्दल नागरीक सांत आहेत. त्यामुळेच साठवण पाण्यामध्ये चार ते पाच ठिकाणी पाण्याची बुडबुडे दिसून येत आहेत. त्यामुळे गावतलावात पाणी येण्यास मदत झाली आहे.


गावतलावात येणाऱ्या पावसाच्या पाण्याला मार्ग नसल्याने गावतलाव कोरडा पडला आहे. त्यामुळे गावतलावाची दुर्दशा होऊन अतिक्रमण वाढत चालले आहे. अतिक्रमणामुळे पावसाचे पाणी येत नसताना शनिवारच्या पावसामुळे गावतलावात मोठ्या प्रमाणात पाणी असल्यामुळे विजा पडून पाण्यात बुडबुडे व उकळी येत असल्याबद्दल नागरीकांमधून सांगण्यात आले.

# उजनीचे पाणी अन् जल पर्यटनावर बुधवारी बैठक

## आमदारांना उपस्थित राहण्याचे पालकमंत्र्यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

सोलापूर जिल्ह्याच्या उजनी धरणातील पाणी नियोजनात कालवा सल्लागार समितीकडून ढिसाळ नियोजन झाल्याने यंदा पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय झाल्याचे दिसून येत आहे. याबाबत नुकत्याच पार पडलेल्या डीपीसी बैठकीत खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी याबाबत कार्यवाही करण्याची मागणी केली होती. ही बाब स्थानिक आमदारांनीही पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उजनीचे पाणी नियोजन आणि उजनी जलपर्यटनाचा विषय घेवून २१ मे



रोजी कालवा समितीची एक बैठक लावली असून या बैठकीला जिल्ह्यातील आमदारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

यावर्षी पाणी नियोजनात गफलत झाल्याने काही भागातील उंचावरील शेतकऱ्यांना उजनीची आवर्तने नीट मिळाली नाहीत. कर्नाटकातील शेतकऱ्यांनाच याचा जास्त फायदा झाला आहे. यामुळे मोहोळ तालुक्याचे आमदार राजू खरे, आ. सुभाष देशमुख यांनी उजनीच्या पाण्यावर डिपीसी बैठकीत जाहीरपणे चर्चा केली होती. इतकेच नाहीतर आ. देशमुख यांनी गेल्याच आठवड्यात शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी सीना कोळेगाव धरणातून सीना नदीत सोडले जात नसल्याने सिंचन भवनसमोर शेतकरी बांधवांना घेवून बेमुदत उपोषण सुरू केले होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पाणी सोडण्याचे आश्वासन दिल्यावर हे आंदोलन मागे घेतले होते. असाच पाणीप्रश्न इतरही काही तालुक्यातील असल्याने डिपीसी बैठकीत या प्रश्नाचा ऊहापोह झाला होता.

राज्यातील सर्वात जास्त साखर कारखाने अशी ओळख जिल्ह्याला मिळवून देण्यात उजनी धरणाचे मोठे योगदान आहे. आता याच उजनी धरणाला जल पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जवळपास २८२ कोटींचा जलपर्यटन आराखडा तयार केला होता. यास राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवारांनी ही हिरवा कंदील दाखविला होता.

स्पोर्ट्स बोट खरेदीसाठी ३३ कोटींची निविदा एमटीडीसीकडून प्रसिद्ध झाली होती, जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याअंतर्गत उजनी जलपर्यटन प्रस्तावाला राज्य शासनाकडून यापूर्वीच मान्यता मिळाली असून, १९० कोटी पैकी स्पोर्ट्स बोटी खरेदीसाठी ३३ कोटींचे टेंडर झाली होती. यामध्ये पहिल्या टप्प्यात क्रूज बोट, पॅरासेलिंग बोट, फ्लाइंग बोट, जेट स्की, हाऊस बोटी यांसह इतर स्पोर्ट्स बोटी खरेदी करण्यात येणार होत्या. त्यानंतर पर्यटन विभागाकडून जल पर्यटन सेवा सुरू होणार होती. मात्र ज्यावेळी उजनी धरणामध्ये बोटिंगची सुविधा निर्माण करण्यासाठी टेंडर प्रक्रिया झाली तेव्हा जलसंपदा विभागाला जाग आणि त्यांची या उजनी पर्यटनाला खोडा घातल्याचे सांगण्यात येते. इतकेच नाहीतर या आराखड्यात उजनी धरण येथे पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी पुढच्या टप्प्यात ६० कोटी रुपयांचे रिसॉर्ट, अॅग्रो टुरिझमसाठी ५० कोटींची निविदा देखील काढली जाणार होती. उजनी जलपर्यटनासाठी १९० कोटी, कृषी पर्यटनासाठी १९ कोटी, तसेच विनयार्ड पर्यटनासाठी ४८ कोटी रुपये असे एकूण २८२ कोटी निधीला मंजुरी मिळविली होती. यासाठी करमाळ्याचे माजी आमदार संजय मामा शिंदे यांनीही पुढाकार घेतला होता. आता लवकरच उजनी धरण एक पर्यटन केंद्र म्हणून महाराष्ट्राच्या नकाशा समोर येणार होते मात्र कोठेतरी माशी शिंकली आणि सोलापूरकरांचीच नाहीतर राज्यातील तमाम जलप्रेमींची निराशा झाली. यामुळे बुधवारी होणाऱ्या बैठकीत स्थानिक आमदारांनी उजनीच्या पाणी नियोजनाबरोबर उजनी जलपर्यटनाचाही विषय लावून धरावा, अशी जिल्ह्यातील नागरिकांची मागणी आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११२०

**धन्य आम्हीं जन्मा आलों ।**
**दास विठोबाचे झालों ।।**

जगाच्या पाठीवर आपण वेगवेगळे जीव पाहतो. या विविध जीवांपैकी मनुष्य हा जीव म्हणजे मानवी देह होय. हा जीव अत्यंत श्रेष्ठ आहे, यात शंकाच नाही. इतर प्राण्याच्या तुलनेत निसर्गाने मानवाला बुध्दी व वाचा ही सर्वोत्कृष्ट देणगी दिली आहे. सर्वोत्कृष्ट असणारा हा मानवी देह निश्चितच कांहीतरी चांगले करुन दाखविण्यासाठी आहे. हे सत्य असले तरीही आपणच पाहतो की, किती मानवांकडून चांगले घडते. जगात ज्या अनेक वाईट घटना, गोष्टी घडतात त्यालाही मूळात कोणीतरी माणूसच कारणीभूत असतो. अर्थात चांगले-वाईट घडण्याला मानवी प्रवृत्तीच जबाबदार असते. ज्याला मानवी देहाचे खरे महत्व कळले, त्याच्याकडून वाईट किंवा चुकीचे कांही घडत नाही. बुध्दी, वाचा, भावनेचा चांगला उपयोग केला तर निश्चितच चांगले घडू शकते. मानवी जन्म अत्यंत पवित्र व महत्वपूर्ण आहे. मानवी



देह प्राप्त झाला हे आमचे भाग्य आहे. आम्ही जनसेवेसाठी, चांगल्या कार्यासाठी देह झिजवणार असू तर खरोखरच आपण भाग्यवान आहोत. आपल्या हातून जनसेवाच घडावी, अशी अपेक्षा करुन या जन्माच्या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**धन्य आम्हीं जन्मा आलों ।**
**दास विठोबाचे झालों ।।**

मनुष्य देह मिळाला हे तर फारच भाग्य आहे. पण त्यातल्या त्यात आम्ही विठोबाचे भक्त झालो हे फार महत्वाचे आहे. हा विठोबा लेकुरवाळा आहे. त्याला जात-पात, लिंग, लहान-मोठा आदिशी कांही देणे-घेणे नाही. तो फक्त भावनेचा विचार करतो. सर्वांच्या ठिकाणी समत्व जोपासणारा हा विठोबा समता, बंधुता, प्रेम, आपुलकीचे मूर्तीमंत प्रतिक आहे. रंजल्या-गांजल्यांची तो सेवा करणारा, व सर्वांना ह्दयात घेणारा आहे. अशा समत्व जोपासणाऱ्या विठोबाचे आम्ही दास झाल्याने खरोखरच आपण धन्य झाले असल्याचे महाराज म्हणतात. जिवामध्ये ज्याला समता पाहता येत नाही, त्याचा मानवी देह निरर्थक आहे. बुध्दीवादी माणसाने समत्व जोपासणाऱ्या विठोबाचे दास व्हावे. अर्थात विठ्ठलाप्रमाणे सर्व जीवमात्रात समत्व पहावे. विठ्ठलाला सर्व जीवमात्रात पाहून त्यांच्या अडी-अडचणीत मदत करण्यासाठी पुढाकार घ्यावा. केवळ कपाळाला गंध, गळ्यात माळ, मुखात नाम घेऊन चालत नाही. तर प्रत्यक्ष समत्वाची वृत्ती हवी आहे. विठ्ठलाचे दास असल्याचे बाह्यांगी दाखविण्यापेक्षा ते आपल्या कृतीतून दाखविले तरच धन्य म्हणण्याचा अधिकार पोहचतो. स्वार्थ साधण्यासाठी विठ्ठलाच्या दासाचे सोंग घेणे म्हणजे सर्वांची फसवणूक करणे होय. मनुष्य देह हा मागूनही मिळणारा नव्हे. योगा-योगाने, आई-वडीलांच्या पुण्याईने आपणाला हा देह मिळाला आहे. त्यामुळे या देहाकडून अशा कांही चांगल्या गोष्टी कराव्यात की, ज्यामुळे मरावे परी किर्ती रुपी उरावे ही संतोक्ती आपल्या जीवनालाही लागू व्हावी. मी तर असे म्हणेन की, आपल्याकडून कांही चांगले करता आले नाही तरी चालेल, पण कोणत्याही परिस्थितीत कांही वाईट तरी केले जाऊ नये.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | करण - विष्टि (१८.०५) |
| दि. १९ मे २०२५ | दिनविशेष - शुभ दिवस |
| विक्रम संवत् २०८१ | ....राहू काल.... |
| शके - १९४७ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| संवत्सर - विश्वावसू | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| मास - वैशाख | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| कृ. षष्ठी (०६.११) | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| ऋतु - वसंत | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| नक्षत्र - श्रवण (१९.२९) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| योग - ब्रह्मा (२८.३५) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** आपले प्रत्येक प्रश्न सध्या महत्त्वाचे आहेत. नोकरी-व्यवसायात सध्या चांगली गती असल्याने कोणताही प्रश्न रेंगाळत राहणे आजतरी परवडणार नाही.

**वृषभ :** आपली नेमकी कोणा-कोणाची गाठ पडते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. घरातील एखादी व्यक्ती बाहेर जाऊन लवकर न आल्यामुळे जीवाला घोर लागणे शक्य.

**मिथुन :** कितीही कमावले तरी थोडे सबुरीनेच खाणारे आपण आयुष्यही उपभोगण्यासाठी असते हे बऱ्याचदा विसरल्यासारखे असते.

**कर्क :** वैवाहिक जोडीदाराची आपणास मिळणारी साथ आज एखाद्या मोठ्या कामात यश देणारे ठरू शकते.

**सिंह :** आज नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणी आपण अतिशय कार्यमग्न राहणार आहात नव्हे तसे राहणे फायद्याचे ठरणार आहे.

**कन्या :** आपणास आपल्या अभ्यासाचा, विचाराचा, चिंतनाचा आणि बौद्धिक कौशल्याचा उपयोग करून घेता येणार आहे.

**तूळ :** आजचा दिवस आपणासाठी आरोग्याकडे लक्ष द्यायला लावणारा ठरू शकतो. खाण्यापिण्यावर थोडेसे निर्बंध ठेवा. नोकरी-व्यवसायात आगामी काळाचा विचार करण्यासाठी बरेच पर्याय समोर असणार आहेत.

**वृश्चिक :** आर्थिकदृष्ट्या आज आपण कितीही मोठे-लहान अवश्य घेऊ शकता. बऱ्याच महत्त्वाच्या निर्णयांमध्ये आजचा दिवस संस्मरणीय ठरणार आहे.

**धनू :** विचारातला भडकपणा मुळातूनच टाळायचा आहे. आरोग्याकडे लक्ष द्यायचे आहे. आज होणाऱ्या व्यवहारात उगाच कोणाचा खोटा आळ येणार नाही असे पाहा.

**मकर :** जे काही असेल ते अतिशय चांगले असणे हा आपला स्थायी भाव आहे.

**कुंभ :** आज खाण्यापिण्याकडे थोडेसे बारीक लक्ष असणे हिताचे असणार आहे. नवीन मित्रांसमवेत चुकून काही खाल आणि नसते उद्योग पाठीशी लागतील.

**मीन :** अपेक्षित आणि आवश्यक असे प्रवास काहीजणांच्या बाबतीत शक्य आहे. नोकरी-व्यवसायातील एखादा महत्त्वाचा निर्णय आरामात घेऊ शकाल.

# अवकाळी पावसाचा कांद्याला फटका

### सरासरी १३ ते १५ रुपये किलो दर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मे-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याची आवक कमी जास्त प्रमाणात सुरू आहे. गेल्या काही दिवसांपासून कांद्याचे भाव स्थिर दिसत आहे. चांगल्या कांद्याला सरासरी १३ रुपये ते १५ रुपये किलो दर मिळत आहे. मात्र राज्यात अवकाळी पावसाचा कांदा शेतीला मोठा फटका बसत आहे.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत सध्या कांद्याला सरासरी १३ ते १५ रुपये किलो दर मिळत आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीत मे महिन्यात कांद्याची आवक कमी आहे. त्यामुळे कांद्याचे दर सध्या स्थिर आहेत. मात्र अवकाळी पावसाचा जोर गेल्या काही दिवसांपासून सोलापूर जिल्ह्यात तसेच इतर जिल्ह्यात देखील मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या अवकाळी



पावसामुळे कांद्याचे पीक खराब होत आहे. तर साठवणूक क्षमता नसल्यामुळे काढण्यात आलेला कांदा नसला जात आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांसमोर मोठा प्रश्न उभा ठाकला आहे. कांद्याला पुढील काळात चांगला भाव येईल, या अपेक्षाने शेतकऱ्यांनी कांदा चाळणीमध्ये साठवून ठेवला आहे.

मात्र अवकाळी पावसाचा जोर वाढत असल्याने कांदा खराब होण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. यापूर्वीच दुय्यम प्रतीच्या कांद्याला योग्य दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च निघत नाही. अशातच अवकाळी पावसाने पुन्हा एकदा धुमाकूळ घातल्याने, शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास हिरावतो की काय असा प्रश्न निर्माण होत आहे.

#### शेतकऱ्यांना न परवडणारा दर

बाजार समितीत कांद्याची आवक १७७२० क्विंटल इतकी असून त्याला सरासरी १००० रुपये असा दर मिळत आहे. तर जास्तीत जास्त १५०० इतका दर प्राप्त होत आहे. मात्र सदरचा दर हा शेतकऱ्यांना परवडणारा नाही. आवक कमी असताना दर वाढण्याची अपेक्षा शेतकऱ्यांना होती मात्र तसे घडले नाही. यापुढील काळात पावसावर कांद्याचे दर अवलंबून राहणार आहेत.

**- सादिक बागवान,**
**कांदा आडत व्यापारी सोलापूर**
**कृषी उत्पन्न बाजार समिती**

#### उत्पादन खर्च निघणे मुश्किल

कांदा उत्पादन करण्यासाठी लाखो रुपयांचा खर्च येतोय. बी बियाणे, औषधे, खते, रोपणे काढणे, अशा विविध खर्च कांद्यावर करावे लागतात. तेव्हा कुठे कांदा उत्पादन केले जाते. कांद्याला चांगला दर मिळेल, या आपेक्षाने उत्पादन केले होते. मात्र कांद्याला कवडीमोल दर मिळत आहे. परिस्थितीत उत्पादन खर्च निघणे देखील मुश्किल बनले आहे.

**- कल्लप्पा पाटील,**
**कांदा उत्पादक शेतकरी कासेगाव**

# शेतात सुरू असणाऱ्या कत्तलखान्यावर छापा

### बजरंग दलाची कारवाई; मंद्रूप येथील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मे-**

दि. १५-५-२०२५ रोजी बजरंग दलातील गोरक्षकांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार मंद्रूप येथे एका शेतात छूप्या पद्धतीने अवैधरित्या गाईंची मोठ्या प्रमाणात कत्तल होते, अशी माहिती मिळाली. त्यानुसार सदर माहिती सोलापूर ग्रामीण उपअधीक्षक प्रीतम यावलकर यांना दिली. त्वरित प्रीतम यावलकर यांनी मंद्रूप पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक मनोज पवार यांना सदर ठिकाणी गोरक्षकांच्या मदतीने छापा टाकण्यास सांगितले असता गोपनीय पथकाच्या मदतीने सदर कत्तलखान्याकडे जात असताना पोलीस कर्मचाऱ्यांना बघून कत्तलखाना चालवणाऱ्या व्यक्तीने तेथून पळ काढला. सदर घटनास्थळी एक महिला पोलिसांच्या निदर्शनास आली. सदर महिलेकडे चौकशी केली असता सदर कत्तलखाना मालकाचे नाव समीर कुरेशी, परविन समीर कुरेशी व बबलू शफिक कुरेशी सर्व राहणार फॉरेस्ट सोलापूर अशी माहिती सदर महिलेने दिले. सदर घटनास्थळावर दोन जर्सी गाय, एक गिर जातीचे खोंड एक म्हैस व चार जर्सी गायचे वासरे अशा प्रकारे आठ जिवंत गोवंश पोलिसांनी ताब्यात घेतले तसेच एक एचएफ डीलक्स दोन चाकी वाहन क्रमांक MH १३ DX३८२८ व एक विवो मोबाईल अशाप्रकारे एकूण २,५२,२५० /- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



कत्तलखान्यावर मोठ्या प्रमाणात रक्ताचा ठिकठिकाणी सडा, गाईच्या पोटातील बारीक अवयव एका ड्रम मध्ये तसेच गोवंशाची कत्तल केलेली अवयव निदर्शनास आले. सदर तिन्ही व्यक्तींविरोधात महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम ५ अ ५ ब तसेच प्राण्याचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० कलम११ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला. कारवाई यशस्वी करण्याकरिता सोलापूर ग्रामीण उप अधीक्षक प्रीतम यावलकर मंद्रूप पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक मनोज पवार उपनिरीक्षक डांगे, बजरंग दल सोलापूर जिल्हा गोरक्षा प्रमुख प्रशांत परदेशीसह जिल्हा गोरक्षा प्रमुख पवनकुमार कोमटी, गोरक्षक अनिकेत गोरट्याल, राकेश बिज्जरगी, वीरेश मंचाल, गणेश बिज्जरगी, पवन बल्ला, संगमेश्वर पाटील तसेच आदी गोरक्षकांनी सदर कारवाईसाठी अथक परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांच्या दाखल्यांसाठी २० शिबिरांचे आयोजन

### जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१८ मे-**

सोलापूर शहरातील तसेच उत्तर सोलापूर ग्रामीण भागामध्ये दि. २० मे ते २२ मे २०२५ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अंतर्गत दाखल्याविषयक शिबिराचे एकूण २० ठिकाणी आयोजन केले आहे. सदर शिबीरप्रसंगी ०३ नायब तहसिलदार, १० मंडळ अधिकारी, २ अव्वल कारकून, ४० तलाठी, ०३ कार्यालयीन कर्मचारी व ८५ महा-ई-सेवा चालक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

इयत्ता दहावी अणि बारावीचा निकाल लागल्याने पुढील शैक्षणीक प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, राहिवासी दाखला, आर्थिक दुर्बलघटकांचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर तसेच इतर शैक्षणीक दाखल्याची आवश्यकता असते. सदरचे दाखले विद्यार्थ्यांना विहीत वेळेत देणे आवश्यक आहे. सदरची प्रकिया पूर्ण करण्यासाठी विविध भागात शिबीराचे आयोजन करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आदेशित केले आहे. तरी सर्व नारिकांनी शिबीर प्रसंगी उपस्थित राहून शैक्षणीक दाखले प्राप्त करून घेण्याची दक्षता घ्यावी. असे आवाहन उत्तरचे तहसिलदार निलेश पाटील यांनी केले आहे.

**शिबीर स्थळ खालीलप्रमाणे** संगमेश्वर कॉलेज सात रस्ता सोलापूर, वालचंद कॉलेज, एकता नगर सोलापूर, दयानंद कॉलेज, सोलापूर, एस. के. बिराजदार हायस्कूल, शेळगी, सोनी कॉलेज, सोलापूर, इंडियन मॉडेल स्कूल (खचड) जुळे सोलापूर, ज.रा. चंडक हायस्कूल, बाळे, बी.एम.आय.टी कॉलेज, हिरज रोड सोलापूर, बी.एफ. दमाणी. स्कूल सम्राट चौक, सोलापूर, हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापूर, नेताजी प्रशाला, निलम नगर, सोलापूर, एस.व्ही.सी.एस प्रशाला, भवानी पेठ, सोलापूर, एस.व्ही.सी.एस प्रशाला, अक्कलकोट रोड, सोलापूर, सेवासदन प्रशाला, सोलापूर, भारतीय विद्यापीठ, सोलापूर, सोलापूर सोशल उर्दू हायस्कूल, सिद्धेश्वर पेठ, सोलापूर, सिद्धेश्वर हायस्कूल सिद्धेश्वर पेठ, सोलापूर, पांगल हायस्कूल व कॉलेज, सिद्धेश्वर पेठ, सोलापूर, न्यू हायस्कूल वडाळा, ता. उत्तर सोलापूर, महात्मा फुले, हायस्कूल मार्डी, ता. उत्तर सोलापूर.

## धक्का लागण्याच्या कारणावरून चाकूने वार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

शिंदी खाना या ठिकाणावरून मटन भाजनाला येथे जेवण करून बाहेर येत असताना धक्का लागण्याच्या कारणावरून विनायक नारबंडी (रा.घोंगडे वस्ती) याने फिर्यादी जनार्दन दगडू पवार (वय-३४, रा. केरबा काका चौक, विजापूर नाका, झोपडपट्टी सोलापूर) यांना शिवीगाळ करत चाकूने पाठीवर व डोक्यात मारून जखमी केले. तसेच जनार्दन यांचा मित्र विनायक म्हेत्रे याला हाताने मारहाण केल्याची फिर्याद जनार्दन पवार यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून विनायक नारबंडी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १६ मे रोजी रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार दुधाळे हे करीत आहेत.



# प्रभाग २२ येथे ड्रेनेज लाईन कामाचे उद्घाटन

**सोलापूर, दि. १८ मे-**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या सहकार्यातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव आणि नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या प्रयत्नातून प्रभाग क्रमांक २२ मधील रेवणसिद्धेश्वर नगर झोपडपट्टी येथे २ लाख ८१ हजार ८२० रुपये खर्चित ड्रेनेज लाईन कामाचे उद्घाटन करण्यात आले.

दरम्यान सदरच्या ड्रेनेज कामामुळे परिसरातील आरोग्य आणि स्वच्छता निश्चितच सुधारणार असल्याची माहिती माजी नगरसेवक किसन जाधव यांनी यावेळी दिली. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड,शिवाजी सुरवसे, सिद्धाराम पवार, अफजल पठाण, फिरोज पठाण, मल्लू जाधव, अविनाश मुकरंबे, चेतन सुरवसे, राहुल हत्ती, सुमित खानापुरे, यशवंत माळगे आदींची उपस्थिती होती.



# निंबर्गीच्या पूजा भासगीकर हिचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

अत्यंत हालाखीच्या परीस्थितीवर मात करीत व शेतीतील मजूरी करून शिक्षण घेणार्या निंबर्गी येथील पूजा मल्लिकार्जुन भासगीकर या विद्यार्थीनीने दहावी परीक्षेत श्री बसवेश्वर विद्यालयामधून दहावी परीक्षेत प्रथम क्रमांकाने यश मिळविल्याबद्दल माहेश्वरी बिराजदार यांच्याकडून सत्कार करण्यात आले.

पूजा भासगीकर एक वर्षाची असताना तिच्या वडिलांचे निधन झाले. घरची परिस्थिती बेताची होती असले तरी वडिलांच्या निधनानंतर एकुलती एक मुलगी पूजा हिला प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत तिच्या आईने रोज कामावर जाऊन गावात ऊस व द्राक्ष बागेत मजुरी करून पूजाचे शिक्षण चालु ठेवले . शाळेस सुट्टी असताना स्वतः पूजा आई सोबत मजुरीवर जाऊन आर्थिक परिस्थितीवर मात करून शिक्षण चालू ठेवले. या वर्षी दहावीच्या परीक्षेत निंबर्गी येथील श्री बसवेश्वर विद्यालयात मराठी माध्यममध्ये प्रथम क्रमांक मिळवित आपल्या आईच्या कष्टाचे चिज केले. अशा प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत यश प्राप्त केलेल्या पूजा भासगीकर या विद्यार्थीनीचे माहेश्वरी गंगाधर बिराजदार यांनी सत्कार करून तिचे कौतुक केले.

# सोलापूरच्या चार साहित्यिकांना पुरस्कार जाहीर

### डॉ. शिंदे, कुलकर्णी, एखंडे, साबळे यांचा समावेश






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

सोलापूरच्या साहित्य क्षेत्रातील चार कवींना पुरस्कार जाहीर झाले आहेत. आयोजक कवी चंद्रकांत जोगदंड, पुणे यांच्यावतीने आयोजित वैशाखी वादळवारा काव्य महोत्सव व पुरस्कार वितरण समारंभ या कार्यक्रमात रविवार दि. ८ जून रोजी एस. एम. जोशी फाउंडेशन पत्रकार भवन शेजारी, गांजवे चौक, नवी पेठ पुणे येथे होणार आहे.

कवी डॉ. शिवाजी शिंदे यांच्या अंत:स्थ हुंकार या काव्यसंग्रहाला विश्वरत्न इंग्लिश मेडीयम स्कुल विष्णुपंत ताम्हाणे विद्यालय, चिखली, पुणे यांच्यातर्फे देण्यात येणारा काव्यगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक कै. गंगाधर श्रावण आबक स्मृति पुरस्कार सोलापूरच्याच कवयित्री विद्या साबळे यांच्या पाऊल वाट या काव्यसंग्रहास घोषित झाला आहे. तर पेशाने शिक्षक असणारे कवी मयुरेश कुलकर्णी यांच्या धुमधडाका कथासंग्रहास कै. सोपानराव हैबतकर स्मृती पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार आहे. डॉ. शिवाजी शिंदे, मयुरेश कुलकर्णी, संगीता एखंडे आणि कवयित्री विद्या साबळे य या चौघांचे विविध क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

# अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती जयंती उत्सव महामंडळाच्या अध्यक्षपदी निशाणदार

### कार्याध्यक्षपदी उमेश कोळेकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मे**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती जयंती उत्सव महामंडळाची शनिवारी शिंदे चौकातील शिवस्मारक सभागृहात आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस माजी नगरसेवक सुरेश पाटील, शैलेश पिसे, गणेश नरोटे, बाळासाहेब वाघमोडे, माजी अध्यक्ष पद्माकर हळ्ळी, गुरू कावडे, मनीषा माने उपस्थित होते. दरम्यान, बैठकीच्या सुरुवातीला पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलनाने या बैठकीत सुरुवात झाली. सन २०२४-२५ वर्षातील पदाधिकाऱ्यांनी




जयंती उत्सवाचा लेखाजोखा सादर केला. यानंतर मान्यवरांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. सन २०२५-२६ या वर्षासाठी उत्सवा अध्यक्ष म्हणून सिद्ध बाबा निशाणदार तर कार्याध्यक्षपदी उमेश कोळेकर यांची एकमताने निवड करण्यात आली. खजिनदारपदी शेखर बंगाळे तर सचिवपदी महेश गाडेकर, उपाध्यक्ष दिगंबर खरात, गंगाधर गावडे, शशीकला कसपट्टे, आदींची निवड करण्यात आली. यावेळी बिपिन पाटील, पृथ्वीराज नरोटे, संस्कार नरोटे, किशोर खरात सोपान खांडेकर उपस्थित होते.


# दिवसांतून तीन वेळा शाळेत घेणार हजेरी

### अनुपस्थिती असल्यास पालकांना एसएमएस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

शालेय शिक्षण विभागाने राज्यातील सर्व शाळांसाठी विद्यार्थ्यांच्या सुरक्षितते संदर्भात नवे नियम आणि सूचना जारी केल्या आहेत. या अंतर्गत शाळांमधील विद्यार्थ्यांची हजेरी दिवसांतून तीन वेळा घेतली जाणार असून, त्यांच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी संबंधित शाळेवरच राहणार आहे.

न्यायालयाच्या आदेशानुसार माजी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या शिफारसींनुसार सकाळी, दुपारी व संध्याकाळी विद्यार्थ्यांची हजेरी घेतली जाईल. अनुपस्थिती असल्यास पालकांना त्वरित एसएमएसद्वारे माहिती दिली जाईल, खासगी शाळांमध्ये वर्गाचे दरवाजे, कॉरिडॉर, प्रवेशद्वार, मैदाने व स्वच्छतागृहाबाहेर कॅमेरे लावणे बंधनकारक असून एक महिन्याचा व्हिडीओ बॅकअप ठेवणे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याआधी पोलीस चारित्र्य प्रमाणपत्र घेणे, गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्यास सेवा तत्काळ समाप्त, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, प्रत्येक स्वच्छतागृहाजवळ परिचर नेमणे, पाणी, प्रकाश आणि आपत्कालीन घंटा उपलब्ध असावी, मुख्य प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक नेमणे, अनधिकृत व्यक्तींचा प्रवेश थांबविण्यासाठी दक्षता बाळगणे, १०९८ क्रमांक दृश्यमान ठिकाणी लावणे आणि त्यासंबंधी माहिती विद्यार्थ्यांना देणे, , विद्यार्थ्यांवर मानसिक ताण येऊ नये म्हणून समुपदेशकाची नियुक्ती करावी, खासगी शाळांनी पात्र व अनुभवी समुपदेशक नियुक्त करणे, पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळांमध्ये चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श यासंबंधी प्रात्यक्षिके आयोजित करावी, शाळा प्रशासनाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांबरोबर नियमित बैठक घेऊन या सर्व निर्देशांची अंमलबजावणी करावी, नियमांचे पालन न करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याच्या सूचना दिल्या आहेत.



# मुनाळे प्रशालेचा दहावीचा निकाल १०० टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

कारंबा (ता. उत्तर सोलापूर) येथील वत्सलाबाई मुनाळे प्रशालेचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला. प्रथम ऐश्वर्या पाटील ८८.२० टक्के, द्वितीय विश्वजा गुडे, ८७.४० टक्के, तृतीय आर्या गुंड ८२.६० टक्के मिळवून यश संपादन केले.

यावेळी विश्वकर्मा सोशल फाउंडेशनच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य विनायक सुतार, महादेव जाधव, राजाभाऊ तंबाके, बाळासाहेब माने, बापूसाहेब पाटील, सत्तर शेख, ज्योतेश गुंड, संजय आदाटे, चंद्रकांत पाटील, अनुरथ गुंड, शरीफ सय्यद, पप्पू लोंढे, शिवराज पेंडपाले, असलम शेख, मौला शेख, बाबा गुडे, अमोल सुतार, काका पाटील, राम तोडकर, सोम नाथ माने, शौकत पठाण, तुकाराम गुडे, निवृत्ती पाटील व गावकरी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...





### श्री शारदामाता हायस्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के

**अक्कलकोट, दि. १८ मे-**

येथील श्री शारदामाता इंग्लिश मिडीयम हायस्कूलचा दहावीचा निकाल यंदाही १०० टक्के लागला. प्रशालेतून प्रमोद पंचप्पा म्हेत्रे (९१ टक्के ) प्रथम, सुमित लक्ष्मीकांत मुन्नोली (८८.४० टक्के) द्वितीय तर साजिया शबाब शेख (८८.२० टक्के) तृतीय आले. प्रशालेच्या १६ विद्यार्थ्यांनी विशेष योग्यता श्रेणी प्राप्त केली. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे प्रमुख डॉ. पुरुषोत्तम राजीमवाले, प्राचार्य श्रीमती गिरीजा एकबोटे, मुख्याध्यापक अभय शेटे, प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून भावी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



### पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १८ मे-**

अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांचा शिवसेना नेते सुनील कटारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मानाची टोपी, पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या वाढदिवसानिमित्त सन्मान करण्यात आला. याप्रसंगी माजी सैनिक श्रीकांत मोरे, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद शाखा अक्कलकोट तालुकाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटना राज्य कार्यकारणी सदस्य स्वामीराव गायकवाड, डिजीटल मिडीया सोलापुर लोकसभा जिल्हाध्यक्ष राजेश जगताप ,सामाजिक कार्यकर्ते पंकज मडीखांबे, पोलीस कर्मचारी माने आदींसह पोलीस कर्मचारी, विविध सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बार्शी तालुक्यातील बौद्ध समाज धम्मविचाराकडे

**पांगरी, दि.१८ मे-**

बार्शी शहरात देशांतर, नामांतर की धर्मांतर या गर्जनेला शंभर वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून चलो बुद्ध की ओर या नाऱ्याने बार्शी तालुक्यातील बौद्ध बांधव धम्मविचाराकडे झुकायला लागला आहे. येथे २०१० ला चिंचोली या छोट्याशा गावात गौतम बुद्धाची पाच फूट उंचीची मूर्ती अनिल खुणे यांच्याकडून बसवण्यात आली. त्यानंतर श्रावस्ती बुद्ध विहार बार्शी, नालंदा बुद्ध विहार बार्शी, ४२२ मांडेगाव पांढरी पिंपळगाव, देशमुख गोरमाळे चिखर्डे, या गावांमध्ये तथागत गौतम बुद्धाच्या पंचधातूच्या मुर्त्यांची भन्ते सुमेधजी नागसेन यांच्या हस्ते प्रतिष्ठापना करण्यात आली. २०२५ नोव्हेंबर महिन्यात माजी शिक्षण अधिकारी विष्णू कांबळे यांच्या नेतृत्वाखाली तसेच सुमितजी नागसेन यांच्या उपस्थितीत धम्म प्रचार व प्रसारासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्याची पूर्वतयारी जोर धरू लागली. हा कार्यक्रम चंडक पेट्रोल पंपाजवळ महात्मा फुले मार्ग श्रावस्ती बुद्ध विहारात होणार आहे. तेथे अशोक स्तंभाचे उभारणीचे काम, हॉल, भंते निवास ४१ गुंठे जमिनीमध्ये श्रावस्ती बुद्ध विहाराचे काम अंतिम टप्प्यात आहे.



### अणदूरमध्ये गुणवंतांचा सत्कार

**अणदूर, दि. १८ मे-**

शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर यांच्या वतीने, सचिव रामचंद्र आलुरे यांनी इयत्ता दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. दहावीतून प्रथम नमन कांबळे, द्वितीय निवेदिता गायकवाड तर बारावीतून बारावी विज्ञान, कला, वाणिज्य मधून प्रणिता पवार, साक्षी पाटील, अमिषा पिंजारी, रमाबाई चिमणे, समीक्षा लोंढे, लक्ष्मी नवगिरे, सलोनी लंगडे, सुजाता ऐडके. त्याप्रमाणे लातूर विभाग स्तरीय एन.सी.सी.प्रशिक्षण, नळदुर्ग बालाघाट महाविद्यालय येथे संपन्न झालेल्या एकशे आठ विद्यार्थी कॅडेट मधून फायरिंगमध्ये प्रथम आलेल्या प्रशांत बोर्डे यांचाही यथोचित सत्कार करून गौरविण्यात आले. सत्काराप्रसंगी रामचंद्र आलुरे म्हणाले मिळालेल्या यशाने हुरळून जाऊ नका, सगळीकडे स्पर्धा वाढली आहे,कमी गुण मिळाले म्हणून नाउमेद होऊ नका. येणाऱ्या प्रत्येक संकटावर जो मात करतो तोच जीवनात यशस्वी होतो. यावेळी आदित्य आलुरे, मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी, एन.सी.सी.प्रमुख मकरंद पाटील, गुलाब सय्यद, किरण गायकवाड उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार रोहित मोरे आभार यांनी मानले.




### सांगोल्यात आर्ट ऑफ गिविंगचा वर्धापन दिन

**सांगोला, दि. १८ मे-**

आर्ट ऑफ गिविंग या सामाजिक संस्थेचा वर्धापन दिन विविध उपक्रमाने सांगोल्यात साजरा करण्यात आला. संस्थेचे प्रमुख डॉ. अच्युत सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या महाराष्ट्राच्या युथ लीडर अतिशा पैठणकर यांच्या नेतृत्वाखाली तालुका समन्वयक फिरोज मणेरी यांच्या माध्यमातून सांगोला येथील वृद्धाश्रमामध्ये वृद्धांना अन्नदान करून व शहरातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून हा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते पंकजकुमार काटे, खाजालाल मणेरी, लक्ष्मण कावळे, प्रदीप काटे, सावता शेंडे उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी पेरणीची गडबड करु नये

**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले**

**नुकसानीचे तातडीने पंचनामे**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**



जिल्ह्यात मे महिन्यातच अवकाळी पाऊस जोरात पडू लागला आहे. काही भागात या पावसाने ओढ्यांना पाणीही आले आहे. या पावसामुळे ओली जरी गेल्या तरी शेतकरी बांधवांनी ७ जूननंतरच खरिपाच्या पिकांची पेरणी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दैनिक तरूण भारतशी संवाद

साधताना आज (दि. १८) केले. दरम्यान, विजा, वादळी वाऱ्याने किंवा अती पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान झाले असेल तर त्यांचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्याचेही त्यांनी सांगितले. गेल्या आठवड्यापासून जिल्ह्यात सर्वदूर पाऊस हजेरी लावत आहे. पावसाने चांगली सुरूवात केल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या असल्या तरी अजून मोठ्या पावसाची पेरणीसाठी गरज आहे. तब्बल १०० मिलीमीटर पाऊस पडल्याशिवाय कोणीही खरिपाची पेरणी करू नये. कारण पेरणी लवकर केल्यास सोयाबीनसह इतर पिकांवर विविध रोग पडण्याची भीतीही भोसले यांनी व्यक्त केली. सध्या वादळी वारे, विजांचा गडगडाटासह पाऊस पडत आहे. या वादळी वाऱ्यात, विजांत किंवा गारपीट होवून नुकसान झाल्यास त्या शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश शासन स्तरावरूनही मिळाले आहेत. यामुळे असे कोणाचे नुकसान झाल्यास कृषी सहाय्यक, तलाठी भाऊसाहेबांशी संपर्क साधण्याचे आवाहनही भोसले यांनी केले आहे. पूर्वी रोहिण्या नक्षत्र निघाल्यावर असे पाऊस पडायचे. मात्र पेरणीसाठी मृगाचा पाऊसच योग्य असल्याचे त्यांनी नमूद केले. मृग नक्षत्राच्या पावसानंतर पेरलेल्या पिकांवर रोग कमी असतात; त्या मोसमानुसार उत्पन्नही चांगले निघत असते. यामुळे शेतकरी बांधवांनी पेरणीसाठी गडबड करू नये. चांगली ओल गेली असल्यास म्हणजेच किमान ७५ ते १०० मिलीमीटर पाऊस पडल्यास तिफणीवर हात ठेवावा, असाही सल्ला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांनी शेवटी दिला.

## सोडचिठ्ठी पाहिजे म्हणत डोक्यात घातला लोखंडी रॉड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

सोडचिट्ठी पाहिजे म्हणत शिवीगाळ करत लोखंडी रॉडने मारून जखमी केल्याची घटना १६ मे रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास देशमुख वस्ती येथे घडली. याप्रकरणी साधना शत्रुघन देवकते (वय-४७, रा. देशमुख वस्ती, देगाव नाका) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून प्रवीण गुणवंत मेटकरी (वय-३२, मुक्काम पोस्ट डोंगरगाव, तालुका मंगळवेढा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी यांचे जावई यास फिर्यादी यांची मुलगी प्रियंका हिच्यापासून सोडचिठ्ठी पाहिजे या कारणावरून फिर्यादीचा जावई प्रवीण हा फिर्यादी यांची मुलगी हिला मोहरी घरी आणून



सोडून फिर्यादीला व फिर्यादीच्या पतीस व मुलगी प्रियंका यांना शिवीगाळ दमदाटी करून फिर्यादीच्या डोक्यात लोखंडी रॉडने मारून जखमी केले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हवालदार वाल्मिकी हे करीत आहेत.

## सचिन वायकुळे यांना महाराष्ट्र महागौरव पुरस्कार जाहीर

**डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेची घोषणा**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १८ मे-**

डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्यावतीने देण्यात येणारा मानाचा महाराष्ट्र महागौरव पुरस्कार सचिन वायकुळे यांना जाहीर झाला आहे. त्याचे वितरण पुणे येथे २५ मे रोजी होणार असल्याची माहिती संस्थापक, अध्यक्ष राजा माने यांनी दिली.



उच्च व तंत्र शिक्षणमंत्री तथा संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आयुष्यमान भारत महाराष्ट्र राज्य समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण समारंभ संपन्न होणार आहे. सचिन वायकुळे यांनी भारतामध्ये पहिल्यांदाच तृतीयपंथीयांना न्याय मिळवून देण्यासाठी ऐतिहासिक कामगिरी करुन, महाराष्ट्रामध्ये एक वेगळा पॅटर्न निर्माण केला आहे. तृतीयपंथीयांना रेशन कार्ड मिळवून देणे, मतदान कार्ड मिळवून देणे, लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवून देणे, घरकुल योजना मिळवून देणे, त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे तसेच समाजामध्ये एक मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करुन राज्यामध्ये एक वेगळा आदर्श आणि पॅटर्न निर्माण करुन तृतीयपंथीयांना न्याय मिळवून देण्याचे ऐतिहासिक कार्य केले आहे.

वायकुळे यांनी केलेल्या तृतीयपंथीयांच्या विशेष कार्याची दखल घेऊन, त्यांची पुरस्कारासाठी निवड केली असल्याचे निवड समितीने सांगितले आहे. बार्शीपुत्र सचिन वायकुळे यांच्या निवडीबद्दल विविध क्षेत्रातून त्यांच्या कार्याचे कौतुक करत अभिनंदन केले जात आहे.

## डॉ. आंबेडकरांनी राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला महत्व दिले

**प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर : वैराग येथे व्याख्यान**

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि. १८ मे-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक चळवळी, आंदोलने केली, लढे उभारले, लेखन केले, वक्तव्य केली त्यावेळी त्यांच्यासमोर राष्ट्राचे सार्वभौमत्व होते. भारताच्या ऐक्याला तडा जाईल असा एकही निर्णय किंवा कार्य त्यांच्यातून झाले नाही. या सर्वांमध्ये माणूस हा केंद्रबिंदू होता. माणसाला केंद्रबिंदू मानून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्र उभारणी केली असे विचार प्रा.डॉ प्रल्हाद लुलेकर यांनी व्यक्त केले.



येथील प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्ट ने आयोजित केलेल्या महात्मा बुद्ध, महात्मा बसवेश्वर, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या व्याख्यानात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीतील योगदान या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील सेवानिवृत्त मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे हे होते. प्रा.अशोक वाघमारे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष विष्णू कांबळे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमासाठी प्रा.कॉ. तानाजी ठोंबरे, पा.न.निपाणीकर, प्रा.ए. बी.विद्यागर, प्राचार्य डॉ गोरे, प्रा.हेमंत शिंदे, प्राचार्य डॉ. लोखंडे तसेच मातोश्री रामाई महिला मंडळाच्या सर्व सदस्या,ज्येष्ठ नागरिक, महिला, तरुण मोठ्या संख्यने उपस्थित होते. डॉ. लुलेकर पुढे म्हणाले, १९१८ साली डॉ. आंबेडकरांनी शेतीच्या समस्या आणि त्यावरील उपाय सांगितले. त्यांनी चिपळूण परिषदेत शेतकऱ्यांतील पंतप्रधान झालेला पाहण्याची इच्छा व्यक्त केली होती. शेतकऱ्यांचा मुलगा पंतप्रधान झाल्याचे दिसले नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या सखोल अभ्यासाचा आढावा त्यांनी आपल्या भाषणात घेतला. प्रा.जे.पी. गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. भीमराव कदम यांनी आभार मानले. प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्टचे प्रा. डॉ. शशिकांत गायकवाड, प्रा. डी डी. मस्के, सुनील कांबळे, विक्रम सुरवसे तसेच महादेव बोकेफोडे यांनी नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. नागनाथ सोनवणे व समविचारी फ्रंटच्या अनेक कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

## पत्नी विरुद्ध पोलिसात तक्रार देण्यावरून लाकडाने मारहाण; तिघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १८ मे-**

पत्नी विरुद्ध पोलिसात तक्रार देत आहे असे म्हणत शिवीगाळ करून दमदाटी करत लाकडाने मारहाण केल्याची घटना १७ मे रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास लाकूड अड्डा सोलापूर येथे घडली. याप्रकरणी आकाश राजू चव्हाण (वय-२८,रा.नेहरूनगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून करुणा आकाश चव्हाण, वीरसिंग राठोड व पुरणसिंग राठोड (सर्व राहणार सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, वरील ठिकाणी फिर्यादीचा व फिर्यादीची पत्नी करुणा व सासरे वीरसिंग व चुलत सासरा पुरणसिंग राठोड यांनी फिर्यादीचे पत्नी विरुद्ध पोलिसात तक्रार देत आहे.असे म्हणून वरील संशयित आरोपी यांनी शिवीगाळ करत लाकडाने मारहाण केली आहे.असे फिर्यादित नमूद आहे. पुढील तपास पोलीस हवालदार जाधव हे करीत आहेत.

## मुलास धडक देऊन जखमी होण्यास कारणीभूत; एकावर गुन्हा

**सोलापूर, दि. १८ मे-**

मुलास धडक देऊन जखमी होण्यास कारणीभूत ठरल्याप्रमाणे व्यंकटेश अशोक कंदी (रा. सोमवार पेठ) याच्याविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.याप्रकरणी प्रदीप राजाराम गोसकी (वय-४०,रा.जोडभावी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.ही घटना ११ मे रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास भवानी पेठ येथे घडली.फिर्यादी यांचा मुलगा निवेद (वय-८) व सासरे रवींद्र कामुनी यांच्या घरासमोर रस्त्यावर सायकल खेळत असताना त्याला कार क्रमांक एमएच.१३सीएस.६६११ यातील वरील चालक कंदी याने निष्काळजीपणाने वाहन रिव्हर्स घेऊन मुलाच धडक देऊन जखमी होण्यास कारणीभूत झाला आहे.

## जीनियस परीक्षेत पार्थ राऊत जिल्ह्यात प्रथम

**माळशिरस, दि. १८ मे-**

सर फाउंडेशन आयोजित सर जीनियस प्रज्ञा शोध परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेडदचा पाचवीचा विद्यार्थी पार्थ नानासाहेब राऊत हा जिल्ह्यात प्रथम आला. शाळेतील अस्मिन शेख, विश्वजित झंजे, प्रिया शिंदे, गणेश बर्गे, प्रदीप वाघमोडे, कृष्णा पवार,अनुष्का पिसे,श्रेया चव्हाण या विद्यार्थ्यांनी केंद्रस्तरिय गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक उमाजी माने, शैलजा सपकाळ, शुभांगी सरगुले, धनाजी वाघमोडे, सुरेश शिंदे, अमित सानप, शिवाजी सावंत, चंद्रकांत थिटे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल पार्थ राऊत यांचे गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी, विस्तार अधिकारी प्रदीप करडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पोपट लवटे, केंद्रप्रमुख हमीद मुलाणी यांनी अभिनंदन केले.





## मोटार सायकल चोरास अटक

**८ मोटारसायकली जप्त; सांगोला पोलिसांची कामगिरी**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १८ मे-**

सांगोला, पंढरपूर, मोहोळ, सोलापूर पोलीस ठाणे हद्दीतून चोरीस गेलेल्या ८ मोटार सायकल आरोपीसह जप्त करण्यात सांगोला पोलिसांना यश आल्याची माहिती सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी दिली.

सांगोला पोलीस ठाणे कडील गु.र.नं.२४५/२०२५ बी एन एस कलम ३०३(२) प्रमाणे दाखल गुन्हयाचा तपास करत असताना पोलिसांना गुप्त बातमीदार मार्फत मिळालेल्या माहिती वरून आरोपी गोविंद उर्फ पवन राजु काळे रा.लक्ष्मीनगर, उमराणी तांडा, जत, ता.जत, जि.सांगली यास ताब्यात घेवून त्यांची चौकशी केली असता त्यांनी सांगोला शहरातुन तसेच पंढरपूर शहर पोलीस ठाणे, सोलापूर तालुका पोलीस ठाणे व मोहोळ पोलीस ठाणे या पोलीस ठाणे हददीत मोटार सायकली चोरी केल्याची कबुली दिल्याने त्यास अटक करुन त्यांचेकडून ५ बुलेट मोटार सायकल व ३ इतर मोटार सायकल असे एकुण ६ लाख २० हजार रुपये किंमतीच्या ८ मोटार सायकली जप्त करण्यात आलेले आहेत. पुढील तपास पो. ना.बाबासाहेब पाटील हे करीत आहेत. सदर कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी मंगळवेढा विभाग विकांत गायकवाड, सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ना.बाबासाहेब पाटील, पो.कों.लक्ष्मण वाघमोडे तसेच सायबर पोलीस ठाणेकडील पो.हे.कों.युसूफ पठाण यांनी केली.

## पंढरपुरात वृत्तपत्र विक्रेत्यांचा कडकडीत बंद

**विविध मागण्यांनी वेधले लक्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ मे-**

वृत्तपत्र विक्रेत्याच्या विविध मागण्यांसाठी रविवारी (दि.१८ मे ) रोजी एक दिवसीय जिल्ह्यातील सर्व वृत्तपत्र विक्रेत्यांनी आपला वृत्तपत्र विक्री व्यवसाय बंद ठेवून कडकडीत बंद पाळला आहे. आता तरी प्रशासनाने खडबडून जागे होऊन विक्रेत्याच्या मागण्याची दखल घ्यावी, अशी अपेक्षा सोलापूर जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटना जिल्हाध्यक्ष जिल्हा उपाध्यक्ष व सर्व सदस्यांनी व्यक्त केली आहे.




अनेक दिवस वृत्तपत्र विक्रेत्याच्या कमिशनमध्ये वाढ व्हावी याच करता वारंवार वृत्तपत्र प्रशासनानं पत्रव्यवहार करून १५ मे रोजी आम्ही आपल्याला सकारात्मक निर्णय देऊ असा पवित्रा घेऊन सोलापूर मधील बैठकीत सांगण्यात आले. परंतु त्याचे कारवाही ५ मे पर्यंत नझाल्याने जिल्ह्यातील संपूर्ण वृत्तपत्र विक्रेत्यांनी दि. १८ मे रोजी पूर्ण जिल्ह्यातील वृत्तपत्र विक्री बंद ठेवून आपला आवाज प्रशासनापर्यंत जावा याकरता सर्वांनीच जागरूक राहून पूर्ण जिल्ह्यात रविवारी वृत्तपत्र विक्री झालेली नाही. गेले अनेक दिवसांपासून वृत्तपत्र विक्रेते संघटना आणि वृत्तपत्र विक्रेत्याच्या कमिशनमध्ये वाढ व्हावी पुरवणी टाकणावळमध्ये वाढवावी व इतर मागण्यांसाठी वारंवार जिल्ह्यातील सर्वच वृत्तपत्र वितरण व्यवस्थापकांना जिल्हा संघटनेमार्फत व तालुका संघटनेमार्फत ही पत्रव्यवहार करून देखील विक्रेत्याच्या निवेदनाची दखल न घेतल्यानेच नाईलाजाने १८ मे रोजीचा बंद पुकारला आहे. नेहमीप्रमाणे भल्या पहाटेपासून वृत्तपत्र विक्रेते सावरकर पुतळ्यासमोरील फुटपाथवर जमून बंद बाबत घोषणा देत होते यानंतर सर्व विक्रेते गोपाळ कृष्ण मंदिर जवळील सार्वजनिक परता फलका शेजारी जमून आजचा बंद कशासाठी आहे या घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला होता. रविवारी संपूर्ण जिल्ह्यात वृत्तपत्र विक्रेत्याने कडकडीत बंद पाडून वृत्तपत्र व्यवसायातील प्रशासनाचे लक्ष वेधले. याचवेळी पंढरपूर शहर व जिल्हा तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी वाचकांच्या आजच्या एक दिवसीय झालेल्या गैरसोयीबद्दल क्षमस्व व दिलगिरी ही व्यक्त करून घोषणा दिल्या. काही वाचकांनी पंढरपुरात विक्रेत्यांना भेटून आपला पाठिंबा दर्शवला. जिल्ह्यातील वृत्तपत्र विक्रेत्या एक चुकीचा हा छोटासा का होईना पण प्राथमिक विषय आहे.

## नवभारत विद्यालय; दहावीचा निकाल ९२.८५ टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १८ मे-**

माढा तालुक्यातील दारफळ सीना येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नवभारत विद्यालयाचा दहावीचा निकाल ९२.८५ टक्के लागला असल्याची माहिती मुख्याध्यापक शंकर धावरे यांनी दिली.

दहावी परिक्षा करिता विद्यालयातून ७० विद्यार्थी बसले होते. ६५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विशेष प्राविण्यासह २७ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत २३ तर द्वितीय श्रेणीत १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक शंकर धावरे, पर्यवेक्षक किशोर शिंदे, शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचे संस्थेचे विश्वस्त पन्नालाल सुराणा, प्राचार्य डॉ. विजयकुमार उबाळे, विजय शिंदे संस्थेच्या अध्यक्षा शारदा शिंदे, उपाध्यक्ष गणपत बारबोले, संचालक अरुण कांबळे साहेब, संजय देशमुख,डॉ अभय कुमार लुणावत, मनोजकुमार मुळे, बाळासाहेब बारबोले, सरपंच अशोक शिंदे, उपसरपंच भावना उबाळे, विकास सोसायटीचे चेअरमन विठ्ठल शिंदे, धान्य बँकेचे चेअरमन सर्जेराव सुळे, अशोक लुणावत, शिवाजी बारबोले, उपसरपंच औंदुबर उबाळे, कुमार शिंदे, रणजित बारबोले यांनी अभिनंदन केले.

प्रथम क्रमांक दिव्यांका शिंदे (९५.२० टक्के), द्वितीय धनश्री मुकणे (९४.२० टक्के), तृतीय समृध्दी खराडे (९३.८० टक्के) तर मागासवर्गीय मुलांमध्ये प्रथम क्रमांक शिवम शत्रुघ्न गवळी (८६.२० टक्के).

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शेळगीतील नामसप्ताहाची काल्याच्या कीर्तनाने सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.१८ मे-**

शेळगीच्या मनिषनगरमधील विठ्ठल रूक्मीणी मंदिरातील अखंड नामसंकिर्तन सप्ताहाची सांगता हभप नामदेव महाराज देवकते यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. यंदाचे या नामसंकिर्तन सोहळ्याचे ३१ वे वर्ष होते.

वै. हभप दा.का. तथा भाऊ थांवरे, वै. राजाराम महाराज गायकवाड यांच्या प्रेरणेने व वै. बाबामहाराज सातारकर यांच्या कृपेने गेल्या ३० वर्षापासून येथे नासंकिर्तन सोहळ्याचे आयोजन केले जाते. यंदाच्या सप्ताहाची सुरवात दि. ९ मे रोजी हभप सिवाजी महाराज पोतदार, हभप अविनाश महाराज शिंदे, हभप लक्ष्मण महाराज चव्हाण यांच्या हस्ते ग्रंथ, वीणा, ध्वजपूजनाने झाली. या नामसंकिर्तन सप्ताहात दररोज काकडारती, नित्यपूजा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथाभजन, हरिपाठ, प्रवचन, हरिकिर्तन व हरिजागर असे कार्यक्रम झाले. यामध्ये हभप लक्ष्मण महाराज चव्हाण (चव्हाणवाडी), हभप माऊली महाराज बचूटे(सोलापूर), हभप अविनाश महाराज शिंदे (खडकी), हभप युवराज महाराज कुरूलकर (सोलापूर), हभप हरिप्रसाद महाराज धर्माधिकारी (सोलापूर) व हभप मनोज महाराज खलाटे (वडजी)यांचे प्रवचन झाले. तर हभप मन्मथ महाराज बहिरमल (उळे), हभप श्याम महाराज जोशी(कासेगाव), हभप रमेश महाराज शिवापूरकर(सोलापूर), हभप ज्ञानेश्वर महाराज चव्हाण(शिरापूर), हभप धनंजय महाराज वेदपाठक(सोलापूर), हभप अशोक महाराज पाटील (वडजी) यांची किर्तनसेवा झाली. या नामसंकिर्तन सप्ताहात होनसळ, दहिटण, मुळेगाव, खोताचीवाडी, वरळेगाव, देवकुरळी, अरळी, खानापूर, गुळवंची, नांदूरी, बाणेगाव, वडजी येथील भजनी मंडळाचा हरिजागर झाला. नामसप्ताहाची सांगता काल्याच्या किर्तनाने झाली. यावेळी परिसरातून दिंडी मिरवणूक काढण्यात आली. त्यामध्ये वारकरी भजनी मंडळासह महिला, पुरूष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महाप्रसादाची पंगत होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.



### महत्वाचे...



### टेंभुर्णी-अकलूज अन् सोलापूर-पुणे रोड दीड वर्षापासून अंधारात; निवेदन सादर

**टेंभुर्णी, दि. १८ मे-**

केंद्र शासनाच्या निधीतून गावातील रोडचे नूतनीकरण झाल्याने वाहतुकीची समस्या सुटली आहे. परंतु सदर ठेकेदाराने काम करताना निकृष्ट दर्जाचे काम केले तसेच टेंभुर्णी-अकलूज अन सोलापूर-पुणे रोड दीड वर्षापासून अंधारात ठेवल्याने टेंभुर्णी काँग्रेस कमिटी शहराध्यक्ष हेमंत देशमुख यांनी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांना निवेदन देऊन उपोषणाचा इशारा दिला आहे. येथे महामार्गाला जोडणारे रस्ते करमाळा रोड, कुर्डूवाडी रोड, बेंबळे रोड, यांचा कोणताही ताळमेळ ठेवलेला नाही. त्यामुळे टेंभुर्णी शहरात मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत. अकलूज रोडचे नूतनीकरण होऊन दोन वर्ष होऊन सुद्धा त्या रोडवरील पथदिवे चालू केले गेले नाही. शहरात कुर्डूवाडी चौक, बेंबळे चौक, बारावी मळा, भाजी मंडई, तसचे बसस्थानकामध्ये दररोज २०० च्या आसपास गाड्या ये-जा करतात त्या ठिकाणी वाहतूक होताना अपघात होण्याची दाट शक्यता आहे. सोलापूर पुणे महामार्गाला जोडणारा रस्ता खाली-वर झाल्याने सतत अपघात होत आहेत. यामुळे या ठिकाणी एक समान रस्ता करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना ये जा करताना जीव मुठीत धरून ओलांडावा लागत आहे. त्याचप्रमाणे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. एक महिन्याच्या आत लाईट चालू करून नागरिकांची समस्या सोडवावी अन्यथा टेंभुर्णी काँग्रेस तर्फे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर उपोषण करण्यात येईल असे या निवेदनात म्हटले आहे. यावेळी प्रथमेश यादव, अनंत घळके, अतुल मांढरे, किरण घळके, उपस्थित होते.




### १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत मोहोळ पोलिसांकडून ६०० अर्जांचा निपटारा

**मोहोळ, दि. १८ मे-**

राज्य शासनाच्या १०० दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत मोहोळ पोलिसांकडून ६०० अर्जांचा निपटारा करण्यात आला असून सामाजिक बांधिलकी म्हणून आयोजित शिबीरात ४५ जणांनी रक्तदान केले. याविषयी अधिक माहिती देताना मोहोळचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे म्हणाले की राज्य शासनाने १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करून दिला होता. त्या विविध अडीअडचणी समस्यांचा निपटारा व्हावा अशी शासनाची अपेक्षा होती.त्यानुसार मोहोळ पोलीस ठाण्यांतर्गत प्रलंबित अशा ६०० अर्जांचा निपटारा करण्यात आला त्यामध्ये पती-पत्नीचे वाद बांधाची समस्या रस्त्याचे वाद आधी समस्यांचे निराकरण झाले त्याचबरोबर आगामी काळाची गरज म्हणून विषमुक्त शेती आणि सेंद्रिय शेतीचा प्रयोग करावा यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अनेक वर्ष प्रलंबित असलेल्या ३५० गुन्ह्यांचे न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले. हा उपक्रम जवळजवळ ४५० शाळांमध्ये जाऊन राबवण्यात आला. जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्थानिक सर्व सहकारी पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार यांच्या सहाय्याने हा उपक्रम यशस्वी झाल्याचे पोलीस निरीक्षक शेडगे यांनी सांगितले.

### बस प्रवासात १० तोळे सोन्याचे दागिने चोरीला

**बार्शी, दि. १८ मे-**

धाराशिवहून ठाणे येथे जाणाऱ्या एस.टी. बसमधून प्रवास करत असताना एका महिला प्रवाशाचे १० तोळे वजनाचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना शनिवारी (दि. १८ मे) उघडकीस आली. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी मनिषा सुर्यकांत गाजरे (वय ४८, रा. डी.वाय. पाटील स्टेडियमजवळ, नेरुळ, नवी मुंबई, मूळगाव - बेंबळी, ता. धाराशिव) यांनी फिर्याद दिली आहे. गाजरे या मिळेल ती मजुरी करुन आपला उदरनिर्वाह करतात. १९९६ ते २०२२ या कालावधीत त्यांनी मेहनतीने १० तोळे वजनाचे सोन्याचे दागिने - पाटल्या व बिल्वरी बांगड्या तयार केल्या होत्या. त्या त्या नेहमी वापरत होत्या. गाजरे या भावाच्या घरी देववडगाव (ता. तुळजापूर) येथे वास्तुशांतीच्या कार्यक्रमासाठी १५ मे रोजी आल्या होत्या. कार्यक्रमानंतर त्या १८ मे रोजी सकाळी आपल्या सासरी बेंबळी येथे गेल्या आणि तिथून सकाळी ६.३० वा. मुंबईसाठी निघाल्या. त्यांनी दागिने काढून एका डबीत ठेवले आणि ती डबी पर्समध्ये ठेवून धाराशिव बसस्थानकातून सकाळी ९ वाजता ठाणे एस.टी. साठी निघाल्या. बस बार्शी स्थानकात सकाळी १०.२२ वा. पोहोचली. यावेळी भूक लागल्यामुळे त्यांनी पर्स उघडली असता दागिन्यांची डबी त्यात दिसून आली नाही. पर्सचा कप्पा उघडा होता व झिप देखील खुली होती. त्यांनी बसचालक, वाहक व प्रवाशांकडे चौकशी केली, मात्र कुठलीच माहिती मिळाली नाही. डबीत ५ तोळ्यांच्या सोन्याच्या पाटल्या व ५ तोळ्यांच्या बिल्वरी बांगड्या असा ऐवज होता. गाजरे यांच्या फिर्यादीनुसार अज्ञात इसमाने त्यांची पर्स उघडून डबीतील दागिने चोरुन नेले आहेत. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून अधिक तपास सुरु आहे.

## कॉरिडॉर रद्द करा; नदी पलीकडे प्रती पंढरपूर करा

### तिर्थक्षेत्र बचाव समितीची मागणी

### यमाई तलाव येथून स्काय वॉक करा



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ मे-**

कॉरिडॉर प्रकल्प हा महंमद तुघलकी वेडेपणाचा असून कितीही, काहीही झाले तरी आम्ही आशा सोडली नसून कॉरिडॉर प्रकल्पाला प्रखर विरोध करू. हा प्रकल्प कदापिही आम्ही होवू देणार नाही असा इशारा येथील तिर्थक्षेत्र बचाव समितीचे अध्यक्ष अभयसिंह कुलकर्णी इंचगावकर यांनी दिला.

येथील विठ्ठल मंदिरा शेजारील हिंदु महासभा भवन येथे शनिवारी (ता.१७) सायंकाळी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्या मध्ये बोलताना त्यांनी हि माहिती दिली. ते म्हणाले, सत्यमेव जयते ब्रीद वाक्य असताना प्रशासन खोट्या गोष्टी रेटून नेत आहे. संभाव्य बाधितांपैकी ५१० लोकांनी आपल्या मालमत्तेची माहिती दिली म्हणजे कॉरिडॉर प्रकल्पाला पाठींबा दिला असे होत नाही. या ५१० पैकी अनेक बहुतांश लोकांनी कॉरिडॉरला आमचा ठाम विरोधच राहील असे प्रकर्षाने नमुद केले आहे. परंतू मुद्दामहून प्रशासन ते झाकत आहे. पत्रकार बांधवांनी याची पोलखोल करावी अशी विनंती देखील यावेळी त्यांनी केली. आम्ही माहिती अधिकारात ते मागणारच आहोत पण त्याला वेळ लागणार आहे. त्यामुळे संभाव्य बाधितांपैकी किती जण कॉरिडॉरच्या विरोधात आहेत व किती जण पाठींब्याचे बाजूने आहेत यासाठी प्रशासनाने मंदिर परिसरात मतदान घ्यावे अशी मागणी आम्ही केली होती. प्रशासनाने न केल्यास आम्ही लवकरच अभिरूप मतदान घेवून ते स्पष्ट करणार आहोत. बाधितांमध्ये ५१० माहिती दिलेले विरूध्द १३२ माहिती न दिलेले अशी गटबाजी होवू नये सर्वच्या सर्व माहिती दिलेले अगर न दिलेले कॉरिडॉरचे विरोधकच आहेत. त्यामुळे उरलेल्या लोकांना सुध्दा विरोध नोंदवून माहिती देण्याचे आम्ही आवाहन करीत आहोत. तसेच केवळ मालमत्ताधारक एवढेच बाधित नसून भाडेकरू वर्ग हा फार मोठा आहे. त्यांचेही म्हणणे देखील प्रशासनाने ऐकून घेतले पाहीजे. त्यांचाही विचार झाला पाहीजे. कृती समिती मालक व भाडेकरू दोघांनाही न्याय देणार आहे. प्रशासन मुद्दामहून शब्दच्छल करून खोटा संदेश जाईल अशा बातम्या पसरवत आहे व दडपशाहीने आमचा आवाज दाबून टाकत आहे. संवैधानिक मार्गाने आम्हाला सभा घ्यायला सुध्दा परवानगी नाकारली आहे. कॉरिडॉर संपुर्णपणे असंवैधानिक आहे. संविधानीक पध्दतीने प्रत्येक कामासाठी जे ते खाते ज्या त्या कामासाठी शासनाकडून तयार करण्यात आलेले आहे. हा विषय नगरविकास खात्याचा आहे. वर्षानुवर्षे नगररचना करणेचे काम नगरविकास खाते करीत आहे. प्रांताधिकारी, जिल्हाधिकारी या मुलकी अधिकाऱ्यांचा याच्याशी काही संबंध नाही. नगरविकास खात्यात या विषयाचा अभ्यास असणारे तज्ञ इंजिनिअर असतात. सनदी अधिकाऱ्यांचे हे काम नाही. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास खात्याकडून एमआरटीपी अँक्ट (M.R.T.P. ct ) प्रमाणे कार्य चालू असते व प्रती वीस वर्षांनी महाराष्ट्रातील प्रत्येक शहरातील विकास योजनांचा मागोवा घेवून वाटल्यास नवीन विकास योजना डिपीप्लँन( D.P. Plan ) राबवले जातात. यासाठी त्यांचेकडे नगररचना टाऊन प्लँनिंग (Town planning ) चे उच्चशिक्षण असणारे अभियंते असतात. त्यांना शास्त्रशुध्द प्रशिक्षण असते. त्याप्रमाणे पंढरपूर शहरासाठी नवीन विकास योजना अस्तित्वात आलेली आहे. त्यामध्ये चौफाळा ते महाद्वार चौक हे रस्ते थोडक्या प्रमाणातच वाढविले आहेत. शंभर शंभर मीटर रुंदीचे दाखवले नाहीत. त्यामुळे कॉरिडॉर हा प्रकल्प शुध्द खुळचटपणाचा असून तो अनावश्यक आहे. तो राबविला नाही तर काहीही फरक पडणार नाही असे खुद्द महाराष्ट्र शासनाचे नगरविकास खात्याचे मत आहे असे असताना हा महंमद तुघलकी वेडेपणाचा कॉरिडॉर प्रकल्प संपूर्ण रद्द करण्यात यावा असे आवाहन कृती समितीचे निमंत्रक कुलकर्णी (इचगांवकर), भाजप महिला आघाडी जिल्हाध्यक्षा डॉ. प्राजक्ता बेणारे, अँड.विनायक उंडाळे, व्यंकटेश गलगलकर, वैभव बडवे, वैभव रणदिवे, माधव कौलगी यांनी केले आहे.

#### भाडेकरुंचा कॉरिडॉरला पूर्ण विरोध

प्राचीन, ऐतिहासीक वास्तू असलेल्या अहिल्यादेवी होळकर वाडा व शिंदे सरकार वाडा परिसरातील कुळ भाडेकरूंना न्याय मिळत नाही, शंभर ते दीडशे वर्षापासुन भाडेकरू असलेल्या लोकांची माहिती नीट दिली जात नाही. त्यामुळे आमचा कॉरिडॉरला पूर्ण विरोध आहे, असे मत भाडेकरूनी व्यक्त केले.

---

कॉरिडॉरसाठी ९० टक्के लोकांचा विरोध असतानाही चुकीचा संदेश पसरत आहे, मतदान घ्यावे, गर्दी टाळण्यासाठी यमाई तलाव येथून स्काय वॉक करण्यात यावा, किंवा नदी पलीकडे असलेल्या रानात प्रती पंढरपूर साकारावे. कॉरिडॉर झाल्यास जुन्या प्रथा परंपरा नष्ट होणार आहेत. महाद्वार काला, प्रक्षाळ पूजा कसे होणार ? मंदिर परिसरात हजारो भाविक कमी पैशात राहत होते. यजमान कृत्य करणाऱ्या लोकांचा उदरनिर्वाह यावर अवलंबून आहे, त्यांनी कसे जगायचे? तीन चारशे रुपयांत राहणारे भाविक महागड्या भक्त निवासात कसे राहणार ?

**- डॉ. प्राजक्ता बेणारे, पंढरपूर.**

## विठ्ठल मंदिरात राजशिष्ठाचार व सत्कार समिती गठीत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, ता.१८ मे-**

श्री विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी येणारे मंत्री, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी आणि व्हीआयपींचा सत्कार करण्यासाठी मंदिर समितीने एक राजशिष्टाचार व सत्कार समिती गठीत केली आहे. यामध्ये मंदिर समितीच्या पाच विभाग प्रमुखांची नियुक्ती केली आहे. यापुढे सत्कार समितीकडूनच व्हीआयपींचे सत्कार केले जाणार आहेत. मंदिर समितीमध्ये प्रथमच अशा प्रकारची सत्कार समिती नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी जशी भाविकांची मांदियाळी असती, तशीच मंत्री, वरिष्ठ अधिकारी आणि व्हीआयपींचीही सतत मांदियाळी असते. विठ्ठल दर्शनासाठी येणाऱ्या प्रत्येक व्हीआयपींचा मंदिर समितीचे अधिकारी किंवा सदस्यांकडून योग्य सन्मान व्हावा अशी त्यांची अपेक्षा असते. मात्र अलिकडे मंदिरात दर्शनासाठी येणारे मंत्री, वरिष्ठ अधिकारी व व्हीआयपींचा योग्य प्रकारे सन्मान केला जात नसल्याच्या अनेक तक्रारी पुढे येऊ लागल्या आहेत. त्यामुळे अशा तक्रारींची मंदिर समितीकडून गांभिर्याने दखल घेतली गेली आहे. दरम्यान विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने मंत्री, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी आणि व्हीआयपींच्या सत्कारासाठी मंदिरातील पाच विभाग प्रमुखांची एक राजशिष्टाचार व सत्कार समिती गठीत केली. या समितीमध्ये समावेश असलेल्या विभाग प्रमुखांनाच व्हीआयपींचा विशेष सत्कार करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

#### राजशिष्टाचार व सत्कार समितींमध्ये यांचा समावेश

दरम्यान या समितीमध्ये पांडुरंग बुरांडे, राजेंद्र सुभेदार, संजय कोकीळ, राजेश पिटले व संदीप कुलकर्णी या पाच विभाग प्रमुखांचा समावेश करण्यात आला आहे.

---

विठ्ठल दर्शनासाठी येणारे व्हीआयपी, देणगीदार यांचा मंदिर समितीकडून यथोचित मान सन्मान होणे आवश्यक आहे. पण अनेक वेळा मंदिर समिती सदस्य आणि मंदिरातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मर्जीतील काही खास व्यक्तींचा सत्कार करुन वेगळी छाप पाडण्याचा प्रयत्न केला जातो. अशा चकटफु (चमकोगिरी करणाऱ्या ) बाबुरावांच्या सत्कारामुळे मंदिर समितीला उगाचच आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. त्यामुळे व्हीआयपी सोडून अन्य व्यक्तींच्या सत्काराबाबत देखील मंदिर समितीने एक धोरण व नियमावली तयार करावी.

**- रामकृष्ण महाराज वीर ( राष्ट्रीय प्रवक्ते, वारकरी सांप्रदाय पाईक संघ )**

## बार्शीच्या चिमुकल्या कलाकाराचा दिल्लीत डंका

### शहनाई वादक सोहम राऊतला शिष्यवृत्ती

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ मे-**

शहनाई हे वाद्य उत्तर भारताची देणं असलं तरी महाराष्ट्रातील एका कुटुंबाने या वाद्याची संस्कृती जपण्याचं काम केलं आहे. बार्शी येथील राऊत कुटुंबाने शहनाईचे परंपरा जपली असून त्या कुटुंबातील सोहम सचिन राऊत यास दिल्लीच्या सीसीआरटी भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्यावतीने त्याला २०२४-२५ साठी शिष्यवृत्ती बहाल केली आहे. दरवर्षी कला दृश्य साहित्यिक आणि सादरीकरण क्षेत्रातील अनेक असाधारण प्रतिभावन आणि उत्कृष्ट विद्यार्थ्यांची मुलाखत/प्रदर्शनासाठी निवड केली जाते. त्यानंतर सर्जनशील लेखन, शास्त्रीय नृत्य,



हिंदुस्थानी किंवा कर्नाटक शास्त्रीय संगीत, शिल्पकला इत्यादी विविध क्षेत्रांमधून १० ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची निवड केली जाते. सोहम सचिन राऊत वाद्य संगीत शहनाई या शस्त्रातील त्यांच्यापैकी एक असण्याचा खरोखरच सन्मान आहे. सोहम राऊत यांनी शहनाई वादनात आपली प्रतिभा दाखवून दिल्याने त्याची दिल्लीकरांनी दखल घेत त्याला शिष्यवृत्ती बहाल केली आहे.

## पिंपळगावात अडीच लाखांची कुस्ती बरोबरीत

### महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील व वेताळ शेळके ठरले मानकरी, जन्मभूमी प्रतिष्ठान व ग्रामस्थांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ मे-**

जन्मभूमी प्रतिष्ठान व पिंपळगाव ग्रामस्थांतर्फे महाराष्ट्र चॅम्पियन पै.सचिन धस यांच्या संकल्पनेतून विठ्ठल बिरदेव यात्रेनिमित्त पिंपळगाव केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले होते. यावेळी भगवंत ब्लड बँकेचे चेअरमन शशिकांत जगदाळे प्रायोजित अडीच लाख रुपयांच्या प्रथम क्रमांकाच्या कुस्तीसाठी महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील व वेताळ शेळके यांच्यात लढत झाली. सुमारे ४० मिनिटांच्या अविस्मरणीय कुस्तीमध्ये ही कुस्ती बरोबरीत सुटल्यामुळे बक्षिसाचे ते दोघे समान मानकरी ठरले.



सकाळी अकरा वाजल्यापासून रात्री दहापर्यंत राज्यातल्या नामवंत मल्लांच्या चित्तथरारक कुस्त्या अनुभवत पिंपळगाव व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी कुस्त्यांचा आनंद लुटला. खडाखडीसह वेगवेगळे डाव, लाल मातीने रंगलेले पहाडासारखी शरीरे, दंड थोपटून आखाडा घुमवणाऱ्या कुस्त्या, हजारो प्रेक्षकांच्या उत्साही गर्दीत हलग्यांचा कडकडाट भारावून टाकणारा होता. लाखोंच्या बक्षीसांमुळे सव्वाशेपेक्षा जास्त कुस्तीपटूंची हजेरी, प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे भारदार निवेदन, ढोल ताशे हलगीचा मैदान दुमदुमत ठेवणारा गजर हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य ठरले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, सरपंच तुळशीराम वायकर, उपसरपंचअण्णासाहेब धस, माजी सरपंच ज्ञानेश्वर भालेकर, जन्मभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नानासाहेब धस, सचिव स्वप्नील धस, विकास जगदाळे, हनुमंत जगदाळे, शिवा भोळे, विजयसिंह पाटील, भाऊसाहेब कोळी, बाबा देवकते, अण्णासाहेब पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

सकाळी अकरा वाजल्यापासून सुरु झालेल्या खुल्या वयोगटातील व वेगवेगळ्या वजन गटातील राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या पैलवानांच्या अत्यंत चित्त थरारक कुस्त्या पिंपळगाव व पंचक्रोशीतील ग्रामस्थांना पाहायला मिळाल्या. यात्रा समिती व पिंपळगाव ग्रामस्थ यांनी सर्व कुस्तीगीरांच्या निवास व भोजनाची दर्जेदार व्यवस्था केल्यामुळे आनंदीत झालेल्या कुस्तीपटूंनी संयोजकांना धन्यवाद दिले. पिंपळगावच्या कुस्ती परंपरेला उजाळा देण्यासाठी व होतकरु मल्लांना व्यासपीठ आखाडा देण्यासाठी गावातील उच्चशिक्षित भूमिपुत्रांनी परगावांमध्ये राहूनही स्वखर्चाने व ग्रामस्थांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या स्पर्धांना कुस्ती शौकिनांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मानाच्या समजल्या जाणाऱ्या विविध कुस्त्या तर झाल्याच पण त्याचबरोबर पहिल्या तीन क्रमांकाच्या बक्षिसांसाठी झालेल्या कुस्त्यांनी प्रेक्षकांच्या डोळ्याची पाळणे फेडले. भगवंत ब्लड बँकेचे चेअरमन शशिकांत जगदाळे यांनी तन मन धनाने योगदान देत या स्पर्धेसाठी पहिल्या क्रमांकाचे बक्षीस प्रायोजित केले होते. तर राहुल धस यांनी दुसऱ्या क्रमांकाची कुस्ती एक लाख रुपये बक्षीस देऊन पै. मनोज माने कुर्डूवाडी विरुद्ध पै. हनुमंत पुरी प्रायोजित केली होती. यामध्ये पै. मनोज माने विजयी ठरले. तृतीय क्रमांकाची कुस्ती सुरेश धस यांनी ५१ हजार रुपये बक्षीस देऊन पै.रवींद्र खैरे विरुद्ध पै.अमित जगदाळे अशी प्रायोजित केली होती तर पै. बालाजी मांजरे यांनी चांदीची गदा प्रायोजित केली होती. यामध्ये पैलवान अमित जगदाळे विजयी ठरले. त्यामुळे या स्पर्धांची रंगत व उत्सुकता कमालीची वाढली होती. कुस्तीगिरांना प्रोत्साहन देण्यासाठी खास उपस्थित उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल व बार्शीचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी या स्पर्धेचे पारितोषिक वितरण केले. यावेळी बोलताना जन्मभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नानासाहेब धस यांनी या गावाचे नाव आशिया खंडात मानाने कोरले जावे पिंपळगावच्या मातीतून उद्याचा महाराष्ट्र केसरी झाला पाहिजे व कै. चंद्रकांत धस व कै. रगनाथ धस या परममित्र पैलवानांच्या स्मृती चिरंतन जपल्या पाहिजेत या उद्देशाने या स्पर्धेचे संयोजन केल्याचे सांगितले. यावेळी संयोजक व विठ्ठल बिरुदेव यात्रा समितीचे अध्यक्ष सचिन धस यांचा उत्कृष्ट संयोजनाबद्दल जगदाळे परिवाराकडून सन्मान करण्यात आला. तसेच भगवंत ब्लड बँकेचे चेअरमन शशिकांत जगदाळे यांनी प्रतिकूल परिस्थितीमध्ये संघर्ष करत गावाचे नाव राज्यात मोठे केले व गावावरचे प्रेम टिकवले याबद्दल पिंपळगाव ग्रामस्थानी त्यांचा उत्स्फूर्त सत्कार केला. या स्पर्धेत पंच म्हणून पै. धनाजी वाघमोडे, पै.दादा कसबे, पै. नवनाथ धस, पै.विलास धस, पै.समाधान धस, पै.अमर धस, पै. शिवाजी मस्तूद यांनी काम पाहिले. राजाभाऊ देवकते व मदने यांनी भारदार निवेदन केले. कुस्ती स्पर्धेसाठी राहुल धस, विश्वजीत ठोंगे, मंथन पाटील, अजित शेख, सोहेल शेख, सलीम मुलानी, सुरज चंदनशिवे, अमरदीप धस, बालाजी धस, धनाजी धस, दादा वीर, आकाश लवटे, बबलू धस, राम गरड, वैभव जगदाळे आदींनी परिश्रम घेतले.